

# माणूस

२८ जुलै १९७३

पन्नास पैसे

श्री. ग. माजगावकर

२८ जुलै १९७३

# माणूस

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये
परदेशची वर्गणी पासष्ट रुपये

वर्ष : तेरावे । अंक : नववा

## सप्रेम नमस्कार....

▫ अठरा जून १९७३ या दिवशी विद्यापीठातील काही कामाकरता मी महाडहून पुण्याला गेलो. मृगाबरोबर आलेला पाऊस जरा ओसरला होता. जागोजागी खाचरातून हिरवीगार आवणे वीत-दीडवीत वर येऊन वाऱ्यावर डोलत होती. डोंगरांनी हिरवी शाल पाखरली होती. माझेरी मागे टाकून आमची एस्. टी. रोरावत डोंगराच्या एका कडणीची वळणे चढत होती. माझेरीच्या वळणात ओसरा आल्याने ३।४ दिवस घाट बंद होता. तो कुठे आला होता हे आम्ही पाहात होतो. तोच महाभयंकर कुजट घाण नाकातील केस जाळीत नाकात घुसली. गाडी चालू असल्याने तो कुजट वास मागे पडतोय् तो पुन्हा तसाच वास नाकी घुसला. खिडीतले वळण टाकून पुणे जिल्ह्यात गाडी शिरली तो पुन्हा वास मारला ! मला कळेना घाटात एवढे कुजलेय तरी काय ?

गाडी वाघजाईशी थांबली, पण तिथेही देवीच्या दर्शनालाही थांबू न देण्याइतकी घाण मारत होती. मी जरा आजूबाजूला पाहिले तो देवीपासून ५० फुटावर रस्त्याच्या कडेला एक बैल मरून पडलेला दिसला. त्याचे पोट टरारून फुगले होते, नव्हे फुटले होते. आतड्यांचा भला मोठा गोळा बाहेर आला होता. डोळे सताड उघडे होते. माशा घोंघावत होत्या. अस्ताव्यस्त पडलेले ते कलेवर अंगावरचे केस ताठ उभे करीत होते. गाडीने वाघजाई सोडली आणि श्वास घेणे दुरापास्त व्हावे अशी घाण सारखी येऊ लागली. घाणीच्या कारणाचा पत्ता लागल्याने गाडीतले आम्ही उतारू एकमेकाला—

: इथे दोन पडली आहेत.

: इथे तर चार.

: उजव्या हाताच्या माळावर

माणूस साप्ताहिक, १०२५ सदाशिव पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे काल्पनिक.

पाहिलेत का ? तिथे कमीतकमी वीस असावीत.

अशा बातम्या देऊ लागली. गाडी-बाहेर डोकावू लागलो. हिर्डोशीपर्यंत १५० चा आकडा झाला. हिर्डोशीच्या माळावर आणखी दहा-वीस मरून पडलेली दिसली.

इतक्या मोठ्या प्रमाणावर गुरे मेली कशी ? कुणाची ? केव्हा मेली ? का ? इथेच टाकून मालक गेले कसे ?

या प्रश्नांची उत्तरे शोधणारी चर्चा-चौकशी मी सुरू केली. हाती उत्तरे लागली ती अशी–

गुरे लमाण लोकांची. उन्हाळ्यात कोळशाची वाहतूक करण्याकरता ही मंडळी घाटमाथ्यावरून कोकणात उतरतात. पाऊस पडेपर्यंत त्यांना खूप काम असते. पाऊस सुरू झाला की ही मंडळी देशावर परततात. शेतीची कामे तिथे खोळंबलेली असतात. पावसाच्या तोंडावर प्रतिवर्षी गुरांचे तांडेच्या तांडे घाटमाथा चढताना दिसत नाहीत का ?

यंदाही हे लोक हजारो गुरे घेऊन कोकणात उतरले. कोकणात वैरण-काडीही तशी मिळत होती. अन्नपाणी व कामही मिळत होते. दुष्काळी मुलखातील लोकांना ही पर्वणीच. उजाड, काळ्या जमिनीत काडीकाटा फुंकीत गुरांनी जगण्यापेक्षा हा मार्ग बरा होता. ते आले. राबले. जगले. गुरेही जगली. पाऊस येतोसा वाटल्यावर मंडळी परत निघाली. पण ज्या दुष्काळी मुलखातील गुरांच्या पोटी आधी काडीकाटयासोबत काळी माती गेली होती, त्या गुरांनी तुडुंब पाणी प्याल्याबरोबर, आधीच हल्लक झालेल्या शरीरातील आतडयांना मातीचा गिलावा बसला. पोटे फुगली. घाटाची वाट चढता येईना. पाय एक-मेकात अडखळू लागले. चार-चार काठ्या पाठीत बसल्या तरी पाय अवसान धरीनात ! पाऊल पुढे पडेना. मग ही गुरे रस्त्यात सोडून पुढे जाणे, एवढाच मार्ग उरला ! थांबला तो तिथेच संपला. असे मानून इतरांना हाकीत मंडळी पुढे निघून गेली.

–रा. म. बिवलकर

¤ आपल्या २१ जुलैच्या 'माणूस' अंकात श्री. पंढरीनाथ चौधरी यांच्या 'पालघर-वसई तालुक्यात खताचा गोंधळ' या लेखात वसई तालुक्यातील शिरवली गावी ठेवण्यात आलेल्या खताच्या साठ्याबाबत माजी उपसभा-पती म्हणून माझ्या नावाचा उल्लेख श्री. चौधरी यांनी खोडसाळपणाने केला आहे. त्याबाबत मी हा खुलासा करीत आहे.

वसई तालुका पंचायत समितीने शेतकऱ्यांना योग्य वेळी खताचा पुरवठा व्हावा म्हणून कोल्हीचिंचोटी, शिरवली, नाके येथे खताची केंद्रे उघडली व या सर्व ठिकाणी खत विक्री चालू केली. शिरवली गावीदेखील खतपुरवठा कर-ण्यात आला. शिरवली गावी शिरवली सेवा सहकारी संस्थेचे गोदाम आहे. पण ते सकाळी ८ ते १२ व दुपारी ३ पासून संध्याकाळी ६ वाजेपर्यंत चालू असते.

पृष्ठ ६४ वर

# केंद्रीकरण हा सत्तेचा स्वभाव

## श्री. ग. मा.

मी लिहिलेल्या 'श्रीगुरुजी' (माणूस दिनांक १६ जून) या लेखावर मतप्रदर्शन व टीका करणारा सुधीर बेडेकर यांचा 'गुरुजींनंतरचा रा. स्व. संघ' हा लेख गेल्या माणूस अंकात प्रसिद्ध झाला आहे. मुख्यतः बेडेकरांचे दोन आक्षेप आहेत. १. राजसत्तेचे गुंतागुंतीचे, गुंतलेले व वर्गीय स्वरूप मी किंवा लोकसेवक संघाची कल्पना मांडणाऱ्यांनी ध्यानात घेतलेले नाही. त्यामुळे दंडहीन समाजक्रांती हा आमचा विचार अव्यवहार्य, अशक्य कोटीतला आहे. २.रा. स्व. संघाचे स्वरूप क्रांतिकारक परिवर्तनाला विरोधी आहे. शिवाय या बेडेकरांच्या लेखात काही चुकीची, पूर्वग्रहदूषित विधाने अधूनमधून पेरलेली आहेत, मार्क्सवाद व डावी विचारसरणी यांच्या अंतिम विजयाचा एक ठराविक, काहीसा भाबडा आशावादी सूरही व्यक्त झालेला आहे.

मुख्य दोन आक्षेपांपैकी पहिल्याचा विचार जरा विस्ताराने करू.

बेडेकर म्हणतात: शासन हे समाजांतर्गत चालणाऱ्या प्रक्रियांमध्येच गुंतलेले असते. चालू व्यवस्था तगवण्याचे ते एक हत्यार असते; ती तुम्हाला बदलायची असेल तर या हत्याराविषयी उदासीन राहून चालणार नाही. वरिष्ठ वर्गाचे हे हत्यार मोडून टाकून, नव्या व्यवस्थेला साजेसे असे हत्यार पाहिजे.

गांधीजींची लोकसेवादलाची कल्पना फसली ती यामुळे. केवळ काँग्रेसवाले स्वार्थी व सत्तालोभी होते म्हणून नव्हे, तर वर्गहीन समाजच फक्त शासनरहित असू शकतो यामुळे."

यातील 'उदासीन' व 'शासन रहित' हे शब्द महत्त्वाचे आहेत. मी ज्याला 'अलिप्त' लोकसेवा म्हटले ज्याला बेडेकर उदासीनपणा, शासनरहितपणा समजल्यामुळे त्यांचा घोटाळा झालेला आहे. लोकसेवकांनी 'उदासीन' असावे अशी गांधीजींची कल्पना तर निश्चितच नव्हती, गुरुजींचीही नसावी. परंतु राजसत्तेच्या आधीन न होता, त्या यंत्रणेत स्वतःला अडकवून न घेता मुक्तपणे, स्वतंत्रपणे लोकसेवकांनी परिवर्तनाचे, समाजधारणेचे कार्य करावे, एखाद्या खुर्चीत बसून राहण्यापेक्षा लोकात फिरावे, मिसळावे, त्यांना शिक्षण द्यावे, अन्याय असेल तेथे प्रतिकारासाठी सज्ज करावे अशी ही कल्पना आहे. लेखात मी मुद्दामच आर्य चाणक्याची, विद्यारण्यांची उदाहरणे दिली. एकाने नंदांची भ्रष्ट राजवट धुळीला मिळवली होती; दुसऱ्याने दक्षिणेत, मध्ययुगीन भारतात एका स्वतंत्र हिंदु राज्याच्या स्थापनेला चालना दिली. शेवटी या दोन्ही व्यक्ती

निवृत्त झाल्या तरी राजसत्तेची एवढी उलथापालथ घडवून आणणाऱ्यांना आपण 'उदासीन', शासनसत्तेचे महत्त्व व मर्म न ओळखणारे म्हणू शकतो का ? गांधीजी आणि उदासीनता ही तर दोन टोके आहेत. शेवटच्या क्षणापर्यंत राजसत्तेवर अंकुश चालविण्याची, जनतेची आत्मशक्ती जागृत करण्याची, यासाठी अहिंसक पर्यायांचा शोध घेण्याची या महात्म्याची धडपड थक्क करून सोडणारी आहे. या 'अलिप्त' लोकसेवकांनी राजसत्तेचे महत्त्व, तिचे गुंतागुंतीचे, प्रस्थापितात गुंतलेले स्वरूप पूर्णपणे ध्यानात घेतले इतकेच नव्हे, तर राजसत्तेच्या मर्यादाही त्यांनी ओळखलेल्या होत्या. 'शासनसत्ता ही समाजाच्या वर, पलिकडे अशी काही असते' असे त्यांनी मानलेले दिसत नाही. असे असते तर, गुरुजी रामकृष्ण आश्रमात होते तेथेच राहिले असते; गांधीजींनी विधायक कार्याचा पसारा आणखी वाढविला असता. पण दोघेही शेवटपर्यंत राजसत्तेशी कधी विरोधी, कधी सहकारी संबध ठेवून होते आणि तरीही 'अलिप्त' होते. राजसत्तेचे वर्गीय स्वरूप मान्य करण्याची बेडेकर संप्रदायाची अट मात्र त्यांनी पूर्ण केलेली दिसत नाही. तरीपण अन्याय करणाऱ्या वर्गांविरुद्ध, हितसंबंधांविरुद्ध उभे राहण्याची ताकद त्यांच्याजवळ होती, तशी दृष्टी होती असे मानायला भरपूर जागा आहे. राजसत्तेचे हत्यार वेळप्रसंगी, कालमान पाहून वापरायचे, पण या हत्याराचे आपणच बळी व्हायचे नाही, हा साम्यवादी तत्त्वज्ञानाच्याही-पलिकडे जाणारा एक विचार याच्या मुळाशी आहे व महाभारतकाळापासून भारतीय राजनीतीज्ञ तो मांडत आलेले आहेत. 'राजा कालस्य कारणम्' हा सिद्धांत मांडणाऱ्या व्यासांना राजसत्तेचे महत्त्व व स्थान कळले नव्हते असे समजणे जरा धाडसाचेच ठरेल. पण राजसत्ता म्हणजे सर्वकाही नाही, व्यापक समाज जीवनाचा तो एक भाग आहे, या भागावरही योग्य ते नियंत्रण हवे, हे नियंत्रण अखेरीस लोकांच्या हाती पण लोकहिताचा प्रवक्ता म्हणून दंडहीन लोकसेवक याकामी कमी धोक्याचा, असा यतीवर्ग कल्पनेमागील विचार आहे. या यतीवर्गाने अगदी आपत्प्रसंगी हत्याराला (सत्तेला) स्पर्श केला पाहिजे. नाहीतर हे हत्यारच ते घडविणाऱ्या यतीवर उलटते, त्याचा बळी घेते.

आपणच घडविलेल्या हत्याराचे बळी होण्याचा दुर्दैवी प्रसंग यतीवर्गावर किंवा आधुनिक परिभाषा वापरायची तर क्रांतिकारक गटावर येतो असा अगदी अलिकडच्या इतिहासाचाही दाखला नाही काय ? केंद्रीभूत होणे हा कुठल्याही सत्तेचा स्वभाव असतो. मग ती धार्मिक क्षेत्रातील असो वा राजकारणातली असो. अगदी कामगार किसानांची सत्ताही याला अपवाद ठरू शकत नाही. सत्ता हळुहळू केंद्रीभूत होते आणि या अतिरिक्त केंद्रीकरणामुळे ती भ्रष्ट होत जाते, तिचे वर्तुळ लहानलहान होते, ती साचून, साकळून मुठभरांच्या हातचा खेळ बनते. हा दोष एखाद्या व्यक्तीचा

नसतो. सत्तेच्या या स्वाभाविक प्रवृत्तीमुळे भ्रष्ट व्यक्तीच स्पर्धेत हळुहळू पुढे येत राहतात, अधःपात वाढत जातो. ही प्रवृत्ती रोखण्यासाठी वेगवेगळे उपाय अगदी क्रांतिकारक सत्ताधाऱ्यांनाही वेळोवेळी योजावे लागतात. स्टॅलिनला शुद्धीकरणाच्या मोहिमा काढाव्या लागल्या. माओला सांस्कृतिक क्रांतीचा धक्का द्यावा लागला. पण सत्ताधाऱ्यांनीच या मोहिमा, हे धक्कातंत्र वापरण्यातही धोका असतो. सत्तेचे केंद्रीकरण अधिकच वाढते. म्हणून हे कार्य विकेंद्रित पद्धतीने व्हावे असा लोकसेवक पर्यायामागील विचार आहे. लोकसेवकाने दंडहीन असावे, पण दंडहीनता म्हणजे शक्तिहीनता नाही. निदान गांधीजींच्या कल्पनेतला लोकसेवक तरी शक्तिहीन नव्हता. तो फक्त दिल्ली-मुंबईत राहण्यापेक्षा खेडोपाडी, विखुरलेल्या पण असंघटित नव्हे अशा अवस्थेत राहावा अशी त्यांची कल्पना होती. त्याने किंवा अशा संघटनेने ग्रामस्वराज्याचे काम करावे अशी त्यांची अपेक्षा होती. सत्तेच्या अटळ केंद्रीकरणाला पायबंद घालण्याचा हा एक त्यांचा प्रयत्न होता. वर्ग आणि विषमता असल्याने हा प्रयत्न फसला, केवळ वर्गविहीन समाजातच हा आदर्श अस्तित्वात येऊ शकेल हे बेडेकरांचे म्हणणे बरोबर नाही. वर्गविहीन समाज रशियात आहे हे खरे असेल तर तेथे का सत्तेचे अधिकाधिक केंद्रीकरण सुरू आहे ? का तेथे धंदेवाईक राजकारणी, नोकरशहा सत्तेच्या यंत्रावर आपला ताबा अधिकाधिक जमवीत आहेत ? तेथे लोकसेवकत्वाची गांधीजींनी मांडलेली कल्पना मुळापासूनच अस्तित्वात नव्हती, त्या देशातील सत्तांतरे, चळवळी यांचा ढाचाच वेगळा आहे हे यामागील कारण आहे. आणि विषमता, वर्गविग्रह आहेत म्हणून तर लोकसेवकांची खरी समाजालाही गरज आहे. ही सामाजिक दुःखे संपली तर हवा कशाला तो लोकसेवक ? जो तो आपले दुःख निवारण करून घ्यायला समर्थच होईल. आज ही दुःखे आहेत म्हणून लोकसेवकाची गरज आहे. फक्त एक दुःख नाहिसे करताना दुसरे पहिल्यापेक्षाही भयानक दुःख मानगुटीवर बसू नये म्हणून हा विकेंद्रित पर्याय पुढे मांडलेला आहे. सत्तेच्या अटळ तर्कशास्त्राला दिलेला हा एक छेद आहे. हा परंपरेने हिंदुस्थानात चालतही आलेला आहे. गुरुजींच्या निधनानिमित्त लिहिलेल्या लेखात मी तो पुन्हा मांडला एवढेच. आचार्य जावडेकरांनीही यासंबंधी पूर्वी लिहिलेले आहे.

२ : या अपेक्षा संघाकडून पूर्ण होऊ शकतील की नाही हा प्रश्न अगदी वेगळा आहे व त्याचे खरे, निर्णायक उत्तर संघाला प्रत्यक्ष कृतीनेच आज नाही उद्या द्यावे लागणार आहे. मी याबाबत काही लिहिणे, विधाने करणे तितकेसे बरोबर ठरणार नाही. बेडेकर जो मार्क्सवादी वर्गसिद्धांत मानतात त्यानुरोधाने त्यांनी केलेले संघाच्या असमर्थतेबद्दलचे विवेचन ठिकच आहे. ते नवीनही नाही पण अगदी टाकावूही नाही. काही भाग त्यातला संघस्वयंसेवकांनी अवश्य विचारात घेण्याजोगा

आहे. विशेषत: नव्या मूल्यांची जाण हवी हा बेडेकरांचा आग्रह योग्यच आहे. केवळ राष्ट्रवाद, केवळ प्रामाणिक व नेकीचे आचरण पुरेसे नाही हे कोणीही मान्य करील. पण प्रश्न असा येथेही उपस्थित होऊ शकतो, की बेडेकरांनी तरी ही जाण काही चिकटवलेल्या वाक्यांपलिकडे कुठे व्यक्त केली आहे? त्यांचेही एकूण प्रतिपादन जुन्या, मार्क्सवादी चौकटीत अगदी घट्ट ठाकूनठोकून बसवलेले आहे, अडकून बसलेले आहे. हे प्रतिपादन आजवर, निदान हिंदुस्थानात तरी फारसे बरोबर ठरत आलेले नाही. बेडेकर इतिहासाच्या रणांगणाचा उल्लेख करतात. ही रणांगणे बहुधा दूरची, बाहेरची असावीत, कारण आपल्याकडील रणांगणांवर तरी वर्गीय संघटनांचा, विचारसरणीचा आजवर पराभवच होत आलेला आहे. विशेषत: येथील मध्यमवर्गीय समाजजीवनाची (शहरातल्या व खेड्यातल्याही) या वर्गीय विचारकांनी व राजकीय कार्यकर्त्यांनी जी उपेक्षा केली, जो तिरस्कार केला तो या पराभवाला मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरलेला आहे हे बेडेकरांसारख्या तरुण मार्क्सवाद्यांनी तरी ध्यानात घ्यायला हवे. मध्यमवर्गाचे म्हणून जे दोष नेहमी दाखविले जातात ते समाजाच्या इतर घटकातही असतात, आहेत. आणि असले-नसले तरी या वर्गाची परंपरागत व नवी ताकद विचारात घ्यायला हवी. अगदी अर्थव्यवस्थेतील या वर्गाच्या स्थानाचा, मोक्याच्या जागेचा तात्पुरता, व्यूहात्मक विचार करायचा ठरवले तरी ही ताकद, प्रस्थापिताला अडवण्याची ही कुवत या वर्गाजवळ आहे, ती वाढते आहे हे मान्य करावे लागेल. बँका बंद पडल्या तर प्रस्थापित हादरेल की दहा-पाच गिरण्यांमधील संपामुळे? आणि बँक कर्मचाऱ्यांना कामगार म्हणणे, गरीब किसान, शेतमजुरांच्या वर्गात त्यांना बसविणे ही या शब्दाची अगदी थट्टा आहे. मध्यमवर्ग हे काही साचलेले एखादे तळे किंवा डबके नाही. विज्ञानाच्या प्रगतीमुळे, नव्या नव्या उद्योगतंत्रामुळे त्याची अंतर्गत रचना, घटना यात सारखे बदल घडत आहेत. तंत्रज्ञ, सेवाक्षेत्रातील व प्रशासनातील घटकांचे प्रमाण व ताकद समाजजीवनात यापुढे वाढत जाणार आहे. तेव्हा संघस्वयंसेवक 'मध्यमवर्गीय' आहेत म्हणून त्यांचा अटळ पराभव निदान मी काही गृहीत धरू शकत नाही. तसेच कोणत्याही एका वर्गाकडे क्रांतीचा, समाजपरिवर्तनाचा मक्ता सोपविणेही मला योग्य वाटत नाही. येथील नव्वद टक्के जनतेला सरसकट एका वर्गात, एका गाठोड्यात कोंबून डाव्या क्रांतीचा उठाव, हेही एक स्वप्नरंजनच आहे. नव्वद टक्के जनतेच्या हिताशी नाते जोडणे मात्र महत्वाचे, मूलभूत. एवढाच बेडेकरांचा आग्रह असेल तर त्याविषयी दुमत नाही. हे जोडण्यासाठी राष्ट्रवादाच्या तरफेचा उपयोग होईल असा आमच्यासारख्यांचा विचार. यासाठी येथील मध्यवर्ती, मुख्य राष्ट्रवादी प्रवाह रुंद, खोल करणे आम्हाला निकडीचे वाटते. बेडेकर या प्रवाहापासून अलग, तुटलेले राहत आहेत. त्यांनी असे राहू नये. कारण इतिहास असे राहणाऱ्यांच्या विरुद्ध गेलेला आहे. ● ● ●

# पुन्हा मानवत

## कुणीही यावे : खून करून जावे

निळू दामले

शासन इतके निर्लज्ज असू शकते ह्याची कल्पना नव्हती.

समाज इतका मुर्दाड बनू शकतो ह्याची कल्पना नव्हती.

१९ मेच्या 'माणूस'मधून चार अधिकृत खून आणि इतर रहस्यमय मृत्यूंची हकिकत वेशीवर टांगण्यात आली.

१९ मेच्या वार्तापत्रांत मी शेवटी म्हटले होते ' पुढल्या खुनाच्या बातमीची वाट पाहण्यापलिकडे आपल्या हातात काय आहे?' उपरोधाने काढलेले उद्‌गारही खो करून दाखवण्याचा चंगच गुन्हेगार आणि पोलीस दोघांनीही बांधलेला दिसतो.

त्या नंतर ८ जूनला एक रहस्यमय मृत्यू झाला आणि त्या मृत्यूच्या चौकशीची मागणी मी केली होती. काहीही घडले नाही.

पण मानवतातल्या गरीब निष्पाप मुलींच्या कपाळावर मृत्यू लिहूनच ठेवलाय ह्या मुर्दाड समाजाने. त्याला त्या मुली तरी काय करणार?

दि. २९ जून : कलावती बोंबले नावाच्या मुलीचा खून. खुनाची जागा बदललेली. पोलिसांनी खून आहे हे कबूल केले हे नशीब. हा खून झाल्यावर मी पुन्हा तेथे गेलो. चौकशी केली. खुनाची जागा पाहिली.

पोलीस म्हणे तपास करत आहेत.

ह्या कलावतीच्या खुनाला १३ दिवस लोटतात न लोटतात तोच १३ जुलैला आणखी एका निष्पाप बालिकेचा खून. हलीमा तिचे नाव.

दगडांनी तिचे डोके ठेचले होते. इतक्या लहान वयाच्या ह्या मुलीवर अमानूष बलात्कार करण्यात आला होता.

ह्या हलीमाला आदल्या दिवशी दुपारी ३ नंतर भर वस्तीतून नेले असावे. खुनाची वेळ साधारणपणे दुसऱ्या दिवशी सकाळची होती. खुनाच्या जागी रक्ताचे थारोळे होते. म्हणजेच खून त्याच ठिकाणी झाला असावा.

ह्याचा अर्थ आदल्या दिवशीची संध्याकाळ आणि पूर्ण रात्र ही मुलगी जिवंत असावी. एकतर तिला बेशुद्ध करून ठेवण्यात आले असावे किंवा तोंडात बोळे घालून ठेवण्यात आले असावे. इतके तास लपवून ठेवायला एखादी जागा शोधून काढण्यात आली असावी. मानवत सारख्या छोट्या

गावातही अशा जागेचा आणि घटनेचा तलास लागू नये ?

कुठेतरी लपवून ठेवणे याचा अर्थ इतरही काही लोक ह्यात सामील असले पाहिजेत. म्हणजेच हे कोण्या एकाचे काम नाही हे पुन्हा स्पष्ट होते. तरीही खुनाला वाचा का फुटत नाही ?

एखाद दोन पोलीस अधिकारी प्रामाणिकपणे चौकशी करत आहेत. त्यांचे कोणतेही हितसंबंध मानवतमध्ये नाहीत. तरीही खून होतच राहतात ह्याचा अर्थ काय घ्यावा ?

ह्या १३ जुलैच्या खुनानंतर पुन्हा मी पोलीस अधिकाऱ्यांना भेटलो. गावातल्या अनेक प्रतिष्ठितांना भेटलो. दुर्दैवी मुलीच्या नातेवाईकांना भेटलो.

मानवत हे गाव आहे का मेंढ्यांचा कोंडवाडा आहे ? कोणीच का काही बोलत नाही ?

व्यापाऱ्यांना खडसावून विचारले. त्यांच्या घरी कोणी मरत नाही. म्हणून येव्हढी हेळसांड ? गावात किमान ६ मुलींचा खून झाला आहे. सगळ्या मुली बिचाऱ्या गरीब घरातून आल्या आहेत. समाजात त्यांचे वजन नाही, आमदारांकडे त्यांचा वशिला नाही. त्यामुळेच गावात कोणी काही करायला तयार नाही.

गावातल्या सर्व मोठ्या व्यापारी व प्रतिष्ठित मंडळींनी गेल्या निवडणुकीत गरिबांचे कल्याण करण्याच्या शपथा घेऊन गाय बछडावाल्यांना पैसे दिले होते. त्यावेळी त्यांना गरिबांची खूप कळकळ असावी. पण इतके भयानक खुनांचे सत्र गावात चालले असताना गावात एक समिती स्थापण्यात आली नाही; एकत्र येऊन पोलिसांना मदत करण्यासाठी किंवा त्यांच्यावर आवश्यक दबाव आणण्यासाठी कोणतेही प्रयत्न झाले नाहीत.

का ? डालडा, रॉकेल, धान्य ह्या वस्तूंच्या काळ्याबाजारात ह्या गावातल्या व्यापाऱ्यांचे हात अडकले आहेत म्हणून पोलिसांशी भांडायला हे तयार नाहीत काय ? की दुष्काळातल्या अगतिकतेचा फायदा घेऊन, 'दोन नंबरचा धंदा करून कमावलेल्या पैशामुळे त्यांना सुस्ती व मस्ती आली आहे ? समाजाने काय समजायचे तरी काय ?

मी जेव्हा मानवतला पोचलो तेव्हा आमदार नखाते (ह्यांना 'माणूस'चा वाचक ओळखतोच ! ) तेथे आले होते. गावातले कधी बाहेर न पडणारे लोकही त्यांच्या भेटीला चालले होते. लगबगीने काही प्राध्यापकही स्कूटरवरून जाताना पाहिले. पाऊस पडला होता. चिखल होता. तरीही ही सर्व मंडळी नखात्यांना मुजरे करायला निघाली होती. किती त्रास घेऊन !

पण दोनच दिवसांपूर्वी हलीमाचा खून झाला होता हे त्यांच्या गावीही नव्हते. ह्यापैकी कोणीही – आमदार नखातेंसह – कोणीही त्या हलीमाच्या घरी जाऊन आले नाही. हलीमाच्या उत्तरक्रियेसाठी तिच्या बापाकड पैसे नव्हते. नंतरच्या 'तिसऱ्या दिवशी' रीतीरिवाजानुसार फुटाणे वाटण्यासाठी मजुरी करून जगणाऱ्या तिच्या आईबापांना भीक मागायला लागली.

आपल्या मस्तीत पेट्रोलचा धुराडा करणाऱ्या आमदारांजवळ आणि आमदारांची पानाची पिंक आपल्या ओंजळीत झेलण्यासाठी आसुसलेल्या 'त्या' मानवतकरांजवळ हलीमाच्या चोकशीसाठी वेळ नव्हता, उत्तरक्रियेसाठी पैसा नव्हता.

रिक्षातून तडफडत जाणारा व्यापारी (आमदारांना भेटायला) ह्याच व्यापाऱ्याने नखातेंना त्यांच्या मुलीच्या लग्नात सोन्याची साखळी दिली होती. तोच व्यापारी मानवतातला होता. हलीमा व इतर दुर्दैवी गरीब मुलींचे अश्रू पुसायची दानत त्याच्याजवळ नव्हती.

गरीब मुलींच्या खुनाची मालिका कशी थांबणार?

मामला एवढा सीधा नाही.

ज्यांच्या मुलींचा खून झाला त्यांना भेटलो. खोदून खोदून प्रश्न विचारले, कोणीच का काही बोलायला तयार नव्हते त्याचा पत्ता परवा लागला. खुनाच्या तपासासाठी काही पोलीस गावात फिरत आहेत. हे विशिष्ट पोलीस आपल्याबरोबर अशा माणसांना घेऊन फिरत आहेत की ज्यांना मानवत शहर गुंड म्हणून ओळखते, ह्या गुंडांचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे (गुन्हेगार जगातले असल्याने) खुनाशी किंवा खुन्यांशी संबंध असला पाहिजे. एकाने मला उलट प्रश्न विचारला 'साहेब, बदमाषच जर 'कोणी बदमाशी केली?' असा प्रश्न पोलिसांना बरोबर घेऊन येऊन विचारू लागले तर आम्ही कसे उत्तर देणार? कसे खरे सांगणार?'

ज्यांचा गावातल्या गुन्ह्यांशी संबंध होता असा एक पोलीस, जो दुसऱ्या गावी बदलीवर होता, त्याने मुद्दाम ह्या खून तपासासाठी वाढवून घेतलेल्य पोलीस कुमकीत स्वतःचा समावेश करून घेतला आहे! कारण?

ज्या परांजे सायबाची (पोलीस सब इन्स्पेक्टर) बदली करण्यात आली होती तो परांजे अजूनही सारखा मानवतमध्ये येऊन जात असतो.

मानवतात असलेल्या काही पोलिसांबद्दल आणि अधिकाऱ्यांबद्दल मानवतात लोक चांगले बोलत नाहीत. (पोलीस आणि शुद्धता ह्या दोन गोष्टी एकत्र सापडणे जरा कठीणच!) गावातल्या गुन्ह्यात व गुन्हेगारी जगतात कोणाचे कसे हात अडकले आहेत हे गावातले लोक गुपचूप सांगतात, कुजबुजतात.

असा प्रकार असताना खुनाचा तलास लावणे कठीण होणारच!

ना. शरद पवारांनी संबंधीत अधिकाऱ्यांना मुंबईला बोलावून चर्चा केली आहे असे समजते. पण तेवढ्याने भागेल असे वाटत नाही. तपास न लागण्यापाठी काय कारणे आहेत ती पवारांनी स्वतः लक्ष घालून हुडकून काढली पाहिजेत. ती त्यांची जबाबदारी आहे माझी नाही.

इसवी सनापूर्वी १५-२० शतके पूर्वीच्या समाजासारखा कारभार मानवतात चालला आहे, जणू सरकार नावाची चीज तेथे अस्तित्वातच नाही! गावात एक कॉलेज आहे, तिथली तरुण मुलेही काही करत नाहीत, 'मानवत बंद' व शासनाला अडवून जाब विचारण्याचे सामर्थ्य दाखवत नाहीत,

हलीमा! थांब. तुझ्याबरोबर आणखीही काही जणी येणार आहेत. ● ●

## मुक्काम पुणे

# जेव्हा चव्हाण रागावतात....

कार्यक्रमाचे आमंत्रण होते—पण जाईनच अशी खात्री नव्हती. कारण कार्यक्रम होता गौरवपर. अनुभव असा की गौरवपर कार्यक्रम बरेचसे औपचारिक व मुजरेवाईक होतात. अगदी मचूळ! सध्याच्या प्रक्षुब्ध व अतिशय स्फोटक परिस्थितीमध्ये असे कार्यक्रम म्हणजे वास्तवापासून दूर पळण्याचा, परस्पर प्रशंसेचा एक केविलवाणा प्रयत्नच ठरतो.

पण गेलो! आणि वाटले, नसतो गेलो तर पश्चात्ताप झाला असता. एक संध्याकाळ अचानकपणे उजळून निघाली.

कार्यक्रम संध्याकाळी साडेसहा वाजता होता. झिमझिम पावसात थोडे आधीच बालगंधर्व रंगमंदिरात पोहोचलो. थोडे आश्चर्य वाटले. विशेष गर्दी नव्हती. चि. वि. जोग (महाराष्ट्र बँकेचे चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर) यांच्या गौरवाचा कार्यक्रम आणि एवढीच गर्दी? जोगांचे नाव पुण्यात व महाराष्ट्राबाहेरही अतिशय सुपरिचित. गेली तीस वर्षे महाराष्ट्र बँकेचे कर्णधार या नात्याने त्यांनी अक्षरशः हजारो माणसांना मदतीचा हात पुढे केलेला—पण गर्दी बेताची होती हे खरे.

रंगमंदिरात जाऊन बसलो. प्रथमदर्शनी पडदा उघडाच होता. काही वेळाने तो मिटला. हळूहळू रंगमंदीर भरू लागले.

वसंतराव वैद्य, चंद्रकांत किर्लोस्कर, बाबुराव पारखे, एस. एम. जोशी, कुलगुरू महाजनी, पुण्यातील छोटे मोठे उद्योगपती, जनता बँकेचे जमदग्नी, त्यांचे बंधू प्रि. जमदग्नी, डॉक्टर ग्रँट, शिवाजीराव ढेरे, मामासाहेब मोहोळ अशी वेचक मंडळी प्रेक्षागारात उठून दिसत होती. बाकी प्रेक्षकांपैकी निम्मा अधिक प्रेक्षकवर्ग महाराष्ट्र बँकेतील अधिकारी व कर्मचारी यांचा होता.

पावणेसात वाजले. समोरचा स्टेजवरील दर्शनी पडदा मिटलेलाच. मंडळी हलक्या आवाजात गप्पा मारीत बसलेली. पडदा पडलेला असल्याने स्टेजवरील हालचाल काहीच कळत नव्हती.

थोड्याच वेळात अनंतराव पाटील, नरूभाऊ लिमये वगैरे खाशा गोटातील मंडळी रंगमंदिरात आली. त्यावरून

बोध झाला, की समारंभाचे प्रमुख पाहुणे ना. यशवंतराव चव्हाण आलेले आहेत. वार्ताहरांचा एक जथाही येऊन (स्टेजसमोरील तबलापेटीवाल्यांच्या जागी) स्थानापन्न झाला.

पडदा उघडला. लौकरच आपल्यापुढे एक नाटय उलगडणार आहे याची काहीच कल्पना नसलेला प्रेक्षकवर्ग मरगळलेल्या मनाने स्टेजकडे पाहू लागला.

स्टेजवर निळूभाऊ लिमये माईक-समोर उभे होते. त्यांच्या शेजारी डॉ. वि. म. दांडेकर, चिं. वि. जोग, यशवंतराव चव्हाण व सौ. कमल जोग अशी मंडळी बसलेली होती. आपले पुण्याचे खासदार व नियोजन राज्य मंत्री मोहन धारिया हेही होते.

निळूभाऊंनी समारंभाचे प्रयोजन व रूपरेषा सांगितली. २५ जानेवारी १९७२ ला जोग यांना वयाची साठ वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त त्यांना एखादी थैली देण्याचा त्यांच्या चाह-त्यांचा विचार होता. पण जोगांनी नकार दिल्याने या मंडळींनी असे ठर-विले, की त्यांच्या गौरवार्थ आर्थिक विषयावर एखादा दर्जेदार ग्रंथ प्रसिद्ध करावा. यासाठी 'महाराष्ट्राची अर्थ-व्यवस्था' हा विषय निवडण्यात आला. डॉ. दांडेकर संपादक मंडळाचे अध्यक्ष झाले. महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील सतरा प्रमुख बाबींवर अधिकारी अभ्यासकांकडून लेख लिहून घेण्यात आले. या ग्रंथाचे प्रकाशन आज (दि. १८ जुलै १९७३ बँकराष्ट्रीयीकरणाला बरोबर चार वर्षे पुरी होत असताना) यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते संपन्न होणार होते.

निळूभाऊंच्या प्रास्ताविकानंतर श्री. जोग यांना चाहत्यांकडून हार घालण्यात आले. चव्हाणांनाही हार घालण्यात आला.

मग डॉक्टर दांडेकर बोलण्यास उठले.

डॉ. दांडेकर हा एक अवलिया माणूस. पोषाख ठराविक आणि जरा चाकोरी बाहेरचा. लांबलचक दाढी, मानेवर रूळू पाहणारे केस–विलक्षण चंचल व तेजस्वी डोळे–एकंदर गृहस्थ स्वतःच्याच मस्तीत दंग! येथल्या रोटरी क्लब वातावरणात बिलकूल न शोभणारा!

त्यात अलिकडे दांडेकरांचे नाव डाव्या चळवळीशी अधिक जोडले जाऊ लागलेले. दुष्काळ प्रकरणी खुद्द वसंत-राव नाईकांशी दोन हात केलेले. सर-कारच्या गध्धेपणावर तिखटजाळ लेखांचा वृत्तपत्रात धडाका उडवून देणारे! तर एवंगुणविशिष्ट दांडेकर बोलण्यास उठतात.

त्यांचे भाषण सुरू होताना यशवंत-राव आज प्रकाशित होणारा ग्रंथ चाळीत बसलेले. चेहरा विलक्षण गुब-गुबीत–अंगकाठी किंचित कमी झालेली. ओठ जरा बाहेर वळलेले–सत्तेने जड झालेली मुद्रा–डोक्यात बहुधा पुण्याच्या महापौरपदाच्या राजकारणाविषयी विचार असावेत.

चष्मा काढत, घालत, हातात खेळ-वीत, डॉ. दांडेकरांनी सुरवात केली.

या ग्रंथाचे प्रयोजन, संकल्पन याविषयी थोडक्यात बोलून त्यांनी असा खुलासा केला की 'या ग्रंथात महाराष्ट्राच्या प्रगतीचा गेल्या दहा बारा वर्षाचा आढावा घेतला आहे. 'प्रगती' हा शब्द मी अवतरण चिन्ह घालून वापरीत आहे. याचे कारण असे की म्हणण्यासारखी प्रगती झालेली नाही. पण एक जनरल शब्द म्हणून मी हा वापरीत आहे' असे दांडेकर म्हणाले, आणि सभेचे वातावरण बदलू लागले.

ते पुढे म्हणाले, 'आजचे प्रमुख पाहुणे यशवंतराव यांनी दिल्लीला जाताना मागे ठेवलेला महाराष्ट्र कसा आहे याचे चित्रण या ग्रंथात आहे. दुष्काळाची दोन तीन वर्षे सोडली व पहिली एक दोन वर्षे सोडली तरी महाराष्ट्राचे शेती उत्पादन गेल्या १२ वर्षात फारसे वाढलेले नाही असे आकडेवारी सांगते. उलट ते कमीच झाले आहे. महाराष्ट्र आघाडीवर आहे असा आपला एक उगाचच गैरसमज आहे, पण आकडेवारीची साक्ष फार वेगळी आहे.

'आपल्या विकासासाठी आपण दोन यंत्रणा राबवीत आहोत. एक म्हणजे पंचायती राज्य व दुसरी म्हणजे सहकारी चळवळ. पंचायती राज्यावर या ग्रंथात लेख नसल्याने व पदरचे मी काही सांगू इच्छित नसल्याने त्याचा मी उहापोह करीत नाही. पण सहकारी चळवळ व कारखानदारीबाबत मात्र बोलतो. सामान्य ग्राहक व सहकारी कारखान्यांचे कामगार या दोहोंचे दृष्टीने खाजगी व सहकारी या कारखानदारीत विशेष फरक जाणवत नाही.

—सहकारी साखर जास्त गोडही नाही वा स्वस्तही नाही. (टाळ्या)

(ग्रंथ चाळणे बंद करून यशवंतराव अस्वस्थपणे इकडे तिकडे पाहू लागतात. दांडेकरांची वरकरणी सौम्य पण अंतर्यामी बोचरी, अचूक वाक्ये आता टाळ्या घेऊ लागलेली आहेत. सभा आता तापू लागली आहे.)

: सहकारी कारखानदारीवर काही खास सामाजिक जबाबदारी आहे की नाही याचा विचार झाला पाहिजे असे मला वाटते, असे म्हणून दांडेकर उद्योगक्षेत्राकडे वळतात. मुंबईमुळे महाराष्ट्राला औद्योगिकदृष्टया उगाचच पुढारलेले मानले जाते असे सांगून ते म्हणतात 'पुण्यामुंबईकडे उद्योग एकवटले आहेत व बाकी महाराष्ट्र तसाच अविकसित आहे. इतर ठिकाणी उद्योग जावेत म्हणून इतकी महामंडळे निघाली आहेत, की त्यांची मोजदाद ठेवणे कठीण आहे. आता या मंडळाचे मुख्य काम तेच असल्याने ती काहीतरी करतात असे मानले पाहिजे, पण परिस्थितीत बदल नाही. (टाळ्या)

मोठेच नव्हे तर लहान उद्योगदेखील मुंबईभोवती केंद्रीत होतात. गेल्या १० वर्षात २१००० छोटे उद्योग निघाले त्यातले १२००० मुंबई-ठाणे या भागात आहेत.

मुंबईव्यतिरिक्त महाराष्ट्र इतर अनेक राज्यापेक्षा मागासलेला व दरिद्री आहे. मुंबईत उद्योग काढू दिले नाहीत तर ते उद्योग इतर ठिकाणी जातील

ही समजूत खरी नाही.

याचे कारण असे की, मुंबईतील उद्योग बाहेरच्या प्रांतातील भांडवलावर निघतात व हे भांडवल मुंबईत जागा नसेल तर इतर महाराष्ट्रात जाण्याऐवजी दुसऱ्या प्रांतात जाते. मुंबई शहराची सर्वच परिस्थिती आवाक्याबाहेर गेली आहे असे आकडेवारी सांगते. मुंबईची वाढ करू नका असे टाटा कन्सलटन्सीने केलेल्या अभ्यासात निक्षून सांगितले आहे. आता टाटांचा अभ्यास म्हणजे त्यात समाजवादी घोटाळा काही नाही. (हशा-टाळ्या) पण शासनाने हा सल्ला न मानता जुळ्या मुंबईचा घाट घातला आहे.

मुंबईचे काय आकर्षण आहे पाहा, कोठूनही माणूस तेथे जावो, कराडहून जावो-यवतमाळहून जावो (टाळ्या) तो सहा महिन्यात मुंबईचे गोडवे गाऊ लागतो. सुंदर मुंबई सुंदर मुंबई म्हणत या शहरावर आपण किती सार्वजनिक पैसा खर्च करणार आहोत याचा विचार करण्याची वेळ आली आहे.

(या वेळपर्यंत यशवंतराव चक्क रागीट मुद्रा करून दांडेकरांकडे पहात आहेत. कधीही न रागावणारे चव्हाण आता अगदी जाम भडकलेले आहेत.)

मंदमंद हसत दांडेकर आपला हल्ला पुढे चालू करतात. गेल्या दहा वर्षांत कामगारांचे राहणीमान देखील वाढलेले नाही, थोडेसे कमीच झालेले आहे. संप, हरताळ, बंद प्रकार फार होतात असे आपण म्हणतो पण एवढे होऊनसुद्धा कामगार आहे तेथेच राहिला आहे हे विसरता येत नाही. (समोरच चंद्रकांत किर्लोस्कर बसले होते त्यांच्याकडे पाहून 'हे सर्व तुमच्यासाठी खास सांगतो आहे'–इति दांडेकर!) ग्रामीण भागात कुळांना जमीन देण्याबाबत या ग्रंथात असा निष्कर्ष काढला आहे की जेथे जमीनदार गावात रहात नाही तेथेच फक्त कूळकायद्याची अंमलबजावणी होऊ शकली. ग्रामीण भागातील गरिबी हटविण्यासाठी आपण बँकांचे राष्ट्रीयीकरण केले. पण सहकारी व राष्ट्रीयीकृत बँकांचा अनुभव पाहता दारिद्र्याचा प्रश्न कर्ज देऊन सुटणार नाही असे वाटते. कोणते प्रश्न कर्जाने सुटतील व कोणते सुटणार नाहीत हे एकदा निश्चित केले पाहिजे. जोगांना मी सांगेन, की त्यांनी सरकारला हे आग्रहाने सांगावे व कर्ज पुरवठ्याच्या उपयोगाच्या मर्यादा निश्चित कराव्यात.

महाराष्ट्र सरकारकडे वळून दांडेकर म्हणाले, 'महाराष्ट्राच्या राजकारणात व्यवहारवादाच्या नावाखाली छक्क्यापंजांचे राजकारण सुरू आहे. गेल्या दहा वर्षांत व तीन वर्षांच्या दुष्काळात महाराष्ट्र सरकारने कोणती उपक्रमशीलता दाखवली म्हणाल तर लॉटरी सुरू केली व दारू स्वस्त केली. सरकारवर एवढी आर्थिक जबाबदारी असताना गेल्या काही वर्षांत सरकारने करांमध्ये एक पैशानेही वाढ केली नाही.

आता इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रात स्वस्त असलेली एकच वस्तु म्हणजे दारू. (टाळ्या) आम्ही दिल्लीला जाताना एक बाटली घेऊन जातो व

येताना तांदुळ घेऊन येतो. (टाळ्या)

लॉटरीचा तर एवढा गाजावाजा चालू आहे, की बक्षीसे मिळवणारांना आता 'भारतरत्न' पदवी देणेच (टाळ्या) तेवढे शिल्लक राहिले आहे. हे सारे समाजवादात कसे काय बसते ?

(चव्हाणांकडे वळून) परवा चव्हाण साहेबांच्या हस्ते ओबे. रॉय शेरेटेन या पस्तीस मजली हॉटेलचे उद्‌घाटन झाले. (टाळ्या)

या असल्या हॉटेलांचा कोणाला उपयोग आहे ? परकी प्रवासी येतील व परकी चलन मिळेल असे सरकार सांगते. ते कितपत होईल कोण जाणे पण (जोगांकडे वळून) आता या बँकांच्या मंडळींची सेमिनारे व ट्रेनिंग कोर्सिस घेण्याची सोय झाली हे मात्र खरे.' (हशा-टाळ्या)

जवळजवळ ३५-४० मिनिटे अशा समोरासमोर तोफा डागल्यावर दांडेकर म्हणाले, 'तर असे हे एकूण चित्र आहे. इतर राज्ये फार बिघडली आहेत यातच आपण समाधान मानायचे. (टाळ्या) या ग्रंथात माझा लेख नाही. याबद्दलचे गुपित सांगावयाचे तर मी महाराष्ट्रातील नेतृत्वावर लेख लिहिणार होतो. (टाळ्या) पण तो या ग्रंथात घेतला गेला नाही. कारण समितीला तो फार जहाल वाटला. असो. हा ग्रंथ एखाद्या विद्यापीठाला सजेस्टेड रीडिंग म्हणून लागेल अशा स्वरूपाचा आहे. यातील आकडेवारी दुरुस्त करून तो जोगांच्या सत्तरीलाही देता येईल असे म्हणण्यास हरकत नाही.'

दांडेकरांचे भाषण संपले. चव्हाण रागावलेले, सभा पूर्णपणे दांडेकरांच्या प्रभावाखाली अशा परिस्थितीत जोग बोलण्यास उठले. महाराष्ट्र बँकेची थोडी माहिती देऊन व चाहत्यांचे व चव्हाणांचे आभार मानून त्यांनी आपले भाषण आवरले.

मग चव्हाण बोलण्यास उठले. काही वाक्यातच श्रोत्यांच्या असे लक्षात आले की, दांडेकरांच्या अनपेक्षित हल्ल्याने चव्हाण इतके चिडले आहेत की ते नेहमीप्रमाणे भाषण खुलविण्याच्या मनःस्थितीत नाहीत. 'मी येथे आलो याचा मला आनंद वाटतो. जोगांच्या कार्याचा गौरव मी योग्य भूमिकेतून योग्यवेळी केला आहे.' एवढी चव्हाणशैली-मधील दोन वाक्ये बोलून चव्हाण एकदम हमरीतुमरीवरच आले. ते अत्यंत प्रक्षुब्ध स्वरात म्हणाले, 'येथे आल्याने माझा आणखी फायदा झाला. दांडेकरांकडून मला महाराष्ट्राचे आर्थिक चित्र कळले. दांडेकर पंडित आहेत. सल्ला देण्याचे त्यांचे कामच आहे. नुसता सल्ला देणे हे फार चांगले, सुरेख काम आहे. आम्ही ग्रामीण भागातून आलले आहोत. आमच्याकडे सहानुभूतीने पहा. तुच्छता दाखवू नका. येथे बसून टाळ्या मारणे सोपे आहे. सहकारी चळवळीविरुद्ध मीही फार कडवट टीका करतो. पण तुम्ही करता हे चांगले नाही. तुम्ही आम्हाला समजून घ्या.'

'मुंबईबद्दल महाराष्ट्राने पंधरा वर्षांपूर्वी लढा दिलेला आहे. तेव्हा आता मुंबईबद्दल तक्रार करता येणार नाही.

मुंबईतसुद्धा जनतेचे फार मोठे प्रश्न आहेत, त्यावर खर्च केला पाहिजे. मुंबई-बाहेर उद्योगधंदे जात नाहीत याचे कारण तज्ज्ञांना पुण्या-मुंबईतच रहाण्यास आवडते.'

मी महाराष्ट्र सरकारची वकिली करण्यासाठी उभा राहिलो नाही. ते समर्थ आहे—पण नुसती टीका करू नका. दांडेकर ज्या खुर्चीवर बसले आहेत ती खुर्ची धनंजयराव गाडगीळ यांची आहे. गाडगीळांनी सहकारी चळवळीची घडी बसविण्यासाठी प्रत्यक्ष कार्य केले—नुसता सल्ला दिला नाही हे दांडेकरांनी लक्षात घ्यावे.

महाराष्ट्रातील नेतृत्वावरचा आपला लेख दांडेकरांनी जरूर प्रसिद्ध करावा. मग मी पण महाराष्ट्रातील विद्वानांची परीक्षा करणारा लेख लिहीन. महाराष्ट्राच्या नेतृत्वाकडे ते ग्रामीण भागातील आले आहे म्हणून तुच्छतेने पाहू नका.

आपण फक्त पुस्तकातील मते सांगितली हे दांडेकरांचे म्हणणे खोटे आहे. त्यातील एक-दोन लेख मीही चाळले आहेत. या ग्रंथाच्या नावावर दांडेकरांनी आपले पूर्वग्रह खपविले आहेत. मी दांडेकरांना मानतो—पण त्यांनी पूर्वपक्ष केला म्हणून मला उत्तरपक्ष करावा लागला. आपण एकमेकांचे दोष दाखविले हे चांगले झाले. ते दूर करू या.'

असे काही बोलता बोलताच चव्हाण माईक सोडून धैर्यधराच्या थाटात ताडताड पावले टाकीत स्टेजच्या मागच्या बाजूने आपल्या जागेवर जाऊन बसले. त्यांना राग अनावर झाल्याने त्यांनी भाषण अर्धवट सोडले असे श्रोत्यांचे मत झाले.

आभार प्रदर्शनानंतर सभा संपली. गर्दीतून वाट काढीत पावसात आपापल्या घरी जाताना श्रोत्यांच्या मनात अनेक प्रश्न उभे राहिले, त्यापैकी काही असे—

१ : ही सभा मूळ कशासाठी होती ?

२ : दांडेकर ग्रामीण भागाकडे अधिक लक्ष द्या असे म्हणाले तर ग्रामीण जीवनाची-नेतृत्वाची टिंगल करू नका असे चव्हाण म्हणाले. मग दोघात एवढा वाद का झाला ? अखेर ग्रामीण भागात कोण काम करणार ? दोघेही एकमेकांना ग्रामीण भागात जाण्याबद्दल 'पहले आप' म्हणत आहेत असा भास होत होता.

३ : जवळ जवळ तीस वर्षाहून अधिक काळ मुंबई-दिल्लीला घालविणारे चव्हाण आज कोणत्या अर्थाने ग्रामीण आहेत ?

४ : नेहमी हास्य, पाठीवर थाप वगैरे मार्गांनी सभा जिंकणारे चव्हाण आज एवढे का चिडले ? आपला राग त्यांनी आवरला कसा नाही ?

५ : चव्हाण उत्तराच्या भाषणात सारखे 'तुम्ही-आम्ही' असे का करीत होते. हे 'तुम्ही' कोण आणि 'आम्ही' कोण ?

६ : एवढ्या मामुली स्वरूपाच्या लेखांच्या संग्रहाची एवढी तरफदारी दांडेकरांनी का करावी ? त्याच्या संपादनासारखे फालतू काम दांडेकर का

स्वीकारतात ?

७ : दांडेकर-चव्हाण दोघेही जोगांबद्दल काहीच विशेष बोलले नाहीत हे अनुचित नाही काय ?

८ : विद्वानांनी प्रत्यक्ष कार्य करायचे म्हणज नेमके काय करायचे ? दांडेकरांचे दुष्काळनिवारण समितीतील कार्य चव्हाणांना का आठवू नये ?

दुसऱ्या दिवशी वृत्तपत्रे पाहिल्यावर सभेस प्रत्यक्ष हजर असणाऱ्यांच्या मनात आणखी एक प्रश्न उभा राहिला. तो असा की सभेत चव्हाण यांचे वर्तन-भाषण इतके चिडचिडे झाले असता चव्हाणांना अनुकूल असे रिपोर्टिंग कसे झाले ? चव्हाण यांचे उत्तराचे भाषण केवळ काही धमक्या व दांडेकरांचा व्यक्तिगत अपमान एवढ्यापुरतेच मर्यादित होते. त्यांनी फार मोठी समर्पक उत्तरे दिली अशातला भाग नाही. मग मराठी वृत्तपत्रे चव्हाणांचा एवढा उदोउदो का करून राहिली ?

या सर्व मानापमान नाटकाबद्दल (बालगंधर्व रंगमंदिरात हा 'नाटय-प्रयोग' झाला हे एका अर्थाने उचितच ठरते) माझ्या प्रतिक्रिया दोन–

एक म्हणजे दांडेकरांचे मनःपूर्वक अभिनंदन केले पाहिजे. सत्ताधाऱ्यांच्या पुढे लांगुलचालन करण्यात सारा महाराष्ट्र मश्गुल झाला असताना त्यांनी चव्हाणांना साक्षी ठेवून सरकारचे यथोचित वाभाडे काढले. याला फार मोठे धैर्य व बांधिलकी लागते. अस्सल मराठी निस्पृह बाण्याचा विद्वान कसा असतो ते दांडेकरांनी दाखविले.

दुसरे म्हणजे चव्हाण यांची मनस्थिती इतकी प्रक्षुब्ध झाली आहे यावरून काँग्रेसच्या वरिष्ठ नेतृत्वाच्या सध्याच्या निराश व भयगंडपूर्ण मनोवस्थेवर प्रकाश पडतो. आपली सत्ता जाणार या भीतीने काँग्रस हायकमांड चिडचिडल्याप्रमाणे वागत आहे हे विरोधी पक्षांच्या दृष्टीने एक सुचिन्ह असून त्यांनी आपले प्रयत्न दुप्पट जोमाने चालू ठेवले पाहिजेत. प्रतिस्पर्धी जेवढा निराश व भ्रांतचित्त तेवढा विजयाचा संभव अधिक.

समोरासमोरच्या हल्ल्याने दांडेकरांनी आणखी एक भावनिक काम फत्ते केले ते असे– सत्ताधारी नेहमी गोंडस, आर्जवी, लाघवी मुखवटा घालून वावरतात. हा मुखवटा टराटरा ओढून काढून सत्ताधाऱ्यांच्या खऱ्याखुऱ्या क्रूर, असहिष्णु आणि उन्मत्त मुद्रेचे दर्शन दांडेकरांनी लोकांना घडविले. समोरासमोर आव्हान देण्याचे धाडस दाखविल्यानेच चव्हाण यांचा तोल ढळला, ते प्रोव्होक होऊन त्यांनी आपला सुरम्य मुखवटा काही काळ बाजूस सारला.

सत्ताधाऱ्यांच्या खऱ्या मुद्रेचे दर्शन जनतेला होणे हीच कोणत्याही क्रांतीची सुरुवात असते–नाही का ?

–प्रतिनिधी

# पुन्हा एकदा गोद्रेज-विक्रोळी

माणूस प्रतिनिधी

सप्टेंबर १९७२. विक्रोळीला मोठी दंगल उडाली. मुंबई कामगार चळवळीच्या इतिहासात प्रथमच त्या दिवशी तीन पोलिस कर्मचाऱ्यांचे बळी घेतले गेले. गोद्रेज भूमीवर घडलेल्या त्या सर्व प्रकरणाची 'माणूस'च्या वाचकांना नव्याने ओळख करून द्यायची आवश्यकता नाही. परंतु त्या दंगलीपूर्वी ज्या घटना घडल्या, कंपनीने 'लॉक आऊट' जाहीर केला, त्याचीच छोटिशी पुनरावृत्ती परवा घडली. ८ जुलै, १९७३ ला पहिल्या पाळीनंतर गोद्रेजमध्ये टाळेबंदी पुकारली गेली. तत्पूर्वी कंपनीत व परिसरात वातावरण तंगच होते. १९७२ व १९७३ मधल्या दोन्ही टाळेबंद्यांच्या वेळच्या कंपनीतर्फेच्या पत्रकात कमालीचे साम्य आहे. (यावेळी, युनियनने, कामगारांनी बेशिस्ति केल्यामुळे तणाव निर्माण झाल्याने कंपनीच्या मालमत्तेला व स्टाफला धोका निर्माण झाल्याचे कारण संचालकांनी दिले होते. नेमकी तीच कारणे ह्याही वेळी दिलेल्या नोटिशीत होती. टाळेबंदीपूर्वी कंपनीच्या आवारात मारामारीचे प्रसंग घडले. लाठ्या, काठ्या, सोडावॉटरच्या बाटल्या नि सुरेही! साऱ्यांचा वापर झाला होता. पोलिसांचा हस्तक्षेप झाला. पोलिसांनी गोळीबारही केला. उलटसुलट आरोपांच्या फैरी झडल्या आणि विक्रोळी पुन्हा एकदा कामगार जगतातल्या घडामोडींचे केंद्रबिंदू बनणार असे वाटू लागले.

पण प्रकरण थोडक्यात निभावले. राज्य मजुरमंत्री श्री. नरेंद्र तिडके ह्यांच्या मध्यस्थीने टाळेबंदी उठली. कंपनीचे चालक व कामगार संघटना या दोघांनीही आपसातले वादग्रस्त मुद्दे मुख्यमंत्र्यांच्या लवादाकडे सोपवायचे मान्य केले. आणि वणवा भडकायच्या आतच ठिणगी विझली! सर्वांनीच बहुधा सुटकेचे श्वास टाकले असावेत!

एवढे झाले तरी आरोप-प्रत्यारोप घडत होते. गोद्रेज परिसरात हिंडल्यावर असंतोष धुमसत असल्याचे जाणवले, अनेक तक्रारी ऐकू आल्या. गोद्रेज चालकांनी केलेल्या आरोपांचा फोलपणा सांगणाऱ्या गोष्टी ऐकायला मिळाल्या. चालकांविरुद्धचे प्रत्यारोप ऐकायला

मिळाले. ह्या साऱ्यांचा अधिक खोलवर मागोवा घ्यावा म्हणून गोद्रेज कामगारांचे पुढारी आमदार डॉ. दत्ता सामंत ह्यांना भेटलो. गोद्रेजमधले ताजे प्रकरण घडले तेव्हा त्या प्रकरणातली मॅनेजमेंटची भूमिका, पोलिसांचे रिपोर्टस वृत्तपत्रांतून सविस्तर आले होते. म्हणूनच कामगारांची दुसरी बाजू डॉ. सामंतांकडनं मी समजून घ्यायचा प्रयत्न केला.

सप्टेंबर ७२ च्या प्रकरणानंतर जवळजवळ सहा-सात महिने डॉक्टर व गोद्रेजप्रकरणातले इतर कार्यकर्ते अटकेत होते. त्या व नंतरच्याही काही काळपर्यंत गोद्रेज संचालकांनी नवीन कामगारांची भरती केली. सुमारे दोनशे नवीन कामगार ह्या काळात कंपनीने घेतले आणि ते तसे घेताना कंपनीने नेहमीची प्रथा मोडली. नेहमीची सर्वसाधारण प्रथा अशी की, अकुशल कामगारांची नवीन भरती करताना कामगारांच्या नातेवाईकांना—ओळखीच्यांना प्राधान्य द्यायचे. परंतु अकुशल कामगार भरती करताना हा अलिखित नियम तर धाब्यावर बसविला गेलाय, पण ज्यांची भरती झाली ते सर्व एकजात गुंड होते. बहुतेकांना वेळोवेळी शिक्षाही झाल्या होत्या. ह्यातले काही लोक शिवसैनिक असल्याचाही युनियनचा दावा आहे. एक-दोघं शाखाप्रमुख देखील आहेत म्हणे ! (शिवसेनेने ह्या आरोपांचा स्पष्ट इन्कार केला आहे !) आणि ही भरती गोद्रेज कामगार चळवळीत बदनाम झालेल्या हळदणकर वगैरे त्रयींच्या सल्ल्याने झालेली आहे. ह्या सर्व नवीन रिक्रूट्स्ना वेगवेगळ्या खात्यात विभागण्यात आले आहे. ह्यांना काम असे कसलेही नसते. घोळक्या घोळक्यांनी कामगारांना सतवायचे, 'डॉ सामंत व युनियन कामगारांचे कसलेही भले करणार नाही' असे सांगून भडकवायचे, अर्वाच्च वागायचे एवढेच ह्या भाडोत्री गुंडांचे काम ! ह्या विरुद्धच्या तक्रारी जेव्हा युनियनने कामगारमंत्र्यांकडे केल्या तेव्हा ह्या पद्धतीच्या भरतीला थोडा लगाम घातला गेला असेही डॉक्टरांनी मला सांगितले. पण त्याचबरोबर ह्या गुंडांनी मॅनेजमेंटच्या आश्रयाने जो धुमाकूळ घातला, कामगारांना मारझोड केली, कारखान्याच्या परिसरात तंग वातावरण निर्माण केले, त्यासंबंधी वेळोवेळी केलेल्या तक्रारींची दखल देखील पोलिसांनी घेतली नाही हेही डॉक्टरांनी आवर्जून सांगितले.

ह्या दोनशे गुंडांच्या नावांची यादीही आमदार सामंतांनी मला दाखवली. त्यांच्याविरुद्ध पोलिसात केलेल्या काही तक्रारीसंबंधातल्या घटनाही मला सांगितल्या. त्यातल्या काही शेलक्या घटना अशा –

१ : २७–१–७३ ला पहिल्या पाळीतल्या कामगारांना घरी परतताना ह्या गुंडांनी मारहाण केली. दगडफेक करून त्यांना भडकवायचा प्रयत्न केला. विक्रोळी पोलीस स्टेशनला तक्रार करूनही फायदा झाला नाही.

२ : विक्रोळी स्टेशनवर त्याच दिवशी

साटम नावाच्या कामगारावर विठ्ठल शिंदे व प्रभाकर लोके ह्यांनी हल्ला चढवला.

३ : ५ जून १९७३. ग्रँटरोड येथे रात्री एक वाजता श्री. गांधी नावाच्या कामगारावर अनंत चिकणे ह्यांनी सुऱ्याचे वार करून खुनी हल्ला केला. (१९७२ प्रकरणांतही श्री. मालंडकर ह्या स्टाफ युनियनच्या व्यक्तीवर सुरी-हल्ला केल्याचा आरोप ह्याच अनंत चिकणेवर केला गेला होता. तो खटला अद्याप सुरू आहे.)

४ : १४ जून १९७३. श्री. नोरे नावाच्या कर्मचाऱ्यावर जे. के. सिंग नावाच्या इसमाने गुप्तीचा वार करून हल्ला चढवला. श्री. नोरे हे अद्यापही हॉस्पिटलमध्ये आहेत. गंमत ही की, ह्या विरुद्धच्या तक्रारीवर पोलिसांनी पाऊल उचलले नाही. पण त्याच वेळी श्री. उपाध्याय नावाच्या इसमाने श्री. नोरे ह्याच्याविरुद्ध पाकिटमारीच्या केलेल्या तक्रारीची मात्र लगेच दखल घेतली गेली. श्री. उपाध्याय हा कंपनीच्या पाळीव हस्तकांपैकी एक. त्याची 'पाकिटमारीची' ही आठवी (?) तक्रार !

५ : ५ जुलै ७३ ! युनियन व मॅनेजमेंटमध्ये कामगारांच्या मागण्यांविषयी बोलणी सुरू असताना ह्या गुंडांनी व कंपनीच्या 'चमच्यां'नी आमच्या (युनियनच्या !) कामगारांना डिवचण्याचे प्रकार चालू केले. त्या दिवशी बोलणी फिसकटली. वसंतराव नाईकांचा लवाद मानायचे निश्चित झाले. पण नेमक्या त्याचवेळी, कामगारांपर्यंत बोलणी फिसकटल्याचं तडकाफडकी जाऊ न देण्याची विनंती आम्ही करीत असतानाच, मॅनेजमेंटने ह्या गुंडांमार्फत कामगारांना त्रास द्यायला सुरुवात केली.

साहजिकच बोलाचाली वाढली. कामगारांनी मालकांचा व त्यांच्या गुंडांचा निषेध केला.

६ : सहा जुलैला हे प्रकार वाढले. त्या दिवशी दुपारी चारच्या सुमारास घरी जाणाऱ्या ४०–५० कामगारांना सुमारे दीड-दोनशे 'गुंड' कामगारांनी घेरले. सर्वांजवळ सुरे होते. शिवसेनेचे रामू घाडीगावकरही त्यांच्या शरीर रक्षकांबरोबर तिथे होते. (ह्या रामू घाडीगावकरांनाच पहायला शिवसेनेचे आमदार मनोहर जोशी गेल्याचे निमित्त २ सप्टेंबरच्या दंगलीच्या वेळी घडले होते !) रामू घाडीगावकर ह्या गुंडांना चिथावत होते. ते सारे पाहून कामगार बिथरले. चकमक उडाली. घाडीगावकरांच्या शरीर रक्षकांनी गोळ्या हवेत उडवल्या. सशस्त्र पोलिसांची कुमक आली. त्यांचा हस्तक्षेप सुरू झाला. आणि त्यांच्या समक्षच, त्यांच्या साक्षीनेच, प्लँट मॅनेजर ठाणावाला ह्यांनी अनंत चिकणे, हळदणकर, कदम वगैरे गुंडांना प्लँटमध्ये नेऊन त्यांच्याकरवी दुसऱ्या पाळीच्या कामगारांना मारहाण सुरू केली. ह्या संपूर्ण वेळात पोलिसांनी बघ्याची भूमिका घेतली होती.

आणि ८ जुलैला ह्या साऱ्या प्रकारांचे खापर कामगारांवरच फोडून मॅनेज-

मेंटने कंपनीला टाळे ठोकले.

नंतरही आमच्या कामगारांवर वेळो-वेळी हल्ले होतच गेले...

ना. तिडक्यांच्या मध्यस्थीनंतर ही टाळेबंदी आज उठली आहे. मुख्य मंत्र्यांचा लवाद मान्य झाला आहे. पण तरीही कामगारांच्या अनेक गाऱ्हाण्यांची दाद अजून लागायची आहे. कामगारांच्या अनेक मागण्यांबाबत एकवाक्यता होत असली तरी मागण्यांची सांगड उत्पादनवाढीशी घालण्यावर बोलणी खुंटली आहेत. मालक १५% उत्पादनवाढ मागत आहेत तर, डॉ. सामंतांनी सांगितल्याप्रमाणे गेल्या ५–६ वर्षांत वेळोवेळी कामगारांनी त्यांच्या ताकदीपलीकडे उत्पादनवाढ करून दिलेली आहे. ह्यापुढील वाढ केवळ अशक्य आहे !

ह्या संदर्भात डॉक्टरांनी मालकांच्या आणखी एका आरोपाचे खंडण केले. मालकांनी टाळेबंदी जारी करताना कामगारांनी 'गो-स्लो'चा अवलंब केला असा आरोप केला होता त्या विषयी बोलताना डॉक्टरांनी ह्या आरोपाचा साफ इन्कार केला. प्रत्येक कामगाराच्या 'जॉब कार्ड'पद्धतीमुळे हे जवळजवळ अशक्य आहे. ९०० कपाटे, १५००० कुलुपे, ९६ रेफ्रिजिरेटर्स हे प्रमाण ठरून गेले आहे आणि ह्या सर्व काळात उत्पादन ह्या आकड्याखाली गेलेले नाही, ही वस्तुस्थिती आहे...

ह्याखेरीज कामगारांच्या राहत्या घरांचे, मुलांच्या शाळेचे प्रश्न कायम आहेत. बहात्तरचा सूड म्हणून 'उदयाचल' शाळेत यंदा निकाल जेमतेम वीस टक्के लावले गेले आहेत. कित्येक मुलांना नापास झाल्याचे निमित्त दाखवून काढून टाकले आहे. हे प्रकरणही युनियनने शिक्षण व मजूर मंत्रालयापुढे नेले आहे. 'प्रगती केंद्रा'विषयीच्या तक्रारी कायम आहेत...

गोदी कामगारांच्या मागण्यात वसंतराव नाईकांची मध्यस्थी यशस्वी ठरली आणि त्यांचा संप टळला. जॉर्जसाब पण 'बेस्ट' घेऊन त्यांच्याकडे जात आहेत. तिथेही त्यांच्याकडून कामगारांना न्याय मिळेल अशा वदंता आहेत. गोद्रेजमध्येही वसंतरावांचा लवाद कामगारांना काहीतरी मिळवून देईल का ?

शेवटी एकच ! गोद्रेज प्रकरणात काहीही घडले की त्याचा शिवसेनेशी संबंध जोडण्यात येतो. आपला गोद्रेजमध्ये कसलाही लागाबांधा नाही असे प्रत्येक वेळी शिवसेना-प्रमुख आवर्जून सांगतात आणि प्रत्येक वेळी अनंत चिकणे, घाडीगावकर वगैरे शिवसैनिकांचा संबंधही अवश्य असतो. ह्या साऱ्यातली संगती जोडायची कशी ?

● ● ●

# सो ल क ढी

## शून्यपाप नामजोशी

अलीकडे पंच पंच उषःकाली ताजे ताजे वर्तमानपत्र वाचण्याचे मला मोठे संकट वाटते. ठळक बातम्यांवरून नजर फिरवताना, या देशाचे होणार तरी काय, असा विचार मनात येऊन उदास उदास वाटते. आपण (म्हणजे मी स्वतः) फार दुबळे आहोत हे तीव्रतेने जाणवते. सगळीकडे नुसती पडझड चाललेली असते. घरे कोसळतात; विमाने कोसळतात; मंत्रिमंडळे कोसळतात; नाटके कोसळतात. माझी आजी म्हणायची, पाप वाढले म्हणजे असे होते.

पापाची मला फार भीती वाटते. हो गंमत अशी की ते कळतनकळत करायची जेवढी भीती वाटत नाही तेवढी ते सावधबेसावधपणे कबुल करायची भीती मला वाटते. मी माझी सगळी पापे, कोणाला कधीही न सांगता, आत्मचरित्रात लिहिण्यासाठी, माझ्यापाशीच राखून ठेवली आहेत. असे असले तरी, मनुष्य हा पापी असतो, हे ढोबळ सूत्र मला मान्य असते. त्याचा मी निःसंकोच उच्चार करत असतो. वाईट एवढ्यासाठीच वाटत होते की, अलीकडे पंच पंच उषःकाली त्याचा उच्चार करायची पाळी येते.

पण वाचकहो, दिनांक १४ जुलै १९७३ चे वर्तमानपत्र मी उघडले आणि योगायोगाने महाराष्ट्र राज्याचे माननीय शिक्षणमंत्री अनंत नामजोशी यांच्या एका निवेदनावर माझे लक्ष प्रथम जाऊन माझे अंतःकरण उषःकालाला अनुरूप अशा पावित्र्याने आणि मांगल्याने कसे कोंदून गेले. माननीय शिक्षणमंत्र्यांनी आपल्या निवेदनात म्हटले होते: माझे मन स्वच्छ आहे. ज्याने आयुष्यात पाप केलेले नाही तो मनुष्य कशालाही – परमेश्वरालाही – भीत नाही. केवळ गल्या दोन वर्षात असे नाही तर आयुष्यात (मी) पाप केले नाही असे मी म्हणतोय हे ध्यानात घ्या.

शिक्षणमंत्र्यांचे म्हणणे मी नीटपणे ध्यानात घेतल्यामुळे दोन दिवस मला कसे बरे बरे वाटत होते. आयुष्यात कधीही पाप न केलेला, इतकेच नव्हे तर तसे छातीठोकपणे सांगणारा, पुण्यात्मा मला भेटला होता. जग दिसते तितके वाईट, नाही अशी अलवार (या विशेषणाचा नेमका अर्थ खरा म्हणजे मला माहीत नाही; पण चार-

चाळीस ठिकाणी हे विशेषण वापरलेले वाचले म्हणून मुद्दाम वापरले आहे.) श्रद्धा मनी अंकुरित झाली. आपण महाराष्ट्रीय आहोत याचा चक्क अभिमान वाटू लागला.

दोन दिवस असे गेले आणि तिसऱ्या दिवशी, दिनांक १६ जुलै १९७३ रोजी, पंच पंच उषःकाली 'महाराष्ट्र टाईम्स' या दैनिकातील 'पुण्यश्लोक नामजोशी' हा अग्रलेख आमच्या दृष्टीस पडला. नामजोशींचे यथोचित कौतुक करणारा माझ्या जातीचा कोणीतरी आढळला असे वाटून मी तो अग्रलेख अधाशीपण वाचून काढला. आश्चर्याची गोष्ट अशी की 'महाराष्ट्र टाईम्स'ने नामजोशी महाशयांना 'पुण्यश्लोक' असे उपरोधाने म्हटले आहे की काय, असा भास मला झाला. कारण माझ्या मित्रांच्या सांगण्यावरून 'महाराष्ट्र टाईम्स' हे परतंत्र बाण्याचे वृत्तपत्र आहे, अशी माझी समजूत झाली होती. अशा वृत्तपत्राने एका लोकनेत्याला उपरोधाने 'पुण्यश्लोक' म्हणावे हे खचीत आश्चर्यकारक आहे.

'महाराष्ट्र टाईम्स'च्या अग्रलेखांचा रोख काहीही असला तरी आम्हाला त्याचे अनुकरण करून चालणार नाही. कारण एकवेळ गो. नी. दांडेकरांचे रडणे लटके आहे असे आम्ही म्हणू; पण अनंत नामजोशी यांचे प्रस्तुत निवेदन लटके असेल असे दूरान्वयानेसुद्धा सुचवून आमची जिव्हा आम्ही विटाळणार नाही. खरे ऐकण्याची आपली सवयच इतकी क्षीण झाली आहे की त्यामुळे खरे आपल्याला लटकेच वाटू लागले आहे. छे छे असे निदान शिक्षणक्षेत्रीच्या या सेवाव्रत वडवेकुलप्रमुखाच्या बाबतीत घडू नये.

म्हणून 'महाराष्ट्र टाईम्स'ने मनावर होणारा परिणाम नीट पुसण्याची गरज होती. त्यात एक अडचण आली. नामजोशींना 'पुण्यश्लोक' म्हणताना लेखणी अडखळू लागली. पण इतके चांगले विरुद दुसरे सुचेना. तेच पुन्हा योजायचे तर वाचकांना ते उपरोधपूर्ण वाटायची भीती. अखेर बऱ्याच विचारांती 'शून्यपाप' हे बिरुद मिळाले. ते अनंतराव नामजोशींना सकौतुक बहाले करून आम्ही त्यांची पुन्हा प्रतिष्ठापना करत आहोत.

पवित्र शिक्षणक्षेत्र आणि शून्यपाप शिक्षणमंत्री, हा एक अपूर्व योग महाराष्ट्रराज्यात अवतरला आहे. १९७५ साली या राज्यात एका महान शैक्षणिक क्रांतीला आरंभ होणार आहे. महाराष्ट्रात नुकतीच हरितक्रांती झाली. आता शैक्षणिक क्रांती. ती झाल्यावर आणखी कसलीतरी क्रांती. महाराष्ट्राला क्रांतीशिवाय चैनच पडत नाही. आणि महाराष्ट्रातील सगळ्या क्रांत्या सरकारच करते, ही आणखी एक महत्त्वाची गोष्ट आपण ध्यानात घेतली पाहिजे. मात्र त्यात नवल वाटण्याचे कारण नाही. का की क्रांतिकारक हा निर्भय असावा लागतो; आणि महाराष्ट्र मंत्रिमंडळात खुद्द परमेश्वरालाही न भिणाऱ्या अनन्त नामजोशींसारखे एकाहून एक निर्भय मंत्री एकत्र आले आहेत.

शून्यपाप नामजोशींची जय हो.
पुण्यश्लोक नामजोशींची जय हो. ●

## सल्ला

देशोदेशी जाणारी अमेरिकन मदत नेहमीच सत्कारणी लागते असे नव्हे. देशोदेशीची कावेबाज अधिकारी मंडळी त्या मदतीतून विविध चैनीच्या वस्तू संपादन करतात. विल्यम फुलब्राइट या सिनेट सभासदाने मध्यंतरी अशी तक्रार केली होती की कंबोडियाला दिल्या जाणाऱ्या अमेरिकन मदतीतून नॉम पेन येथील काही हिकमती वरिष्ठांनी गुलाबी स्नानगृहे पैदा केली आहेत. या स्नानगृहांचे वैशिष्टय असे की ती कोठेही वाहून नेता येतील अशी सोयिस्कर आहेत.

या संदर्भात, भारतात घडलेली एक गोष्ट सांगण्यासारखी आहे. त्यावेळी लिंडन जॉन्सन अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष होते. चेस्टर बौल्स अमेरिकेचे भारतातील राजदूत होते. पी. एल्. ४८० गव्हाच्या मदतीबरोबर एक हजार अमेरिकन शेतीतज्ञांना भारतात पाठवण्याचा जॉन्सन यांचा विचार होता. चेस्टर बौल्सना हा विचार कळला. त्यांनी तावडतोब जॉन्सन यांच्याशी संपर्क साधून त्यांना या अघोरी विचारापासून परावृत्त केले. चेस्टर बौल्सनी तेव्हा लिहिले होते : आशियातील शेतीची काही माहिती नसलेले एक हजार अमेरिकन शेतीतज्ञ त्यांच्या ९५० बायका, २५०० मुले, ३००० तपमाननियंत्रक, १००० जीपगाड्या, १००० विद्युतशीतपेट्या, ८०० ते ९०० कुत्रे आणि २००० ते ३००० मांजरे यांच्यासह अचानक भारतात दाखल झाले तर केवढा अनर्थ ओढवेल बरे ! ●

'लेडीज होम जर्नल' या अमेरिकन नियतकालिकाने दिलेली एक माहिती : अमेरिकेचे भूतपूर्व राष्ट्राध्यक्ष लिंडन जॉन्सन यांना कुत्रे फार आवडायचे. बीगल नावाचा त्यांचा विशेष लाडका पाळीव कुत्रा होता. तो मेला तेव्हा जॉन्सननी त्याचे दहन करवले आणि त्याची रक्षा एका करंडकामध्ये घालून तो शीतपेटीवर ठेऊन दिला होता. ●

## बेटी ग्रॅबल

आपल्या मादक सौंदर्याने चित्रपटरसिकांना एके काळी वेड लावणारी हॉलिवुडची चित्रतारका बेटी ग्रॅबल नुकतीच, वयाच्या छप्पन्नाव्या वर्षी, फुफ्फुसाच्या कर्करोगाने मृत्यू पावली. जवळजवळ १२ वर्षे, हॉलिवुडमधील सर्वांत श्रीमंत दहा नटनटयांमध्ये बेटी ग्रॅबलचा समावेश होत असे. १९३० ते १९४० या दशकात बेटीने ४२ चित्रपटातून भूमिका केल्या आणि त्या चित्रपटांनी १० कोटी डॉलर्सचा धंदा केला होता.


● ● ●

# पर्वती पायथ्याजवळील गरीब 'पुंजीपती' (?)

## डॉ. अरुण लिमये

पर्वती म्हणजे पुण्याचे पुरातन वैभव-स्थान. पेन्शनरांचे हिंडावयाचे व तरण्यांच्या पळण्याचे ठिकाण. पण जुने आता काय उरले आहे? पुणे म्हणजे 'विद्यार्थी, पेन्शनर व विद्वानांचे सुंदर पुणे' असा जुना लौकिक. परंतु प्रत्य-क्षात झपाट्याने औद्योगिकरण झालेले, योजनाशून्य, विलक्षण गतीने वेडेवाकडे वाढणारे, बकाल पुणे दिसते. पर्वती प्रसिद्ध आहे ती मोकळ्या हवेसाठी नाही तर विनापरवाना बांधलेल्या व कॉर्पोरेशनने उध्वस्त केलेल्या जनता वसाहतीमुळे!

धिटाईने, कोणी समाजकंटक पुंडांनी व पुंजीपतींनी (?) तेथे विनापरवाना घर बांधणीचा धडक कार्यक्रम हाती घेतला व साऱ्या पुण्याच्या आरोग्याला



बॉम्ब वर्षावात गाव उध्वस्त व्हावे तसा काहीसा देखावा....

धोका निर्माण झाल्याचे वाचले होते. आम्ही तर पेशानेच चळवळी मंडळी ! सत्याच्या आग्रहाखातर कायदेभंग करून तुरुंग भरती होण्यात रस असलेली माणसे. मनात आले, ५–६ हजार मंडळी सामुदायिक कायदेभंगाची चळवळ करताहेत. त्यांना भेटलेच पाहिजे. पुंजीपतीमध्ये एवढे धारिष्ट आले तरी कोठून ?

पर्वती टेकडीच्या उतारावर, कालव्याच्या अंगाने, श्री. राऊतांच्या खास प्रायव्हेट प्रॉपर्टीत वसलेल्या, जनता वसाहत उर्फ मोहन बागेकडे प्रस्थान ठेवले. चिखलाने राडा झालेला रस्ता. तेव्हा स्कूटरही जाणे अशक्यच होते. शिवाय (पोलिस) डिपार्टमेंट, कॉर्पोरेशन नि काँग्रेसवाला यांना वसाहतीत पाऊल टाकून देण्याची रहिवाशांची प्रतिज्ञा कानी होती. पायी मोर्चा काढला व जनता वसाहत संघाचे उपाध्यक्ष श्री. ना. लमाणी गृहस्थांच्या घरी धरणे धरले.

सुमारे वर्ष दीड वर्षापासूनचे हे सिनियर मेंबर. धंदा गवंडीकामाचा. घरात माणसे ६. उत्पन्न अंदाजे २५० रु. आधी काँट्रॅक्टरचे खोलीत दत्तवाडीत, अगर कामावरच खोपटे बांधून राही. कोंगाडी, मराठी, लमाणी, वडारी साऱ्यांची ही मिश्रवस्ती. उत्पन्न अंदाजे शे दोनशेच्या आतबाहेर असलेले सर्व. पाण्याची सोय ? दूरच्यांना कालव्याचे. जवळच्यांना टाकीच्या लीकेजचे. इतकी माहिती मिळाली.

'पहाणी' कार्यक्रम सुरू झाला. एका घरात डोकावलो तर भेटले– श्री. सुभाष कृष्णा मोहिते, टेलरचे दुकानी नोकरी. पगार १५० रु. येऊन ४ महिने झाले. भाऊ सचीन प्रेसचा कामगार. ६० रु. कमावतो. घरात एकूण माणसे ६. एक टाईम उपास काढत कसे बसे दिवस रेटायचे झाले.

पुढे सरकलो. डोंगर उतारावर जरा आडोशाने प्रौढ स्त्रीची आंघोळ चालली होती. सांडपाणी, पदार्थ विज्ञान शास्त्र नियमानुसार, उताराकडे वाहून कालव्याचे दिशेने सरकत होते. एवढ्यात छोटेसे गोळ्या बिस्कीटांचे दुकानवजा घर आले. मालक–दत्तात्रय बाबूराव मोरे. माजी सैनिकाचा मुलगा. शिवाजी मराठा नाईट स्कूलला मॅट्रिकचे वर्गात शिकणारा. दिवसा किरकोळ वस्तू विक्रीचा धंदा. २–३ रुपये रोज सुटे. भांडीकुंडी विकून, डाग विकून कर्ज काढून ३ हजार उभारले व हे घर बांधले. दुकानातच भगव्या झेंड्याची तयारी चालू होती. दुपारच्या मोर्च्याची पूर्व तयारी असावी.

पुढे सरकलो, दारी वृंदावन–घोसाळ्याचे वेल लावलेले–दोन फूट वाढलेली झाडे–स्वतःचे टुमदार साधे स्वच्छ घर–भोवती बाग. स्वप्नातले जणू थोडक्यात जमवलेले. बाजूच्या घरात भेटले मारुती गणपत हुलावडे. ॲम्युनिशनमध्ये कामाला. १५० रु. पगार ९ जण खाणारी तोंडे. सोसायटी काढली व घर बांधले. २ हजार खर्चून.

वाटेत लागले एक हॉटेल. डेस्क

टापटापीने मांडलेले, छोटेसे व स्वच्छ 'चायचे हॉटेल' मालक मोहन गावडे दारू लायसन भेटले नाही म्हणून चहाचे दुकान टाकलेले.

आतापर्यंतचे सारेच बांधकाम मातीतले मधून मधून पावसाने पडलेले' एकच सिमेंटाचे काम- ते अन्नपूर्णा देवीचे मंदीर. तसे बरेच जुने. पाण्याची टाकी बांधली तेव्हाचे. भोवती तारेचे कुंपण.

जरा पुढे सरकलो तो भेटले बाळासाहेब काशीनाथ मारणे. भाऊ मिलीटरीतून डिसचार्ज घेऊन आला तर गावाकडे दुष्काळ. मुळशी तालुक्यातली जिमीन विकली. म्हशी घेतल्या व घर बांधून धंदा सुरू केला. म्हशींची व्यवस्था ? अर्थातच घरामागे पत्र्याच्या शेडखाली.

एव्हाना मंडळी अवती भोवती जमू लागली होती. थोडासा विश्वास उत्पन्न झाला होता. शिवाय वस्तीतलेच, सोलापूर जेलमधले परिचित श्री. रवि डांगे बरोबर होते. तेव्हा तसा मारहाणीचा धोका नव्हता. हे आपल्या पार्टीचे, इतपत मत बनले होते. थोपटे, पवार, मोरे, जाधव, एस. पी. चे विद्यार्थी—५—६ जणात मिळून खोली बांधून रहात होते तेथून पुढे बांधलेल्या घरांची वसाहत सुरू झाली होती. वाटेतच धोब्याकडे नोकर असलेले विठ्ठल सूर्यवंशी भेटले. उत्पन्न अंदाजे १००—१५० रु.

बॉम्ब वर्षावात गाव उध्वस्त व्हावे तसा काहीसा सीन. वीटांचे ढिगारे पडलेले. खिडक्यांच्या चौकटी काढून ठेवलेल्या. पत्रे रचलेले. शिवाजीनगर पोस्टातील कारकून श्री. डिमळे यांचे बांधलेले घर जमीनदोस्त केले होते. आता मंडळींना वाचा फुटली होती. काल भेदरले होते. हातापाया पडून विनवीत होते. पण प्रतिकार केला नाही. मोर्चाने कॉर्पोरेशनवर गेले व इकडे×××× नी डाव साधला. आधी म्हणाले फक्त पाहणी करतो. जे अर्धवट बांधकाम आहे तेच पाडतो. कोणी रहात नाही ते पाडू. इ. इ. पण×××××नी बांबू घालू घालू भिंती पाडल्या×××× धुंदी चढली. छप्पर खाली आले तर काठ्या घालून कौले फोडली. पत्र्यावर टिकाव घातले. बाया माणसांना ओढून बाहेर खेचले. यशोदाबाई सूर्यवंशीचे सारवण चालू होते. त्यांना खेचले. वस्तीला ड्रेनेज नाहीच. पण घरातच प्रत्येकाच्या ड्रेनेज वहाते. झरे फुटून जमिनीतून पाणी वहाते. त्यासाठी जमीन पक्की करायला दगड, मुरुम घरात टाकला होता. नाली खणली होती. तो अपूर्ण बांधकामाचे घर म्हणून पाडले. क्षीरसागर आणि इतर शिक्षकांनी मिळून सहकार्याने बांधलेले चाळवजा घर—कोणा पुंजीपतीचे समजून पाडले. भागीत घरे बांधलेले भेटले. त्यातलेच एक मोहन धर कांबळे व त्यांचे मेव्हणे सुतार, आसरा हॉटेलमध्ये वेटरचे काम करतात. पगार तुटपुंजा. वत्सलाबाई लाड, गुरव या भूगावच्या शिक्षिका. त्यांनाही एव्हाना आवाज

फुटला होता. कोठे आहेत श्रीमंत, माडीचे घरे बांधणारे पुंजीपती–दाखवा म्हणावे. उगाच टेकडीवर घरे आहेत म्हणून काय दोन मजली आहेत काय ?

'घरे पाडायच्या नोटिसा आधी सर्वांना दिल्याच नाहीत. दिल्या ते २४ तासात कसे उतरविणार घर–असे सत्यानाश करून ? आमचा तर कुणी वालीच नाही. एकजण फिरकत नाही.' 'एक कॉंग्रेसी कॉर्पोरेटर त्याची दगडाची खाण वरती आहे. विना परवाना दगड नेतात, आमची अडचण होते म्हणून आम्ही नको. स्टॅंडिंग कमिटीवाले, अध्यक्ष सर्वांचे सत्कार केले. आधी मारे आश्वासने दिली. आम्ही आहोत तुमच्या पाठिशी. आता पाठ फिरविली नि चालायला लागले. एक यायला मागत नाही. बरे, दिवसही पाडायला असा निवडला की मेयरची निवडणूक–सगळे त्यात दंग. त्यात दुसरा शनिवार त्यामुळे सुट्टी. स्टे आणायची पंचाईत. सराईत पुढारी मागे नाही. आता कपाळाला हात लावून बसले आहेत. पुढचे काय ? माझा प्रश्न. तुम्हीच सांगा–हे उत्तर. माजी मिलिटरी हवालदार नलावड्यांच्या मते तर स्त्रियांवरील अत्याचार सोडले तर अगदी बांग्ला देशसारखे काही हैवान वागले.

संघाचे किराड अध्यक्ष–टेलिफोन कंपनीत नोकरीला. दुसरे श्री. तुकाराम दशरथ राऊत तेही टेलिफोन ऑपरेटर गेली १५ नोकरीला. त्यांच्याकडून माहिती मिळाली. जागा राऊतांची. १०×१२ चे जागेला रु. २०० घेत. म्हणजे जवळ जवळ २ रु. चौ. फूट. एकरी ८८ हजार रुपये भाव झाला. वर मे पासून संघाची वर्गणी १ रु. व सुरुवातीला १२ रु. भरावी लागे. आधी सगळ्यांनी हमी दिली. आता कोणी फिरकत नाही. कारण आम्ही बेकायदा –मग आता आम्ही जावे कोठे ? एक वर्ष गप्प का बसले ?

म्हटले तर या साऱ्याच प्रश्नांची उत्तरे सोपी आहेत. कायदा मोडणाऱ्या गुंडांचे, शहराचे आरोग्य धोक्यात आणणाऱ्या दुष्टांचे निर्दालन, कठोरपणे दंडशक्ती वापरून शासन करणार आहे म्हटले म्हणजे कायद्याची अंमलबजावणी झाली.

पण तरी प्रश्न अनुत्तरितच राहतो. पुस्तकातला कायदा महत्वाचा की हृदयाचा ? शेवटी ४-५ हजार नोकरी पेशातली कमी उत्पन्नवाली मंडळी कायदा मोडायला तरी का उद्युक्त होतात ? आश्वासने दिल्लीपासून गल्लीपर्यंत नेहमीचीच झाली आहेत. 'गरिबी हटाव'ला जनता फसते तशी 'आम्ही पाठीशी आहोत'लाही फसते. 'बांधकामाला परवानगी नाही हे तांत्रिकदृष्टया बरोबर असेलही पण बांधकामाचे नियम तरी काय ? गॅरेजमध्ये राहू नये. आज साधे गॅरेज बांधायचा खर्च आहे १० ते १५ हजार रुपये व भाडे घेतात १५० ते १७५ रुपये. पागडी निराळीच. आऊट हाऊसला म्हणे खोल्यामधून दारे नकोत. मग कंम्लीशन सर्टिफिकेट मिळविले की

मागाहून सर्रास साऱ्यांनी पाडली आहेत. ते बेकायदा होत नाही ! राजकारण्यांचा खलबतखाना असलेले–प्रसिद्ध हॉटेल मात्र तात्पुरते; बांधकाम नि हे मातीत ९ इंच भिंती बांधलेले मात्र पक्के. थिएटरचे नियम धुडकावून केलेले बांधकाम चालते कारण ते सारे पैसेवाले. नियमानुसार १।७ व्हेंटिलेशन ठेवून, जादा उजेड येतो म्हणून खिडक्यांना पडते लावून, अंधार करून, आपआपल्या मच्छरदाण्यात सुखाने पहूडता येते, त्यांना या प्रश्नाचे काय सोयर सुतक ?

पुण्याबाहेरच्या मोकळ्या प्लॉटसच्या किमती गोठविल्या नाहीत. बांधकाम साहित्याची भरमसाठ भाववाढ. गोरगरिब जनतेला परवडेल अशा भाड्यात घरे नाहीत–मग एकतर त्यांनी आकाशाखाली राहावे व पावसात भिजून न्युमोनियाने मरावे किंवा आमच्या सुंदर पुण्यात न येता आपल्याच गावी बेकारीत उपासमारीने मरावे. 'मरण' हाच त्यांना एकमेव पर्याय. कशा मार्गांनी मरायचे ते ठरविण्याचा लोकशाही हक्क मात्र प्रदान. शी ऽऽ काय घाण झोपडपट्टी आहे असे म्हणत नाके मुरडत, आपल्या हस्तीदंती मनोऱ्यातून उच्चभ्रूंचे शब्द त्यांनी मुकाट ऐकावेत.

मोटारी जावयास अडचण होते म्हणून जागा भराभर अॅक्वायर होतात. इथे मात्र राऊतांच्या प्रायव्हेट प्रॉपर्टीचा प्रश्न प्रधान. अॅक्वायर केलेल्या, हिरव्या पट्ट्यासाठी राखलेल्या जागा बेकायदा, वशिल्याने, अमीरांना वाटपही होतात पण इथे कायद्याचा बडगा मात्र कनिष्ठ


# पुरंदऱ्यांचा सरकारवाडा

ब. मो. पुरंदरे
यांचा
नवा
कथा संग्रह

किमत : सात रुपये

राजहंस प्रकाशन

मध्यम वर्गाच्या माथी. अन्न-वस्त्र-निवारा-आरोग्य व शिक्षण साऱ्या शासनाच्या जबाबदाऱ्या. अन्नाचा वनवास तर नित्य परिचित. सारे जगच फाटक्या उघडया अंगाने वावरत आहे. निवाऱ्याची ही तऱ्हा. स्वस्त परवडणारी घरे नाहीत, बांधली तर बडगा. आई जेवू देईना. बाप भिक मागू देइना.

कायदा मोडणाऱ्यांना संरक्षण देण्याची मागणी कुणीच करणार नाही. पण शेवटी कायदा जनतेसाठी की जनता कायद्यासाठी हेही ठरविलेच पाहिजे. बकरीने लेंडया टाकाव्या तसे हजारोंनी कायदे केले. कायद्यानुसार वागायचे ठरविले तर प्रत्येक माणसाला २-२ वर्षांची सजा करावी लागेल. टयूब लाईटच्या, ढण्ण्या प्रकाशातसुद्धा (लक्ष्मीरोडने) सायकलला दिवा लावला नाही, कर कैद. रस्ता उजव्या बाजूने cross केला तर कैद. कायद्याने पकडला जातो तो गुन्हेगार एरवी सारेच साव.

शहराच्या आरोग्याचा प्रश्न एका रात्रीत उपस्थित झाला नाही. वर्षभर चाललेले बांधकाम झोपलेले खाते पाहणार कसे ? आहे या स्थितीत त्यांना तेथेच ठेवणे फारच अहितकारक पण पर्याय तर शोधला पाहिजे. एकतर पर्यायी जागा उपलब्ध करा नाहीतर किमान आरोग्यासाठी सुखसोयी उपलब्ध करा. गरिबांची इतकी अडचण झाली असेल तर एक उपाय आहे. व्हिएटनाम सारखे वरून बाँब हल्ले केले तर जास्त लवकर घरेही पडतील व जनताही निमूटपणे संपेल.

कनिष्ठ मध्यमवर्गीय जनता गोणपाटांच्या झोपडयापेक्षा अधिक बऱ्या घरातून राहू इच्छिते. समाजाकडे घाबरलेल्या नजरेने पाहात, मनात आशा ठेवूनही उदास अवस्थेत पर्वती पायथ्याजवळ हे हजारो नागरिक बसले आहेत. पार्श्वभूमीवर धुराचे लोटही दिसतात, ते आहेत रतन छगनच्या दारू भट्टीचे.

प्रश्न कायदेबाजीचा नाही निवाऱ्याचा आहे. पुणे शहरापुरता मर्यादितही नाही. साऱ्या देशभरच्या नियोजनाचा आहे. उमगले तरच खरे उत्तर सापडेल. एरवी इकडे पाडावयाचे दुसरीकडे उभे राहावयाचे हे चक्र सुरूच राहणार. गरिबांची घरे मोडतानाचा निश्चयीपणा हितसंबंधीय बडयांना दुखावताना आपण दाखवतो का हाच खरा प्रश्न आहे.

● ● ●



# गुजराथ

## लोकशाहीला गटशाहीचे ग्रहण

वा. दा. रानडे

गुजरातचे नवे मुख्यमंत्री म्हणून घनश्याम ओझा यांच्या जागी काँग्रेसमधील बंडखोर गटाचे नेते चिमणभाई पटेल यांची निवड अखेर अल्प बहुमताने झाली. पटेल यांना ७२, त्यांचे प्रतिस्पर्धी कांतिलाल घिया यांना ६२ व रतुभाई अदानी यांना १ मत मिळाले. तीन सभासद तटस्थ राहिले. घिया यांनी पटेल यांना सहकार्याचे आश्वासन दिले आहे. पण अशी आश्वासने तोंडदेखली व औपचारिक असतात. पुढे संधी मिळताच ती सोयीस्करप्रमाणे विसरली जातात असा काँग्रेसमधील अंतर्गत गटबाजीचा आतापर्यंतचा अनुभव आहे. त्यामुळे पटेलांचे मंत्रिमंडळ किती काळ टिकून राहील व टिकून राहिले तरी कितपत कार्यक्षम कारभार करू शकेल याची शंका आहे.


तोंडदेखले सहकार्याचे आश्वासन दिले तरी मनातून अविश्वास गेलेला नाही हे घिया गटाचे एक प्रमुख कार्यकर्ते सनत मेहता यांच्या प्रतिक्रियेवरून स्पष्ट दिसते. ते म्हणाले, 'गुजरातेत राजकीय अस्थिरता टाळण्यासाठी उपाय योजले नाहीत तर अस्थिरता अटळ आहे. अधिकृत गटाने (म्हणजेच ओझा गटाने) श्रेष्ठींचा निर्णय मान्य केला असून नव्या सरकारला स्थैर्य लाभेल हे पाहण्याची जबाबदारी आता श्रेष्ठींची आहे.' याचा उघड अर्थ असा की चिमणभाई गट आपणास मंत्रिमंडळात योग्य प्रतिनिधित्व देईल असा विश्वास घिया गटाला अजूनही वाटत नाही व या बाबतीत चिमणभाई गटावर दडपण आणण्यासाठी ते श्रेष्ठींकडे पहात आहेत. आणि घिया गटास योग्य प्रतिनिधित्व मिळाले नाही तर तो राज्यात अस्थिरता निर्माण करील अशी गर्भित धमकी यामागे आहे.

विधानसभा, काँग्रेस पक्ष आणि

प्रदेश काँग्रेस दोन्हींची सूत्रे आतापर्यंत ओझा-दर्जी गटाच्या हाती होती. विधान-सभा पक्षात त्यांनी बहुमत गमावले तरी प्रदेश काँग्रेस संघटना अजून त्यांच्या नियंत्रणाखाली आहे. ती यापुढे आपल्या नियंत्रणाखाली आणण्याचा चिमणभाई गटाचा प्रयत्न राहील. प्रदेश काँग्रेस आणि प्रदेश निवडणूक समिती-वर ज्या गटाचे प्रभुत्व असेल त्याच गटाचे उमेदवार आगामी निवडणुकीत मोठ्या संख्येने निवडले जातील तेव्हा यापुढे प्रदेश काँग्रेसवर आपले नियंत्रण प्रस्थापित करणाऱ्या हालचाली चिमण-भाई गट करील. काँग्रेसमधील अंतर्गत गटस्पर्धा संपलेली नसून ती यापुढेही चालू राहणार असा याचा अर्थ आहे. अशा परिस्थितीत राज्यास स्थिर सर-कार फार काळ लाभणे कठीण आहे.

**फोडाफोडीला सुरुवात**

गुजरात हा मूळ संघटना काँग्रेसचा बालेकिल्ला. १९७१ च्या लोकसभा निवडणुकात म्हैसूर व बिहार हे संघटना काँग्रेसचे बुरुज ढासळले पण गुजरातचा बालेकिल्ला पूर्णपणे ढासळला नाही. लोकसभेच्या २४ जागांपैकी १२ संघटना काँग्रेसने व १२ इंदिरा काँग्रेसने जिंकल्या. यानंतर विधानसभेतील संघ-टना काँग्रेस पक्षात फोडाफोड करून हितेंद्र देसाई मंत्रिमंडळ पाडण्यासाठी इंदिरा काँग्रेस नेत्यांच्या हालचाली सुरू झाल्या. कांतिलाल घिया यांच्या नेतृत्वा-खाली पाच-सहा आमदारांचा एक छोटा गट प्रथम फुटला. पुढे ही लागण वाढत गेली. स्वतंत्र पक्षातही फूट पडून काही आमदार इंदिरा काँग्रेसला मिळाले. हितेंद्र देसाईंनी बहुमत गमावले व ३१ मार्च १९७१ ला मंत्रिमंडळाचा राजि-नामा दिला. हे मंत्रिमंडळ पाडण्यात चिमणभाई पटेल यांचा महत्त्वाचा भाग होता. तेव्हापासून मुख्यमंत्री बनण्याचा



त्यांचा प्रयत्न होता. ही आकांक्षा सव्वा दोन वर्षांनी सफल झाली.

हितेंद्र देसाई मंत्रिमंडळ गडगडल्यानंतर इंदिरा काँग्रेसला मंत्रिमंडळ बनविण्याची संधी मिळाली. कांतिलाल घिया त्यावेळी विधानसभा काँग्रेसपक्षाचे नेते होते. घिया आणि चिमणभाई यांच्यामधील सत्तासंघर्ष तेव्हा पासूनचा आहे. पक्षाचे नेतृत्व बदलण्याची मागणी चिमणभाई गटाने केली, केंद्रीय नेते उमाशंकर दीक्षित यांनी अहमदाबादला भेट देऊन काँग्रेस आमदारांचा कल अजमावला. चिमणभाईंच्या बाजूने हा कल असल्याने दिसून आले. पण त्यावेळी मंत्रिमंडळ न बनविता राष्ट्रपतींची राजवट जारी करण्याचा निर्णय काँग्रेसश्रेष्ठींनी अचानक घेतला. हाती आलेले मुख्यमंत्रिपद गेल्याने चिमणभाईंची निराशा झाली. हितेंद्र देसाई मंत्रिमंडळ पाडण्यासाठी आपली मदत घेतली पण मुख्यमंत्री बनण्याची संधी येताच वरिष्ठ काँग्रेस नेत्यांनी आपणास दूर सारले असे त्यांना वाटले. चिमणभाई गटाला मुख्य पाठिंबा पटेल व जमीनदार वर्गाचा असून त्यापैकी बहुतेक स्वतंत्र पक्षातून आणि संघटना काँग्रेसमधून इंदिरा काँग्रेसमध्ये आले आहेत.

## ओझांची निवड

मध्यंतरीच्या काळात रतुभाई अदानी यांनी आपल्या गटाचे वजन वाढविले. प्रदेश काँग्रेसचे ते अध्यक्ष होते. विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार निवडणाऱ्या प्रदेश निवडणूक समितीवर त्यांनी आपलीच माणसे घेतली. पक्षाची तिकिटे त्यांच्याच गटाच्या लोकांना अधिक मिळाली, निवडणुकात इंदिराकाँग्रेसने गुजरात विधानसभेच्या एकूण १६८ पैकी १४० जागा जिंकून प्रचंड विजय मिळविला. मुख्यमंत्री पदासाठी अदानी आणि घिया यांच्यात त्यावेळी स्पर्धा होती. चिमणभाई पटेलांनी घियांचे नेतृत्व मान्य करून आपल्या गटाचा पाठिंबा त्यांना दिला होता. दोन गटामधील ही तीव्र सत्तास्पर्धा लक्षात घेता मुख्यमंत्र्यांची निवड पंतप्रधानांवरच सोपवावी अशी सूचना पुढे आली. मुख्यमंत्री पदाबाबत तुमचा निर्णय आम्ही मान्य करू असे संयुक्त पत्र गुजरातच्या बारा प्रमुख नेत्यांनी इंदिरा गांधींना पाठविले. अदानी किंवा घिया यापैकी कोणालाही मुख्यमंत्री केले तरी दुसरा गट नाखूष होईल तेव्हा या दोन्ही नेत्यांना बाजूस ठेवून राज्यातील कोणत्याच गटाशी संबंध नसलेल्या घनश्याम ओझा यांना इंदिरा गांधींनी मुख्यमंत्री निवडले. दोन्ही गटांना ते एकत्र आणतील या आशेने त्यांची निवड करण्यात आली पण ही आशा सफल झाली नाही. गटबाजी नाहीशी झाली नाही. उलट ओझाच गटबाजीच्या राजकारणात ओढले गेले. अदानी मंत्री झाल्यानंतर प्रदेश काँग्रेस अध्यक्षपदाचा त्यांनी राजिनामा दिला. या अध्यक्षपदासाठी अदानी गटाने झीनाभाई दर्जी यांना उभे केले. या निवडणुकीत ओझांनी उघडपणे दर्जींना पाठिंबा दिला. दर्जी निवडून आले. घिया गटाचा पराभव झाला पण दोन्ही गटातील संघर्ष व

कटुता वाढत गेली. घिया व चिमणभाई गटाच्या काही सभासदांचे क्रियाशील सभासदत्वाचे अर्ज दर्जींनी अदानींच्या सांगण्यावरून फेटाळले अशी त्या गटाने तक्रार केली व या प्रकरणी काँग्रेस श्रेष्ठींनी हस्तक्षेप करावा अशी मागणी केली. उलट घिया व चिमणभाईविरुद्ध कारवाईची मागणी दर्जी-अदानी गटाने केली. मुख्यमंत्री ओझायांनी चिमणभाईंकडचे उद्योग खाते काढून त्यांना नियोजन खाते दिले हा या कारवाईचाच भाग होता.

## सोशालिस्ट फोरम

प्रदेश अध्यक्षपदाच्या निवडणुकीत सोशालिस्ट फोरमने दर्जींना पाठिंबा दिला होता पण फोरमच्या काही कार्यकर्त्यांनीच मुख्यमंत्री ओझा आणि प्रदेश अध्यक्ष दर्जी यांच्याविरुद्ध बंडाचे निशाण उभारले. त्यांनी सह्यांची मोहीम सुरू केली व १३९ पैकी ८० आमदारांच्या सह्या मिळविल्याचा दावा केला. ओझा गटानेही सह्याची प्रति मोहीम सुरू केली आणि १०० सह्या जमविल्याचा दावा केला. यापैकी कोणाचा दावा खरा मानावयाचा हे ठरविणे कठीण होते. काही 'कुंपणावरच्या' आमदारांनी दोन्ही बाजूंनी सह्या केल्या असल्या पाहिजेत हे उघड होते. घिया व चिमणभाई या दोघांनीही या सह्या मोहिमेशी आपला काही संबंध असल्याचा इन्कार केला पण त्यांच्या पाठिंब्याशिवाय फोरमच्या हालचालींना एवढा जोर चढणे शक्य नव्हते.

सोशालिस्ट फोरमचे एक प्रमुख नेते गंगाराम रावळ यांनी पंतप्रधानांना एक पत्र पाठवून त्यात मुख्यमंत्री ओझांविरूद्ध अनेक आरोप केले. ओझा गटाची सहानुभूती संघटना काँग्रेसकडे, त्यांचा पाठिंबा अदानी–दर्जी गटास असून मंत्रिमंडळातील इतर मंत्र्यांना ते विश्वासात घेत नाहीत. पक्षाचा समाजवादी कार्यक्रम ते उत्साहाने अंमलात आणीत नाहीत वगैरे आरोप त्यात होते. मुख्यमंत्र्यांच्याविरूद्ध एकवीस कलमी आरोप पत्र बंडखोर गटाने तयार केले होते.

बंडखोर गटाच्या हालचालींना जोराची चालना बिहारमधील घटनांनी मिळाली. बिहार विधिमंडळ काँग्रेस पक्षाने २४ जूनच्या बैठकीत मुख्यमंत्री केदार पांडे यांच्या नेतृत्वावर बहुमताने अविश्वास व्यक्त केला. त्यानंतर तीनच दिवसांनी २७ जूनला गुजरात विधानसभा काँग्रेस पक्षाच्या १३९ पैकी ७० म्हणजे बहुसंख्य सभासदांची बैठक भरून मुख्यमंत्री ओझा यांच्यावर अविश्वास व्यक्त करण्यात आला. नेत्यावर विश्वास व्यक्त करण्यासाठी पक्षाची रीतसर बोलावलेली ही बैठक नव्हती तेव्हा तिचा निर्णय माझ्यावर बंधनकारक नाही असे म्हणून ओझा यांना राजिनामा देणे लांबणीवर टाकता आले असते पण त्यांनी तसे न करता ताबडतोब राजिनामा देण्याचा निर्णय घेतला. वाटेल त्या कारवाया करून सत्तेला चिकटून राहाण्याच्या सध्याच्या काळात ओझा यांनी आपल्या राजिनाम्याने चांगला पायंडा पाडला. पक्षाच्या बहु-

संख्य सभासदांचा आपणास पाठिंबा नाही हे उघड दिसत असताही शेवट-पर्यंत सत्तेला चिकटून राहणाऱ्या बिहारचे पांडे यांच्या पार्श्वभूमीवर तर ओझा यांचा राजिनामा विशेष डोळयात भरतो.

### तडजोडीचे प्रयत्न

ओझांनी २८ जूनला राजिनामा दिला त्यानंतर नव्या नेत्याची निवड होण्यास तीन आठवडचा एवढा दीर्घकाळ लागला. पक्षाची बैठक तावड-तोब घ्यावी अशी बंडखोर गटाची मागणी होती व ती योग्य होती. पण ती मान्य करण्यात आली नाही. पक्षाची बैठक प्रथम ९ जुलैला घेण्याचे ठरले पण १४ जुलैपर्यंत ती पुढे ढकलण्यात आली. दरम्यानच्या काळात दोन्ही गटात तडजोड घडवून आणण्याचे प्रयत्न वरिष्ठ कॉंग्रेस नेत्यांतर्फे स्वर्णसिंग यांनी केले पण त्यात त्यांना यश आले नाही. आपली बाजू कमकुवत आहे, आपल्या-मागे बहुमत नाही याची जाणीव ओझा गटास झाली होती. तरीही सत्तेवर राहण्याची हाव त्या गटास स्वस्थ बसू देईना. ओझा यांनी तडकाफडकी राजि-नामा दिला हेच आधी त्यांच्यापैकी काहींना पसंत नव्हते. बहुसंख्य सभा-सदांचा पाठिंबा मिळवायचा तर बंड-खोर गटाचे काही सभासद फोडण्या-शिवाय दुसरा मार्ग नव्हता. या प्रयत्नात कांतिलाल घियांसारखा वजनदार मासा त्यांच्या गळाला लागला. वास्तविक ओझांना मुख्यमंत्री पदावरून दूर करण्यासाठी बंडखोर गटाने केलेल्या हालचालीत चिमणभाईंच्या बरोबरीने घियांनीही महत्वाचा भाग घेतला होता पण बंडखोर गटात चिमणभाईंचा प्रभाव जास्त आहे, त्या गटात राहून आपणास मुख्यमंत्रीपदाची संधी मिळणार नाही हे घियांनी ओळखले. बंडखोर गटातून ते बाहेर पडले. गटबाजीने पक्षाची हानी झाली. तिला आता मूठमाती दिली पाहिजे असा त्यांना साक्षात्कार झाला व आपण कोणत्याही एका गटाचे नेते म्हणून नव्हे तर सर्वांच्या पाठिंब्याची अपेक्षा करून नेते पदासाठी उभे रहात आहोत असे घिया यांनी जाहीर केले. त्यांचा हा उघड संधिसाधू पवित्रा होता. ओझा गटाने त्यांना पाठिंबा दिला किंबहुना त्यांचा पाठिंबा आपणास मिळ-णार आहे अशी खात्री झाल्यावरच बंडखोरांचा गट सोडण्याचा निर्णय घियांनी घेतला. घियांबरोबर बंडखोर-गटाचे आणखी काही सभासद फुटतील व आपल्यामागे बहुमत होईल हा ओझा गटाचा अंदाज मात्र चुकला.

### मतमोजणी दिल्लीत का?

आपल्या यशाची खात्री नसल्याने निवडणुकीचा प्रसंगच टाळावा आणि बिहारप्रमाणे मुख्यमंत्र्यांच्या निवडीचा प्रश्न पंतप्रधानांवर सोपवावा असाही प्रयत्न ओझा गटाने केला पण बंडखोर चिमणभाई गटाने या सूचनेस तीव्र विरोध केला. दोन्ही गटात तडजोड होईना, पंतप्रधानांकडे प्रश्न सोपविण्या-वरही एकमत होईना तेव्हा निवडणूक घेणे अटळच झाले. त्याप्रमाणे १४ जुलैला नेतेपदासाठी गुप्त मतदान झाले

त्याचा निर्णय वास्तविक त्याच दिवशी जाहीर व्हावयास काहीच हरकत नव्हती. १३९ मते तर मोजावयाची पण सीलबंद मतपेटी दिल्लीस नेऊन दोन दिवसांनी मतमोजणी करण्यात आली. मतपेटी दिल्लीस नेण्याची काय आवश्यकता होती? गांधीनगरला गुप्त मतदान आणि दोन दिवसांनी दिल्लीला मत-मोजणी. काँग्रेस पक्षाच्या इतिहासात अशा पद्धतीने नेता निवडला गेल्याची ही पहिलीच वेळ आहे. गांधीनगरलाच मतमोजणी झाली असती तर त्यात काही गैरप्रकार होण्याची भीती दोन्ही गटांना वाटत होती काय? एकाच पक्षातील गटांचा एकमेकांविषयी केवढा हा अविश्वास! दिल्लीला मतपेटी नेण्यात स्वर्णसिंगांनाही काही वावगे वाटले नाही. दिल्लीला मतपेटी नेण्याची जरूरी नाही येथेच मतमोजणी होईल आणि ती, पूर्ण निःपक्षपातीपणाने होण्याची दक्षता घेतली जाईल असे त्यांनी दोन्ही गटांना सांगायला हवे होते. त्यांचा शब्द निश्चित मानला गेला असता. पक्ष-नेत्याची निवड गुप्त मतदान घेऊन लोकशाही पद्धतीने व निःपक्षपाती वातावरणात झाली पाहिजे हे खरे पण त्यासाठी मतपेट्या दिल्लीला नेण्याचा पायंडा अनावश्यक आहे अनिष्ट आहे. तो येथेच थांबला पाहिजे.

## बिहार आणि गुजराथ

बिहार व गुजरातच्या परिस्थिती-तील एक फरक म्हणजे बिहारमध्ये दोन्ही गट तुल्यबळ नव्हते. मिश्रा यांच्या गटास दोनतृतीयांश व पांडे यांच्या गटास फक्त एक तृतीयांश सभासदांचा पाठिंबा होता. गुजरातमधील दोन्ही गट जवळजवळ तुल्यबळ आहेत याचा अर्थ दोन्ही गटांच्या सहकार्याशिवाय स्थिर सरकार स्थापन होऊ शकणार नाही. चिमणभाईंच्या गटातील काही सभासद मंत्रिपदाची व अधिकारपदाची आमिषे दाखवून घिया गटाने आपल्या बाजूला वळविले आणि मुख्यमंत्री बदलण्याची मागणी केली तर काँग्रेस श्रेष्ठी ती कोणत्या आधारावर नाकारू शकतील? आणि त्यांनी ती नाकारली तर असंतुष्ट गट पक्षाबाहेर पडून सत्तेसाठी विरोधी पक्षांशीही हातमिळवणी करण्याचा संभव आहे. नजीकच्या काळातच हे घडेल असे नाही. पण निवडणुका जवळ येत चालल्या की या दिशेने हालचाली होऊ लागतील.

केंद्रीय नेत्यांनी हस्तक्षेप न करता किंवा पंतप्रधानांनी आपला माणूस नेता म्हणून न लादता विधिमंडळ काँग्रेस पक्षानेच नेता निवडण्याची प्रथा गुजरात-पासून पुनः सुरू झाली हे लोकशाहीच्या दृष्टीने चांगले झाले. पण गटबाजीने ग्रासलेल्या पक्षात अल्पबहुमताने निवडला गेलेला नेता अल्पकाळच टिकून राह-ण्याचा संभव असतो. त्यातून निर्माण होणारी अस्थिरता टाळावयाची असेल तर बिहारवरील लेखात ('लादलेले मुख्यमंत्री गडगडले.' माणूस ७ जुलै १९७३) मी सुचविल्याप्रमाणे पक्ष-नेत्यास दोन तृतीयांश सभासदांच्या पाठिंब्याशिवाय दूर करता येणार नाही असा संकेत रूढ केला पाहिजे. हा संकेत

कसोशीने पाळला आणि पक्षांतरास आळा घालणारे बिल लौकर पास करून घेतले तरच लोकशाहीला लागलेले हे गटबाजीचे ग्रहण सुटण्याची थोडीफार आशा आहे.

### अंतर्गत गटबाजी

१९६७ च्या निवडणुकात काँग्रेसच्या पराभवाचे एक प्रमुख कारण काँग्रेस अंतर्गत गटबाजी व फाटाफूट हे होते. तीच परिस्थिती पुनः निर्माण होऊ पहात आहे आणि शिस्तबद्ध संघटित पक्ष उभारण्यात पंतप्रधान इंदिरा गांधींना आलेल्या अपयशाचा हा परिणाम आहे. पक्षांतर्गत बंडखोरी यापुढे आम्ही चालू देणार नाही त्याविरुद्ध कडक उपाय योजले जातील. असा इशारा काँग्रेस श्रेष्ठींनी दिला असला तरी त्यात काही दम नाही. वरिष्ठ काँग्रेस नेत्यात हे सामर्थ्य असते तर त्यांनी यापूर्वीच गटबाजीविरुद्ध कडक उपाय योजले असते त्यांच्यात ती कुवत नाही हे आता पर्यंतच्या अनुभवावरून उघड झाले आहे

अंतर्गत गटबाजीने काँग्रेस कमकुवत झाली म्हणून विरोधी पक्षांना समाधान वाटेल पण विरोधी पक्ष तरी गटबाजीपासून कोठे अलिप्त आहेत ? विधायक कार्य, निरनिराळ्या क्षेत्रातील अन्यायाविरुद्ध संघर्षाचे कार्य ही क्षेत्रे मागे पडून सध्या सर्व पक्ष सत्तेच्या राजकारणामागे लागले आहेत. त्यातूनच आपल्या लोकशाहीला गटबाजीची ही कीड लागली आहे. तिचा नायनाट केला नाही तर लोकशाहीवरचा लोकांचा विश्वासच उडून हुकूमशाहीबद्दल अनुकूल मनोवृत्ती निर्माण होऊ लागेल.

● ● ●


# पांढऱ्या डागांवर मोफत इलाज

**पांढऱ्या डागांवरील औषधाचा महत्त्वपूर्ण शोध. अनेक वर्षांच्या कठोर प्रयत्नानंतर आम्ही अनेक आडाखे बांधून पांढऱ्या डागांवरील औषधे तयार करण्यात यशस्वी झालो आहोत. एकदा औषध घेतल्यावर आपणांस त्याच्या गुणांची खात्री पटेल. ह्यापासून हजारो लोकांनी लाभ घेतलेला आहे. आजही बरेचजण याचा लाभ घेत आहेत. प्रचारार्थ औषधाची एक बाटली नमुना म्हणून दिली जाते. पांढऱ्या डागांपासून मुक्त झाल्यावर आपल्यासारख्याच या रोगाने पछाडलेल्या रोग्यांना औषध घेऊन रोगापासून मुक्त होण्यासाठी अवश्य सांगा.**

**प्रेम ट्रेडिंग कंपनी (S. N.) M. पो. कतरी सराय (गया)**

# चेहरा

रवीन्द्र लाखे



मम्मी आयाचा आधार घेत खुरडत खुरडत ड्रॉईंगरूमच्या दिशेने येत होती

–तिची पावलं भ्रांत पडत होती.

–मला असं हे मम्मीचं आंधळं जीवन कधी कधी फाऽर दुःखी करी.

माझी मम्मी चेहऱ्यानं जरी कुरुप असली तरी तिची माया अमोल आहे. अंकलना तिची का एवढी किळस वाटते कोणास ठाऊक ! अंकल नेहमी आईला फाऽर तोडून बोलतात.

"दिवसभर आराम करायचा. आंधळेपणाच्या नावानी !" हे नेहमीचं त्यांचं वाक्य. माझा फार तळतळाट होई. मम्मी अगतिक होऊन नुसते अश्रू ढाळी. ते अश्रू पाहून माझ्याही डोळ्यां-भोवती अश्रूंचे तोरण तयार होई.

कधी कधी माझ्या घशातून हुंदके बाहेर पडत. माझ्या हुंदक्यांचा आवाज ऐकून मग मम्मी बिचारी कुणाचाही आधार न घेता 'बेटा बेटा' करत माझ्यापाशी यायची, धीर द्यायची. मी धीर द्यायचा सोडून तिच मला धीर द्यायची, माझं सांत्वन करायची.

"पण हे असं का मम्मी"...मी उगाच त्रागा करून घ्यायची.

"बेटा, सखीनं माझ्या ललाटी हेच लिहिलंय !" मम्मी म्हणायची. माझं बालमन सखीच्या लिखाणावर विश्वास ठेवायचं. मम्मीलाही त्यामुळे बरं वाटायचं.

"मम्मीचं आंधळेपण ! का ?
काळोखी जग ! कसं ?
चेहरा कुरुप ! का ?
असे अनेक प्रश्न माझ्या मनाभोवती

रुंजी घालायचे. त्यांची उत्तरे अजूनही सापडली नाहीत मला. उत्तर मिळविण्यासाठी मी विचार करायचो. त्यामुळे मनाला एकप्रकारची मरगळ यायची. त्यामुळे मम्मीच्या जीवनातील रखरख मला अधिक जाणवायची. पण विचार तीव्र झाले की मी त्यातून डोकं काढून घ्यायचो. दुसऱ्या गोष्टीत मन रमवण्याचा प्रयत्न करायचो.

मी अंकलना नेहमी मनातून शिव्या मोजायचो. त्याशिवाय दुसरं काय करणार मी? मारणाऱ्यांचा हात धरू शकतो पण बोलणाऱ्याचं तोंड कसं थांबवायचं?

पप्पांना अंकलचं मम्मीबद्दलचं घाणेरडं बोलणं सांगायचो पण पप्पाही त्याबद्दल काहीही प्रतिक्रिया दाखवत नसत. माझ्या पप्पांचं मेडिकल स्टोअर्स आहे. त्या दुकानाच्या व्यवहारात ते सदैव लडबडलेले असतात. घरात लक्ष द्यायला त्यांना सवड होतीच कुठे? अंकल मात्र जातीनं लक्ष देत मम्मीकडे! तिला छळण्यासाठी! तो छळवाद पाहून माझी आतडी पिळवटून निघे! पण...पण मी तरी काय करू शकणार?

पण माझ्या पप्पांनाही काहीतरी दुःख होतं कारण कधी कधी पप्पा स्वतःला खोलीत कोंडून घेत आणि सतारीवर करुण स्वर काढत बसत!

मला हे सारं माझ्या स्टडीरूममधून दिसायच! पप्पांचं हे असं वागणं मला गूढ वाटायचं! ते अजूनही मला उकललं गेलं नाहीय्! मी एकदा अंकलना विचारलं तर ते म्हणाले,

"वेडा आहे झालं!" मी हिरमुष्टा झालो. पप्पा जर वेडे असते तर त्यांना एवढं आयुष्य पाहायलाच मिळालं नसतं! अंकलच वेडे आहेत.

पप्पा कधी कधी आमच्या घरातल्या एका सुंदर तरुणीच्या फोटोकडे तासन्‌तास पाहात बसायचे! हेही कोडं मला सुटलं नाहीय् की पप्पा त्या फोटोकडे एवढा वेळ का पाहात बसतात? त्या तरुणीच्या सौंदर्याबद्दल शंकाच नव्हती! परंतु मलाही त्या फोटोकडे तासन् तास पाहात बसावेसे वाटे ते केवळ सौंदर्याच्या आकर्षणामुळे नव्हे परंतु एका अनामिक परंतु निश्चित अशा अकर्षणामुळे! तिच्याशी माझे काहीतरी लागेबांधे आहेत असं माझं अंतर्मन मला नेहमी सांगायचं! अनेकवेळा ती तरुणी कोण आहे हे जाणून घेण्याचा प्रयत्न मी केला पण पप्पांनी दाद लागू दिली नाही! मम्मीला विचारायचं म्हटलं तर तिला दिसत नव्हतं! अंकलना काही विचारायची सोयच नव्हती! त्यामुळे आमच्या घरातलं वातावरण मला गुढ वाटे! असं कुठलं रहस्य त्या फोटोत होते कुणास ठाऊक? पण आमच्या घरातली मंडळी त्या फोटोबद्दल माहिती सांगण्याचे कटाक्षाने टाळीत!

मम्मीला एकदा त्या फोटोतल्या तरुणीबद्दल विचारले आणि मम्मीचा चेहरा एकदम ओढल्यासारखा झाला.

"बेटा कुठला फोटो? कोणती तरुणी? मला कुठे दिसतय काही! पप्पांनी आणला असेल एखादा फोटो

नंतर!" असं बोलून मम्मीने डोळे पुसले! 'नंतर' ह्या शब्दाचा अर्थ काहीच कळला नाही मला!

"नंतर म्हणजे काय ग मम्मी?"— मी विचारलं.

"नंतर म्हणजे...माझी दृष्टी गेल्या-नंतर! हे आंधळं जीवन माझ्या वाट्याला आल्यानंतर!" असं बोलून मम्मीने एक लांब सुस्कारा टाकला. शेवटी तिनंही माझ्या प्रश्नांची उत्तरं टाळली! कारण...तिला, नक्कीच माहीत होतं की ती फोटोतली तरुणी कोण आहे!

अनेक दिवसांपर्यंत मला साऱ्या काही शंका, प्रश्न सतावित होते! पण मी नंतर ह्या साऱ्या शंका आणि प्रश्न विसरण्याचा प्रयत्न केला त्यात मी यशस्वी झालो! अनेक वर्षे मी ते विसरलेलोच होतो पण...

एकदा मला ह्या साऱ्या प्रकरणाची आठवण झाली! शालेय शिक्षण संपलं होतं! एक दिवस मला माझ्या मम्मीची खालावलेली, ढासळलेली प्रकृती फाऽर जाणवली! आणि मग मी एकदम तिची प्रकृती एवढी का ढासळावी ह्याची कारणे शोधू लागलो आणि मग...मला मम्मीची छळवणूक, अंधकारमय जीवन, तिच्या भावनांचा कोंडमारा, तिचं दुःख, सर्व गोष्टींची तीव्रतेने जाणीव झाली! ह्या जाणीवेमुळे मी मम्मीला आंधळेपणा कसा आला असावा, का आला असावा, अंकल असे का वागतात, पप्पाही असे विक्षिप्तपणे का वागतात, ह्या सर्व गोष्टींचा छडा लावण्याचे ठरविले आणि त्याप्रमाणे प्रयत्नही सुरू केले!

एकदा आम्ही सर्व मंडळी डीनर घेत होतो! मम्मीच्या तोंडाची चव गेली असल्याकारणाने ती 'हे का नाही केलं, ते का नाही केलं' अशी विचारपूस करत होती! अंकलचे कान तिकडेच होते! ते एकदम अद्वातद्वा बोलू लागले!

"जे काही ताटात पडलय ते खावं माणसानं, उगाच हेच नाही केलं अन् तेच नाही केलं, अशी कुरकर करू नये!..."

आणखी बरचसं, माझ्या मनाला लागेल, मम्मीला दुःख होईल अशा-प्रकारचं अंकल बोलले! माझा क्रोध अनावर झाला! अतीव क्रोधामुळे माझ्या मनावरचा ताबा उडाला! मन भडकून उठलं मीही अंकलना चांगलच सुनावलं!

अंकल एकदम सून्न झाले! मग जेवण एकदम शांतपणे पार पडले! कारण पुढे अंकलनी तोंडच उघडलं नाही, म्हणजे बोलण्यासाठी! मी एवढं मम्मीच्या बाजूनं बोललो त्यामुळं मम्मीला बरं वाटलं असावं! आता-पर्यंत मम्मीची कुठलीही गोष्ट समजावून घेण्याचा प्रयत्न कोणीही केला नव्हता!

"असं बोलायला नको होतस जॉन!"...पप्पा म्हणाले! मला पप्पां-चाही राग आला! पण मी स्वतःला सावरलं!

आमचं जवण झालं! मम्मीला मी आधार दिला आणि बेडरूममध्ये नेलं तिच्या! आणि माघारी फिरलो, पण

मम्मीच्या हाकेनं दोन पावलांवरच थबकलो !

"जॉन बेटा !..." क्षीण आणि कातर स्वरात तिनं मला हाक मारली ! तिच्या स्वरात दुःख होतं पण थोडा समाधानाचाही सूर होता !

" बेटा, तू कशाला माझ्यासाठी स्वतःच्या जीवाचा आटापीटा करून घेतोयस् ! जे भोग माझ्या नशीबी आहेत ते मला भोगायलाच पाहिजेत जॉन बेटा !"—मम्मी म्हणाली

'मम्मी, मी तुला असं बोलू देणार नाही आता ! मी हे लहानपणापासून पाहातोय् ! इतके दिवस सहन केलं ! पण आता नाही राहावत मला !"... एवढं मी कसंबसं बोललो आणि मला रडूच कोसळलं ! मी मम्मीच्या कुशीत शिरून मनोसोक्त रडलो !

"मम्मी, ह्यापुढं मी जे काही करीन ते करायला मला तू अडवू नकोस प्लीज ! पण एवढा माझ्यावर विश्वास ठेव की मी जे काही करीन ते अत्यंत हीन आणि वाईट असे नसणार ! मी जे काही पुढे बोलणार आहे, करणार आहे ते चांगल्या हेतूनेच करणार आहे !...खरं म्हटलं तर काय बोलावं तेच सुचत नव्हतं ! मी जे काही बोललो ते पूर्ण सत्य नव्हतं ! अर्धसत्य होतं ! पुढे मी काही भयंकर कृत्य करणार होतो असं काहीच नाही !

मी मम्मीच्या बेडरूममधून बाहेर पडलो.

त्या तरुणीचा फोटो दिसला !

हसरा ! लाजरा ! मोहक !

माझी दृष्टी बदलली !

सौंदर्य पाहण्याची !

माझी उत्सुकता अत्यंत वाढली, ती तरुणी कोण हे जाणून घेण्याची ! मी परत तसाच माघारी फिरलो !

मी मम्मीला विचारलं,

"आतातरी सांग मम्मी तो फोटो कोणाचा आहे ?.. म्हणजे ती तरुणी कोण आहे ?"

"अजूनही ती तरुणी कोण हे जाणून घ्यायचं खूळ तुझ्या डोक्यातून गेलेलं दिसत नाहीय् !—मम्मी हसत हसत उद्गारली !

"मम्मी तू माझा प्रश्न हसण्यावारी नेऊ नकोस ! आज मला माझ्या प्रश्नाचं उत्तर समजलंच पाहिजे !—मी मम्मीला बजावलं !

"कसं सांगू तुला जॉन...!" मम्मीनी डोळ्याला रूमाल लावला !

"इतके दिवस तू ते गुप्त ठेवलस ! पप्पानीही नाही सांगितलं ! पण आता मात्र सांग !"—मी आज्ञेनं म्हणालो.

मम्मीचे ओठ हालले.

"तुझ्या पहिल्या आईचा बेटा !"

मला धक्काच बसला !

"मी तुझी सावत्र आई आहे बेटा !" दुसरा तीव्र धक्का ! मला कससंच वाटलं ! माझा माझ्या कानांवर विश्वासच बसेना !

"त्या आईनं तुला जन्म दिला बेटा ! आणि...आणि तिचा चेहरा नाहीसा झाला ह्या जगातून ! मग मी आणि तुझ्या पप्पांनी सांभाळ केला तुझा !"... मम्मी डोळे पुसत म्हणाली !

माझे कान एकदम बधीर झाल्यासारखे वाटले मला ! पण मम्मीनं तर सख्ख्या आईच्या प्रेमापेक्षाही जास्त प्रेम दिलं ! माझी मलाच लाज वाटली ! कारण मघा मी त्या फोटोकडे वेगळ्याच दृष्टीनं पाहिलं होतं !

" मम्मी तू कुणीही अस, कशीही अस पण तूच माझी सख्खी मम्मी आहेस ! "...मी असं म्हटल्यावर मम्मी मुसमुसून रडायलाच लागली ! तिच्या अश्रूंनी मी न्हाऊन निघालो ! तिच्या निरपेक्ष आणि अमोल प्रेमाने मी पुरता भांबावलो ! एक स्त्री आपल्या सावत्र मुलावर एवढं प्रेम करू शकते ?... प्रश्नच पडला मला !

माझ्या मम्मीचा चेहरा कुरुप आहे तरी पण ती हृदयाने, मनाने सुंदर आहे ! प्रत्येक क्षणास तिच्या चेहऱ्याविषयी माझ्या मनात विचार येतात ! ह्या क्षणालाही तिच्या चेहऱ्याविषयीचाच विचार माझ्या मनात आहे ! आणि म्हणूनच मला पेच पडलाय की पप्पांनी एवढ्या सुंदर पत्नीच्या मृत्यूनंतर आपल्या कुरुप आणि अंध मम्मीचा स्वीकार केलाच कसा ?

एकदा मी मम्मीला तिच्या कुरुप चेहऱ्याविषयी आणि अंधत्वाविषयी विचारलं तर ती म्हणाली की ते सर्व जन्मतःच आहे ! पण माझा विश्वास बसला नाही ह्या मम्मीच्या उत्तरावर. कारण मम्मीच्या चेहऱ्याची कातडी, भाजल्यामुळे जशी खराब होते तशीच झाली होती ! मला संशय आला ! मी मम्मीला त्या बाबतीत परत विचारण्याचे ठरविले.

दुसऱ्या दिवशी अंकल आणि पप्पा बाहेर गावी गेले ! बहुतेक दुकानाचं काम असावं कसलंतरी ! मीही ह्या संधीचा फायदा घ्यायचं असं ठरविले ! कारण घरात फक्त मी आणि मम्मी !

पण मध्येच अडथळा आला ! मम्मीची कोणीतरी एक मैत्रीण आली ! मग काय, झाल्या त्यांच्या गप्पा सुरू ! दोन मैत्रिणींच्या गप्पा म्हणजे मारुतीची लांबत जाणारी शेपटीच ! मम्मीची मैत्रीण मम्मीला ' ज्युलिया ' नावाने संबोधत होती ! ते नाव माझ्या कानावर पडत असताना मला सारखं वाटत होतं की मी ते नाव कुठतरी ऐकलय किंवा वाचलय !

अंधारात एखादी वस्तू शोधत असताना वीज चमकून जावी आणि आपणास हवी ती वस्तू सापडावी ! तसच घडलं ! ' ज्युलिया ' नावाच्या प्रकाशात, मला ती फोटोतली तरुणी कोण ह्याचं उत्तर सापडलं ! कारण त्या फोटोवरही ' ज्युलिया ' नाव लिहिलं होतं ! माझ्या मम्मीचाच फोटो होता तो ! किती सुंदर होती आपली मम्मी ! तिचा चेहरा कुरुप होण्याआधीचा तिचा फोटो असावा !

" काय गं, ज्यूली ! ह्या तुझाच फोटो आहे ना गं ? " मम्मीच्या मैत्रिणीने मम्मीला विचारलं.

" अ, हो ! "—मम्मीने घाबरत घाबरत उत्तर दिलं ! तिने दिलेलं हे उत्तर मी ऐकेन की काय अशी तिला भीति वाटत असावी !

पण खरं ते कळून चुकलं मला ! आपोआप ! मम्मीनं हे माझ्यापासून का लपवून ठेवलं ह्याचं कारण नाही समजलं मला ! मला खूप दुःख झालं ! का लपवून ठेवावं हे मम्मीनं माझ्यापासून ? माझ्या मनाला नसत्या संशयाने क्लेष का द्यावेत ? शेवटी मी निर्णय घेतला की हे सर्व प्रकरण काय आहे ते मम्मीकडून समजावून घ्यायचं !

मम्मीची मैत्रीण आली तशी निघून गेली ! मम्मीला काय माहिती की मी तिचं आणि तिच्या मैत्रिणीचं बोलणं ऐकलं आहे ते ! मम्मी तशीच आहे त्याच जागी बसून राहिली ! अगदी स्वस्थ ! तिच्या डोळ्यातून अश्रू वाहत होते ! तिचं पूर्वायुष्य फोटोमुळे आठवलं असावं ! कितीही झालं तरी पूर्वायुष्याची स्मृती ही मम्मीसाठी क्लेष कारकच ठरणार !

मी हळूहळू मम्मीच्या दिशेनं जाऊ लागलो ! मम्मीला माझी चाहूल लागली असावी. तिनं पटकन डोळे पुसले !

"मम्मी, मी तुमचं सर्व बोलणं ऐकलय् !" माझ्या मुखावाटे अस्पष्ट आणि दबके शब्द बाहेर पडले ! दुःखाने ओथंबलेले आणि अश्रूंनी डबडबलेले !

"बेटा, चूक केलीस तू !"—मम्मीनं माझा शोध घेत उत्तर दिलं ! मी काय चूक केली ती मला समजली नाही !

"मम्मी मला माहित्येय् तू का हे सर्व माझ्यापासून लपवून ठेवलंस ते !"

"समजलं ना ! तुझा गैरसमज दूर झाला ना ?" मम्मीनं काळजीनं आणि दुःखानं विचारलं !

"समजलं मला मम्मी ! मला दुःख होऊ नये म्हणून तू मला सांगितलं नाहीस !"...मी जवळ जवळ मुसमुसतच मम्मीला म्हणालो ! मम्मी एकदम शांत झाली ! भावनांचे कढ ओसरले होते ! मनाबाहेर पडून विलग झाले होते !

"मम्मी, तुझा फोटो मी आजवर अनेक वेळा पाहिलाय् ! पण...पण... तू एवढी सुंदर होतीस, मग तुझा चेहरा असा कुरूप कसा झाला आणि तुला अंधत्व का आलं ? आता तुला हे सारं सांगायलाच हवं !"—मी शांतपणे मम्मीला सांगितलं !

मम्मीनं डोळे पुसले, एक खोल श्वास घेतला आणि तिने आपलं पूर्वायुष्य कथन करावयास सुरुवात केली !

"तो फोटो माझा आहे हे तुला समजलच शेवटी ! त्यामुळेच तुझ्या मनात माझ्या कुरूप चेहऱ्याविषयीचे प्रश्न उभे राहिले असतीलच ! माझ्या कुरूप चेहऱ्याविषयी तू काही मला विचारू नयेस म्हणूनच मी, तो फोटो माझा आहे हे तुझ्यापासून लपवून ठेवलं ! पण कुठलीही गोष्ट गुप्त राहात नसते ! आता मी तुला सारं सांगायलाच हवं ! तर ऐक !

मी खूप सुंदर होते ! माझं सौंदर्य इतकं तेजस्वी होतं की मला पाहून बिजलीदेखील घाबरेल असं तुझे पप्पा म्हणायचे ! तुझे पप्पाही खूप सुंदर होते दिसायला ! पुरुषाला साजेलसा रुबाबदारपणा त्यांच्यात होता ! ह्या पुरुषी

रूबाबदारपणाचेच आकर्षण कारणीभूत झाले आमच्या प्रेमविवाहाला! कॉलेजच्या एका गॅदरिंगमध्ये आमची एकमेकांशी ओळख झाली! खरं म्हटलं तर एका विशिष्ट हेतूनेच, पप्पांनी माझ्याशी ओळख करून घेतली!

शेवटी दररोजच्या सहवासामुळे स्वर जुळले! प्रेमाचं गीत गुंफलं गेलं आणि आमचा विवाह झाला! तुझे अंकल मात्र हिरमुसले झाले, कारण ते तुझ्या पप्पांहून वडील असूनसुद्धा तुझ्या पप्पांचा विवाह आधी झाला!

तुझे पप्पा मोठया दिमाखाने माझ्या-समवेत गावात हिंडायचे! आपल्याला एवढी सुंदर पत्नी मिळाली ह्या गोष्टीचा अभिमान वाटायचा त्यांना! त्यात आमचा प्रेमविवाह! त्यांच्या प्रेमाला त्यामुळे अधिकच उधाण आले! कॉलेज-मध्ये माझे अनेक मित्र होते! त्यातले अनेकजण तुझ्या पपांना चाहणारे होते!

विवाह झाल्यावरसुद्धा मी त्यांच्याशी मित्रत्व ठेवलं होतं! त्यात मला वावगं असं काहीच वाटत नव्हतं! मी नेहमी-प्रमाणे माझ्या मित्रांशी वागत होते! त्यामुळे कधीही आम्हा दोघांना जर एखादा मित्र भेटला तर तो जास्त माझ्याशी गप्पा मारी! साहजिकच तुझ्या पप्पांचा आमच्या मित्रांमधला मान कमी झाला! जो तो माझ्याशी दोन शब्द बोलण्यासाठी संधी शोधा-यचा! तुझ्या अंकलचा तर फारच जळफळाट व्हायचा! तुझे पपा मला नेहमीं म्हणायचे तुझं सौंदर्य कधी तुझा वैरी न ठरो! मी असं मोकळेपणानं सर्व मित्रांशी बोलायचे, ह्या गोष्टीचं पर्यवसान दुसऱ्या कुठल्या गोष्टीत होईल की काय ह्याची तुझ्या पप्पांना फाऽर भीती वाटायची! पण मला मात्र त्याचं काहीच वाटत नव्हतं! आमच्या आंत-रिक प्रेमाला कोणीच बाध आणू शकणार नाही ह्याची मला खात्री होती!

पण...पण बेटा शेवटी माझ्या सौंदर्यानेच माझा घात केला! माझं सौंदर्य कोणा नीचाला पाहावलं गेलं नसावं! एका रात्री माझ्या चेहऱ्यावर कुणीतरी अॅसिड ओतलं! सर्व चेहरा भाजून निघाला! त्यात माझे डोळे गेले आणि मला अंधत्व प्राप्त झालं! त्या-वेळचा सुंदर आणि कोमल असा माझा चेहरा अत्यंत विद्रूप झाला, कुरूप झाला!" तुझ्या पप्पांनी माझा असा भयंकर चेहरा पाहिला आणि ते लहान मुलासारखे हमसून हमसून रडले! मलाही दुःख झाले. कारण ह्यापुढे मला काहीही दिसणार नव्हतं! त्यांची यथायोग्य सेवा करण्यास मी नालायक ठरले! पतीची सेवा माझ्या हातून घडणार नव्हती! ह्या घटनेच्या अगोदरपासूनच तू माझ्या पोटात खेळायला लागला होतास! खरं म्हटलं तर मी त्यावेळेस तुझ्या बाल-लिलांची स्वप्ने पाहात होते! तुझं मुख देखील मला पहायला मिळालं नाही तर बाललीला...!" पुढे मम्मीला बोलवलंच गेलं नाही!

"आणि म्हणूनच मी तुला सांगितलं की फोटोतली तुझी सख्खी आई आहे आणि मी सावत्र!"...मम्मी हुंदके


डोळे झांकले
तरी चव
कांहीं
लपत
नाहीं !
SATHE
MALTex
BISCUITS
ताजी, कुरकुरीत व
चवीला आगळीच –
वा! ही तर
साठे माल्टएक्स
बिस्किटेच!
ही आगळी वेगळी रुचिसंपन्नता
माल्टमुळेंच या बिस्किटांत आहे.
पचायला हलकी व भरपूर पोषक द्रव्यें असलेली
माल्टएक्स बिस्किटें कितीही खा पुन्हा पुन्हा
खावीशी वाटतात ती या माल्टमुळेच!
साठे
बिस्किटे
आजच खरेदी करा अन् फरक पहा जरा!
heros'·SBC 48C MAR

दाबत दाबत पुढे उद्गारली !

माझ्याही डोळ्यातून अश्रू वाहू लागले ! अतीव दुःखामुळे हुंदकेही बाहेर पडले नव्हते ! मम्मीचं हे कथन ऐकून एखाद्याचा गुण सुद्धा घातक कसा ठरतो हे मला कळून चुकलं !

त्या रात्री मला खूप वेळ झोपच आली नाही ! मम्मीनं सांगितलेली घटना इतकी वर्षे माझ्यापासून लपवून ठेवण्याचं काहीच कारण नव्हतं ! संशयाने मनात घर केलं ! त्यातच मी माझ्या संशयाचं उत्तर शोधू लागलो ! मम्मीच्या चेहऱ्यावर ॲसिड कोणी ओतलं असावं ? आणि असे त्या 'क्ष' व्यक्तीने का करावं ? वगैरे प्रश्नांचा विचार करता करता मला झोप केव्हा लागली ते समजलंच नाही !

मम्मीवर ओढवलेला प्रसंग मला झोपेत जसाच्या तसा दिसला ! कोणी एक बुरखाधारी इसम मम्मीच्या बेडरूममध्ये शिरलाय ! मम्मी बेडवर शांतपणे झोपलीय् ! तो बुरखाधारी इसम मम्मीच्या चेहऱ्यावर वाकला आणि त्याने मम्मीच्या चेहऱ्यावर कसलासा द्रवपदार्थ ओतला ? मम्मी किंचाळली !

मीही झोपेत ओरडलो !

"पकडा पकडा त्या हरामखोराला !"

ह्या स्वप्नामुळेच मी विचार करू लागलो ! ॲसिड ओतणारा नराधम घरातलाच असला पाहिजे ! मम्मीला तो नराधम कोण आहे हे माहीत असावं ! तिनं मला मुद्दाम सांगितलं नसावं !

सकाळ झाली होती ! मी उठलो ! तोंड धुतलं ! मम्मीच्या बेडरूममध्ये गेलो ! ट्रे घेऊन ! मुद्दाम ! मम्मी उठलेलीच होती ! मम्मीला चहा तयार करून दिला !

"गुड मॉर्निंग मम्मी !"—मी

"बेटा आज तू घेऊन आलास चहा !"...मम्मीनं हसत हसत विचारलं.

"हो-मम्मी"

मम्मीनं चहा प्यायला ! मीही प्यायलो !

माझी उत्सुकता वाढली होती तो नराधम जाणून घेण्याची !

अंकल तर नसावे ?

अंकलचं तिरस्काराने बोलणं !

मम्मीला हिणवणं !

माझा संशय दाट झाला !

"मम्मी, काल तू ॲसिड ओतणाऱ्या इसमाचं नाव नाही सांगितलंस !"

मी असं विचारलं आणि मम्मी हसली ! का हसली ते कळलं नाही मला !

"सांग ना !"

"अरे, मला कसा माहीत असणार तो इसम ! कारण डोळ्यावर ॲसिड पडल्यामुळे माझ्या डोळ्यासमोर संपूर्ण काळा समुद्र पसरला होता !"...मम्मी गूढ स्वरात म्हणाली.

मी हिरमुसला झालो ! कारण मी बदला घेणार होतो, त्या नराधमाला जन्मभर आठवण राहील अशी अद्दल घडविणार होतो !

मम्मीनं सांगण्याचं टाळलं म्हणजे

तो नराधम अंकलच असणार! अंकलनीच हे दुष्ट कारस्थान केलं असणार!

"मग पप्पांना माहिती आहे कोण आहे तो इसम ते?"

मी आशेनं मम्मीला विचारलं.

ती 'हो' म्हणाली!

पप्पा आज घरात नव्हते! संध्याकाळी ते परत येणार होते! संध्याकाळपर्यंत मी धीर धरला! संध्याकाळी पप्पा आले!

पप्पांनी वॉश घेतला!

न्याहारी आटोपली!

मी पप्पांसमोर जाऊन उभा राहिलो!

"गुड इव्हीनिंग पप्पा"

---


**पुरंदरच्या बुरुजावरून**

---

**ब. मो. पुरंदरे**

---

**मूल्य : चार रुपये**

---

**राजहंस प्रकाशन**
**पुणे ३०**


---

"गुड इव्हीनिंग!"–वर्तमानपत्रातून लक्ष न काढता पप्पांनी प्रत्युत्तर दिलं!

"पप्पा...मला, तुम्हाला काही विचाराचंय!"–मी थंड स्वरात पप्पांना सांगितलं!

"काय?"–पप्पांनी हसतच विचारलं! त्यांना आश्चर्य वाटलं असावं माझ्या बोलण्याचं!

"तुम्हाला त्याचं उत्तर माहिती आहे!"–मी म्हटलं

"कसलं?"

"मी विचारणार आहे त्या प्रश्नाचं!"

"अरे मग विचार ना!"–पप्पा उत्तरले. मी काही क्षण घुटमळलो! आणि मग धैर्य करून पप्पांना विचारलं!

"पप्पा, मम्मीच्या मुखावर ॲसिड फेकणारा नराधम कोण आहे ते मला सांगा!"

पप्पा अवाक् झाले!

"पण तुला हे सर्व कोणी सांगितलं!"

पप्पांनी मला विचारलं, जरा चमकूनच!

"मम्मीनी!"–मी उत्तरलो!

"मी नाही देणार ह्या प्रश्नाचं उत्तर!"– पप्पांनी अगदी ठासून मला सांगितलं!

मी गारच झालो, सुन्न झालो!

"का?"–निराशेनं मी विचारलं.

"लहान मुलांना ह्या गोष्टी समजून करायच्या काय आहेत!"–

पप्पांनी मला टाळलं!

"आता मी लहान नाहीय् पप्पा!

मला सारं समजतय! तुम्ही उत्तर देण्याचं टाळता आहात, कारण...कारण अंकलनीच हे सारं दुष्ट कारस्थान केलं असणार! होय ना!"–मी विचारलं मी जे काही बडबडलो ते ऐकून पप्पांचा चेहरा घामानं डबडबला होता!

"कसं सांगणार तुला जॉन!"– पप्पांनी चेहरा वळवला.

"सांगा पप्पा त्या नराधमाचं नाव सांगा!"

–मी चिडून म्हणालो.

पप्पा क्षणभर शांत राहिले.

"तुझ्या मम्मीच्या मुखावर ॲसिड फेकणारा नराधम..."पुढे पप्पा घुटमळले!

"कोण आहे तो सांगा पप्पा!"

"तो नराधम मी आहे जॉन! मार मला ठार मार जॉन!"

–पप्पांनी तीव्र उद्वेगाने सांगितलं! मी सर्दच पडलो.

मम्मीवर निरपेक्ष प्रेम करणारे माझे पप्पा, त्यांनी माझ्या मम्मीच्या सुंदर चेहऱ्याचा असा विध्वंस करावा!

माझा माझ्या कानावर विश्वास बसेना! मी जागेपणीच ऐकतोय की स्वप्नात, काहीच कळेना!

"नाही पप्पा! माझा विश्वास बसत नाहीय्!"

–मी ओरडलो! कारण पप्पांनी मम्मीच्या चेहऱ्याचा असा विध्वंस करावा ही कल्पनाच मला सहन झाली नाही!

"नाही जॉन, खरं आहे ते! तिचं सौंदर्य मला घातक वाटलं, आमच्या प्रेमात बाध आणणारं वाटलं म्हणून मी हे असं केलं जॉन! आणि...आणि तिच्यावर खिळणाऱ्या बुभुक्षित नजरा मला पाहावत नव्हत्या म्हणून मी हे असं केलं जॉन! मी अपराधी आहे जॉन! पण तो अपराध...ज्यूली माझ्यापासून दुरावली जाऊ नये म्हणून मी केला!"...पप्पा हमसून हमसून रडू लागले! त्या रडण्यात मला सतारीचे करुण स्वरही ऐकू येऊ लागले!

मी तसाच दुःखी मनाने परत फिरलो!

● ● ●

## मनोरा

पिसा येथील झुकता मनोरा हे जगातील कितवे तरी आश्चर्य आहे. हा मनोरा अजूनही थोडा थोडा झुकतो आहे, आणि योग्य काळजी न घेतल्यास आपला देह तो धरणीवर टाकेल, अशी भीती तज्ञांनी व्यक्त केली आहे. पिसालगतच्या परिसरातील नागरिकांनी भूमिगत पाणी वापरू नये, अशी सूचना पुढे आली आहे; त्यामुळे म्हणे पिसा-मनोऱ्याखालील पाण्याची पातळी उणावते आणि माती खचते. आता त्या नागरिकांची चांगलीच धांदल झाली आहे.

तात्पर्य : कोणताही मनोरा जितका भूमीवरती असतो तितकाच भूमीखालती-सुद्धा असतो!

# वनवासातील ‘शारदा’

रघुवीर मुळे
नासिक

उत्तर महाराष्ट्रात विद्यापीठ कोठे स्थापन करावे याचा उहापोह इतका झाला की, आता त्याची पुनरावृत्ती करण्यात अर्थ नाही. नासिकला, धुळयाला, जळगावला विद्यापीठ मिळावे म्हणून नेहमीच्या पद्धतीच्या मोर्चे, निदर्शने व आदी लोकशाही आंदोलने झाली. मंत्र्यांना अडविण्यात आले. अद्यापी निर्णय झालेला नाही.

नासिक जिल्ह्याला विद्यापीठ मिळावे म्हणून स्थानिक वृत्तपत्रातून नासिक किती चांगली जागा आहे याचे गुणवर्णनपर लेख देण्यात आले. मीही नासिकचाच असल्याने मलाही विद्यापीठ येथे व्हावे असे वाटणे साहजिकच आहे. पण प्राथमिक, माध्यमिक आणि महाविद्यालयीन शिक्षणाचा जिल्ह्यातील बट्ट्याबोळ पाहिला म्हणजे या जिल्ह्याला विद्यापीठ देऊन त्याची ‘जिल्हा परिषद’ करावयाची असेल तर कोणी हरकत घेईल असे वाटत नाही.

नासिक हे दंडकारण्य होते व (काळचा) रामाचे वास्तव्य वनवास काळात येथे होते. ‘हिस्टरी रिपिट्स्’ म्हणतात. याची शैक्षणिक क्षेत्रात तरी पुनरावृत्ती झालेली आहे. जिल्ह्याच्या शिक्षणक्षेत्रात ‘काळचा’ रामांनी धुडगूस घातला आहे. शारदेला वनवासाचे दिवस आणले आहेत आणि सरस्वतीवर घाला घालणाऱ्यांकडे शिक्षण खाते, जिल्हा परिषद, सरकार कानाडोळा करून त्यांच्यासाठी ‘अभयारण्य’च निर्माण करून दिले आहे.

बी. एड्. च्या प्रवेश प्रकरणी देणग्या घेतल्या जातात त्या घेऊ नयेत म्हणून मालेगावी आंदोलन झाले. सरकारने बी. एड्. प्रवेश आपल्या हातात घेतला. खूप घोळ झाला. अखेरी कायदेपंडित शिक्षण महर्षींनी हायकोर्टात जाऊन सरकारच्या प्रवेश निर्णयावर मनाई हुकूम बजावला. एक-दोन दिवसात २५०–३०० (प्रत्येकी) शिक्षणार्थींना प्रवेश देण्यात आले. ज्यांनी जिल्हा परिषद शिक्षण खात्याकडे अर्ज केले त्यांची स्थिती 'घरका न घाटका' अशी झाली. पैसे देऊन का होईना, प्रवेश तर मिळत होते, ते बरे असाच सूर सर्वत्र ऐकू येत आहे. शिक्षण खाते काहीही करू शकत नाही.

सरकारचा आणखी एक निर्णय म्हणजे माध्यमिक शिक्षकांना चेकने पगार द्यायचा. १५ तारखेपर्यंत पगारांच्या चेकचे वाटप झालेले नव्हते. २३० माध्यमिक शाळा जिल्ह्यात आहेत. जवळ जवळ ३५ शाळांनी पगारपत्रकेच भरून पाठविलेली नाहीत. ९७ शाळांनी चुकीची पत्रके पाठविली ती दुरुस्तीसाठी नाकारण्यात आली. भावी पिढ्यांच्या शिल्पकारांचा पावसात उभे राहून 'रेशन' आणण्याचा ताप १५ दिवस तरी शिक्षणखात्याच्या कृपेने टळला. 'पानां'च्या अभावी फक्त काहीच नमुनेदार शैक्षणिक संस्थांचा कारभार समोर ठेवीत आहे. कमी जास्ती फरकाने सर्वत्र (जिल्ह्यात) हाच प्रकार आहे.

## साठे पुराण

माजी समाज कल्याण मंत्री बाबुरावजी भास्कर हे अध्वर्यु असलेली राष्ट्रीय दलित सुधारक संघ राज्य, नासिक हे एवढे लांबलचक नाव धारण केलेली एक शिक्षणसंस्था जिल्ह्यात कार्यरत आहे. या संस्थेचे मनमाड नासिकला छात्रालय आहे. महात्मा गांधी विद्यालय म्हणून माध्यमिक विद्यालय आहे. बालवाडी व प्राथमिक शाळाही आहेत. यापैकी किती चालू आहेत आणि ज्या चालू आहेत त्या वर्षातून किती दिवस (सुट्ट्या सोडून) चालू असतात हा संशोधनाचा विषय आहे. या संस्थेच्या कारभाराविषयीच्या एवढ्या तक्रारी झेड्. पी. पासून वर सचिवालयापर्यंत आहेत, की 'कपाट' भरून जाईल. पण या संस्थेचे अनुदानासहित सर्व व्यवहार सुरळित चालू आहेत. या संस्थेचे प्रमुख आहेत श्रीमान आप्पासाहेब तथा रा. गो. साठे. सदगृहस्थ ऑनररी मॅजिस्ट्रेट आहेत. त्यांनी आमदारकीच्या तिकिटांसाठी मागणीही केली होती. श्री. साठे हे 'समाज क्रांती' साप्ताहिकाचे संपादकदेखील आहेत. शहर काँग्रेसचे ते (म्हणे) नेतेही आहेत. या संस्थेच्या कारभाराबद्दल–सॉरी भानगडीबद्दल !–लिहिले तर 'साठे-स्मृती-श्रुती-पुराण' होईल. त्याकरिता किरकोळ (?) प्रकार फक्त देतो.

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र टाईम्स या दर्जेदार वृत्तपत्रात या संस्थेबाबत बातमी प्रसिद्ध झाली होती, की ही

संस्था धर्मादाय आयुक्तांकडे नोंदलेली नाही. तरीही एवढचा शाळा चालवते कशी व त्याला अनुदान मिळते कसे? पण उठसूठ फालतू बातम्यांबद्दल खुलासे करणारे 'डी. पी ओ.' यांनी याबद्दल शिक्षण खात्याकडे दुरध्वनी संपर्क का साधला नाही हे आश्चर्य आहे.

गेल्या दहा महिन्याच्या काळात अनुदान मिळूनही पगार मात्र सेवकांना न करण्यात ही संस्था आघाडीवर आहे. मात्र तांत्रिकदृष्टया सारे कसे शांत शांत आहे. पगारपत्रकावर आधीच सह्या घेऊन ठेवल्या. त्यामुळे पगार दिल्याचे कागदोपत्री नमूद झाले. पण सर्वश्री वडजे (मुख्याध्यापक), निषा सुकदेव जाधव, खैरे, खर्डे, कु. पंडित आणि गडकरी या शिक्षक सेवकांनीच पगार न मिळाल्याचे सांगितले आहे. याप्रकरणी झेड्. पी. कडून चौकशी झालेली नाही. होईल की नाही सांगता येत नाही.

संस्थेच्या छात्रालयात सत्तर विद्यार्थी आहेत. गेले कित्येक महिने परिषदेने अनुदान मात्र १४० विद्यार्थ्यांचे दिलेले आहे. याबाबत तर परिषदेकडे कित्येक तक्रारी अर्जही झाले आहेत.

सौ. दाते या फेब्रुवारी १९७२ पासून त्र्यंबकेश्वर येथे दुसऱ्या संस्थेत नोकरीसाठी गेल्या तरीही त्यांच्या नावावर मे १९७२ पर्यंत पगार खर्ची घातला हे काय गौडबंगाल आहे? या संस्थेमध्ये श्री. नेरे नावाचे गृहस्थ बोर्डिंग सुपरिंटेंडेंट म्हणून होते. जानेवारी १९७२ पासून ते ठाणे जिल्हा परिषदेत शिक्षक म्हणून नोकरीस लागले; तरी देखील संस्थेने जून १९७२ पर्यंत त्यांचा पगार खर्ची घातलेला आहे. संस्थेच्या बालवाडीत सौ. भागुबाई दाते या दायी म्हणून कामावर होत्या. नोकरी सोडून त्यांना दोन वर्षे झाली. तरीही अजून त्यांच्या नावाने पगार खर्ची घालण्याचे काम चालूच आहे.

फुल्याबाई नारायण थोरात यांनी कधी संस्थेचे तोंडही पाहिले नाही. तरी देखील त्यांना मानधनरूपी वेतन चालूच आहे.

या संस्थेतील फर्निचर, साहित्य, विज्ञान विभागातील सामान, पुस्तके आदींविषयी काय लिहावे? खर्च झालेला आहे. प्रत्यक्षात आनंदीआनंद गडे! जिल्हा परिषदेकडे (अर्थातच) तक्रारी आहेत. चौकशी (अर्थातच) झालेली नाही.

छात्रालयात म्हणे १०० पाट व १०० गाद्या अनुदानातून खरेदी केल्या आहेत. इन्स्पेक्शन आले की शहरातील भाड्याने गाद्या-पाट देणाऱ्या एकाद्या संस्थेला एका दिवसाची चांगली कमाई होते. विद्यार्थ्यांनीच याबाबत जबाब द्यावा. (किंवा चौकशी अधिकाऱ्यांनी घ्यावा) संस्थेला छात्रालयाच्या इमारतीसाठी ३१ हजार रुपयांचे अनुदान सरकारने दिले. त्याची काय विल्हेवाट झाली ते शिक्षणाधिकारीच जाणोत.

## नासिक रोड....

नासिक रोडची शारदा विद्याप्रसारक संस्था म्हणजे एक संस्थानच आहे. स्थापनेपासून गाजत असलेल्या संस्थेचे

शिक्षणक्षेत्रात दिवाळे वाजले आहे. ज्या धनिकांनी ही शिक्षणसंस्था नावारूपास यावी म्हणून लाखाने देणगी दिली त्यांनी आपले नाव लावू नका असे सांगावे यातच कामकाजाची कल्पना यावी. मागच्या तीन-चार वर्षांत जो गोंधळ झाला तोही स्थलाभावी देता येणे शक्य नाही. गेल्या व चालू वर्षी काय घडले ते पाहू.

ही संस्था पब्लिक ट्रस्ट ई ६२ अशा क्रमाकांचे नोंदली आहे. संस्था २५ वर्षांपासून कार्यरत आहे. या संस्थेच्या वतीने १ : जयरामभाई हायस्कूल, २ : महाराष्ट्र हायस्कूल, ३ : जयरामभाई विद्यामंदिर – प्राथमिक शाळा. ४ : पाचबंगला प्राथमिक शाळा. ५ : डॉ. पार्वतीबाई नायर स्कूल अशी विद्यालये चालविली जातात. संस्थेत सुमारे ४५ माध्यमिक शिक्षक, ३० प्राथमिक शिक्षक १५ शिक्षकेतर कर्मचारी आहेत. संस्था रौप्यमहोत्सवी वर्षीदेखील डबघाईल आलेली आहे. गैरप्रकारांना गेल्या दोन वर्षांपासून ऊत आला आहे.

याही संस्थेचे प्रमुख आहेत श्री. ए. बु. अत्तार, नासिक जिल्हा काँग्रेसचे प्रमुख नेते, नासिक रोड गट काँग्रेसचे पदाधिकारी, प्रख्यात व्यापारी (यांची अधिक माहिती 'स्वस्तिक' चे वसंतराव वैद्यांसह—कऱ्हाड वऱ्हाडपर्यंत पसरलेले सर्व पादत्राणांचे कारखानदार आणि विक्रेते देऊ शकतील !)

१९६९ मध्ये शिक्षकांचे पगार संस्थेकडे थकले होते. त्यामुळे पुढची ग्रँट मिळू शकत नव्हती. त्यावर संस्था वाचविण्यासाठी न दिलेली पगाराची रक्कम ही शिक्षकांनी संस्थेकडे ठेव म्हणून ठेवल्याचे दाखविण्यात आले. संस्थेने त्यापोटी बाँड्सदेखील करून दिले. ही रक्कम ४५ हजारांइतकी आहे. अद्याप संस्थाप्रमुखांनी ती परत केलेली नाही.

माहे नोव्हेंबर ७० ते फेब्रुवारी ७१ पर्यंतचे चार महिन्याचे पगारही जयराम भाई व महाराष्ट्र हायस्कूलने थकविले. शिक्षिकांच्या पगारातून कापून घेण्यात आलेली प्रॉव्हिडंट फंडाची रक्कमही तीन वर्षांपासून पोस्टात जमा करण्यात आली नव्हती. शिक्षण खात्याने संस्थेला कारणे दाखवा नोटीस दिली व मान्यता काढून घेण्याचे ठरविले. पुन: शिक्षकांना संस्था चालकांनी पेचात पकडले. शाळेची मान्यता गेली तर काय करणार असा शिक्षकांना बिनतोड सवाल विचारण्यात आला. मागचा पगार व पुढची नोकरी बरोबरच जाईल, असे सांगण्यात आले. नोकरीची गरज असेल तर पैसे न घेता सह्या करा, नंतर पैसे देऊ. अशा रीतीने पुन: घेतलेले ६५ हजार रुपयेही शिक्षकांना परत करण्यात आले नाहीत.

या संस्थेने शिक्षकांचे पगार देण्यासाठी म्हणून बाहेरून कर्ज घेतल्याचे दाखवले. हे कर्ज, संस्था चालकांची मुले, पत्नी व नातेवाईकांकडून घेतल्याचे दाखवण्यात आले. फीमधून कर्जाची वसूली सध्या चालू आहे. इकडे शिक्षकांना पैसे तर दिले नाहीतच. फी मधून उलट वसूली. ही सरकारची घोर फसवणूक आहे. यावर एक साधा उपाय

आहे. ज्यांनी संस्थेला कर्ज दिल्याचे दाखविले त्यांनी किती तारखेला कर्ज दिले ते पाहावे. माझी खात्री आहे की या तारखेला त्यांच्या खऱ्या हिशोबात ती कर्जाची रक्कम खर्ची पडलेली नाही. मग हा पैसा निश्चितपणे 'काळा'च असला पाहिजे. निदान यासाठी तरी त्यांच्यावर कारवाई व्हावी !

या संस्थेचा सेक्रेटरी म्हणून जो सदगृहस्थ काम पाहातो त्याच्या नावाला चॅरिटी कमिशनरांची मान्यता नाही. मग हे चालते तरी कसे ?

या सर्व भानगडींचे एक निवेदन शिक्षकांनी जिल्हा परिषदेच्या शिक्षण खात्याकडे पाठविले. चौकशीला सुरुवात झाली. ज्या बंडखोर शिक्षकांनी हे निवेदन पाठविण्याचे पापकृत्य केले त्यांना सस्पेंड करून खाशी सजा देण्यात आली. सस्पेंड केलेले शिक्षक श्री. बा. म. अंजनगावकर (सेवा ३ वर्षे) त्र्यं. पु. भावड (९ वर्षे) र. बा. जाधव (३ वर्षे) एस. एस. नागपुरे (७ वर्षे). नोकरीवरून कमी केलेले असे—वा. ल. दसपुते (३ वर्षे), जी. ए. शेख (४ वर्षे) मु. प्र. नार्वेकर (१ वर्ष) ए. व्ही. नागपुरे (४ वर्षे). शिपाई शेख (४ वर्षे)..

यांच्यावतीने एका ट्रस्टीनेच कोर्टात न्याय मागितला. सस्पेन्शन व नोकरीतून मुक्त करण्याचा हुकूम बेकायदेशीर असून कोर्टाने मनाई हुकूम दिला. या सर्वांना कामावर घेतले गेले पण काम मात्र दिले नाही. रोज सकाळी शिक्षक येतात व संध्याकाळी न शिकविता परत जातात. न्यायालयाच्या आदेशाचा हा एक प्रकारे अवमानच नाही का ? विशेष म्हणजे या शिक्षकांना काम दिले जात नाही पण नव्या १३ शिक्षकांची भरती मात्र केली जाते. विना बैठकीची. विना जाहिरातीची. हे काय चाललंय ? पाच-बंगला प्राथमिक शाळेत १५ महिन्यां-पासून शिक्षकांना पगार दिलेला नाही. याविषयी वृत्तपत्रातून बातम्याही प्रसिद्ध झाल्या आहेत.

जयरामभाई हायस्कूलची इमारत दानशूर उद्योगपती श्री. बिटको यांची आहे. त्यांच्या कानावर हा प्रकार गेला तेव्हा त्यांनी शाळेलाच इमारत नाकारली. हा वाद कोर्टात चालू आहे. आजारी शाळा, आजारी शिक्षक, विद्यार्थी मात्र बेजार ! !

### चांदवड....

नासिक जिल्ह्यात चांदवड येथे मुंबई-आग्रा मार्गावर गुरुकुलाच्या धर्तीवर नेमीनाथ ब्रह्मचर्याश्रम संचलित छात्रालय, विद्यालय, महाविद्यालय चालविले जात आहे. गेली काही वर्षे ही संस्था निदान शैक्षणिकदृष्टया तरी चांगली चालल्याचे दिसत होते. पण या गुरु-कुलाला राजकीय कुलाचे 'गुरु' भेटले आणि म्या पामरे काय बोलावे ? (कारण मी अखेरी अश्लील शिव्या, वाटेल त्या आरोपांचाच धनी होणार आहे. कारण त्यांच्या मित्रांना व शत्रुं-नाही त्यांचा स्वभाव माहित आहे; आणि 'टॅक्टिज' काँग्रेसचे दोन्हीही गट जाणून आहेत! ) या संस्थेची उभारणी केशवकाका आवड यांच्या त्यागातून

झाली. माजी विद्यार्थी संख्याच जवळ-जवळ ४ हजार आहे. गेल्या चार वर्षापासून ही संस्था श्री. जितमल छाजेड या सदगृहस्थांच्या ताब्यात आहे. इंदिरा काँग्रेसचे (इंदिराजीपेक्षाही) प्रखर पुरस्कर्ते आणि शिक्षण संस्था चालकांच्या संघटनेचे पदाधिकारी आहेत. त्यांचा चेकने पगार देण्याच्या योजनेला विरोध आहे. लोकसत्तेत एका लेखाद्वारे त्यांनो लेख लिहून शिक्षणसंस्थांचे चालक हे त्यागी असतात, भोगी नसतात याची ग्वाही दिली. पुढील इतिहास त्यांच्याच (त्यागाचा) संस्थेचा आहे. वाचकांनीच काय ते समजून घ्यावे.

संस्थेतील सुमारे ३० शिक्षकांचे पगार ऑक्टोबर ७२ ते मार्च ७३ या काळापर्यंत झालेले नव्हते. काही बंडखोर शिक्षकांनी २६ एप्रिल ७३ ला जिल्हा परिषदेच्या शिक्षणखात्याकडे याविषयी तक्रार अर्ज केला. त्यावेळी मुख्याध्यापकांना असे सुचविण्यात आले की, सर्व शिक्षकांनी पगारपत्रकावर सह्या कराव्यात. त्यावर ग्रँट मिळाली की पगार वाटप करावे. शिक्षक तयार झाले. त्यांनी मुख्याध्यापक हमी घेतील तर सह्या देऊ असे सांगितले. मुख्याध्यापक शिक्षकांचे प्रेम व संस्थाधिपतींची कृत्ये या कात्रीत सापडले. त्यांनी शिक्षकांच्या विश्वासघाताचे पाप माथ्यावर घेण्याऐवजी १३ वर्षांची नोकरी सोडून दिली.

आता गंमत बघा. २६ एप्रिल ७३ ला जिल्हा परिषदेकडे शिक्षकांनी पगार न मिळाल्याची तक्रार केलेली आहे. ३० मार्च १९७३ ला शिक्षकांना संस्थेने चेकने पगार दिले. एवढे चेक जेव्हा सोडले तेव्हा बँकेत रक्कम नव्हती अशी माझी माहिती आहे. चेक वटविले गेले मे महिन्यात. म्हणजे उपाशी शिक्षकांनी दोन महिन्याच्या काळात चेक खिशात बाळगले ! आणि मग चेक अदा झाले असूनही संस्थेची बदनामी का केली ? संस्थेने तरी ती कशी सहन केली ? खरी स्थिती अशी आहे, की चेक अदा केले, अनुदान मिळविले व नंतर पगार झाले.

जिल्हा परिषदेकडे शिक्षणसंस्थांनी मार्च अखेरचे जमाखर्च जूनपर्यंत सादर करावेत असा वास्तविक नियम आहे. पण या संस्थेचे जमाखर्च ७२ चे ७३ मार्चला आले. नाशिकचे जिल्हा शिक्षणाधिकारी श्री. नारायणराव मांडे यांनी त्यांनाच सवलत का दिली ? मांडे यांच्याविरूद्ध मुंबई-पुणे-नाशिकच्या दैनिकातून कारभारविषयक, टेंडरविषयक, बी. एड्. प्रवेशविषयक इतकी ओरड झाली आहे की त्यांची अधिक ओळख करून देण्याची आवश्यकता नाही. श्री. मांडे हे जैन ओसवाल बिल्डिग (बोर्डिंगची) मध्ये राहतात. श्री. छाजेड या संस्थेतही प्रमुख आहेत. भाडेकरी म्हणून तर त्यांनी घरमालकाला सांभाळून घेतले नाही ना ?

६९ मध्ये श्री. एस्. के. ललवाणी व्हाईस प्रिन्सिपॉल नेमले. श्री. छाजेड व ललवाणी यांचे संबंध चांगले आहेत. त्यांची सिनिऑरिटी १३ वी होती. या प्रकरणी दाद लागणार नाही हे सिनिऑरिटी डावललेल्या दोघांना माहीत होते. संकलेचा (B.Sc. M. Ed.)

बोराटे (B. Sc. M. Ed.) यांनी राजीनामा दिला. (इंदिराजींच्या राज्यात शेलाट-ग्रोव्हरवर राजीनाम्याची पाळी येते, मग इंदिरावादी छाजेडांच्या राज्यात बोराटे-संकलेचांच्या नशिबात दुसरे काय असणार?) विश्वस्त काकाजी आबडांना हा अन्याय सहन झाला नाही. त्यांनी ललवाणींना काढून टाकले. प्रकरण कोर्टात गेले. पण दोन वर्षे ललवाणींच्या नावाने मस्टर कोरे ठेवण्यात आले होते ते का व कसे? परवाच एक ट्रस्टी तेथे जाऊन मस्टर 'क्लोज' करून आले.

संस्था हातातून जाऊ नये म्हणून माहेश्वरी, जैन, गुजराती मंडळींची गेल्या चार वर्षांत सभासद-नोंदणी होऊ दिलेली नाही. पर्युषणपर्वानिमित्त दर-वर्षी १०–१५ हजार रुपये वर्गणी गोळा केली जाते. ती ४ वर्षांत गोळा झालेली नाही. गेल्या ४ वर्षांत सर्वसाधारण सभाही झालेली नाही. १९६९ साली जी जनरल मीटिंग झाली त्यात घटना दुरुतीचा विषय नव्हता. नंतर तो घुसडविण्यात आला. पण ७३ च्या सुरुवातीपर्यंत घटना चॅरिटी कमिशनरां-कडे नव्हती.

या संस्थेचे वैशिष्टय म्हणजे येथे अवघ्या ३०–३५ मुलांसाठी महा-विद्यालय चालविले जात आहे. प्रिन्सि-पॉलचा काय घोळ झाला तो विद्या-पीठालाच चांगला माहीत आहे. मला वाटते, ३५ विद्यार्थ्यांसाठी कॉलेज चालविणारी ही संस्था महाराष्ट्रात एकमेव असावी.

संस्थेत कु. डबीर या कुठल्या एका (महाराष्ट्रबाह्य?) विद्यापीठाच्या 'इंटर'व्हलपर्यंत शिक्षण झालेल्या आहेत. त्या तिथे शिक्षिका आहेत. (Untrained under graduate) त्या बोर्डिंग सुपरिंटेंडेंटची भूमिकादेखील पार पाडतात. त्यांचे पिताजी श्री. डबीर हे संस्थेत हेडक्लार्क आहेत आणि श्री. डबीर हे श्री. छाजेड यांचे व्याही आहेत. माजी व्हाईस प्रिन्सिपॉल (वादग्रस्त) ललवाणींच्या मेहुणीबाई तेथे शिपाई आहेत. तर त्यांचा मुलगा शिक्षक आहे.

असे कितीतरी किस्से! फर्निचर आहे, पुस्तके आहेत, सामान आहे. पण 'माणूस'ची पृष्ठसंख्या मर्यादित आहे. अशा शेकडो नालायक सत्ताधाऱ्यांना हातात शारदा सापडली आहे. तिचे वस्त्रहरण रोज चालू आहे. पैशांचे गैर-व्यवहार तर राहू द्या, पण मुलींच्या बोर्डिंगमध्ये कुमारिकांवर बलात्कार होत आहेत. (कोर्टात खटला पेंडिंग असल्याने स्पष्ट सांगता येणार नाही!) अशा नासिक जिल्ह्यातील आजारी शिक्षणसंस्था प्रथम ताब्यात घेणे सर-कारचे कर्तव्य ठरते. पण मुळात सरकारी पक्षाचेच बहुसंख्य नालायक संस्थाचालक असल्याने एकादा 'मुळे' ताब्यात घेणे अधिक श्रेयस्कर ठरते.

—जाता जाता...मी ही माहिती जमवतोय, अनेक शिक्षकांना, त्रस्त पालकांना भेटतोय याची जाहिरात चमचेगिरीने होतेच. दलितमित्र समाज-सेवक साठे यांनी 'समाजक्रांती'तून बदनामी सुरू केली आहे. श्री. छाजेड यांचे 'घोडे' तयार आहेतच!! ● ●

# मृणाल सेनच्या मर्यादा स्पष्ट करणारे चित्रपट

ह. शि. खरात

परवा प्रभात चित्र मंडळाने बंगाली चित्रपट दिग्दर्शक मृणाल सेनचे पाच चित्रपट एकत्र दाखविण्याचा एक स्तुत्य उपक्रम मुंबईत केला. अर्थात ह्या पाच चित्रपटांची निवड सहेतुक होती की नाही किंवा केवळ उपलब्ध असलेले चित्रपट दाखविले गेले हे कळत नाही. परंतु ह्या चित्रपट महोत्सवामुळे मृणाल सेनच्या दिग्दर्शनकलेचा सर्वांगीण विचार करण्यास मदत झाली. दिग्दर्शक म्हणून मृणाल सेनच्या गुणदोषांबरोबर त्याच्या मर्यादाही स्पष्ट झाल्या. एखाद्या कलावंताची एखादी कलाकृती बघून त्यास मोठा किंवा छोटा ठरविणे हे जसे त्याच्यावर अन्यायकारक असते तसेच इतरावरही अन्यायकारक असते. तसेच कलावस्तुचा विचार करताना जे 'परस्पेकिटव्ह' लागते ते येत नाही. म्हणून अशा चित्रपट महोत्सवाचे महत्व अधिक आहे.

मृणाल सेनचे चित्रपट वेगळे आहेत. परंतु ते फार वेगळे नाहीत. संकेत मोडणारे आहेत पण स्वतंत्र व्यक्तित्वाचे नाहीत. मोठया प्रमाणात सत्यजित रेची छाप आढळते. प्रतिकात्मक काहीतरी मांडण्याच्या • सोसामुळे म्हणा किंवा असंबद्ध तंत्रवेडामुळे मंत्र हरविल्यासारखे वाटतात.

या चित्रपट महोत्सवात एकंदर पाच चित्रपट दाखविले गेले. त्यापैकी कलकता ७१, बाईशे श्रावण, द इंटरव्ह्यू हे बंगाली भाषेतील होते तर एक अधुरी कहानी व भुवन सोम हे हिंदी भाषेतील होते. परंतु सारे चित्रपट व्यक्तिमत्वाने खास बंगाली, अतिबंगाली म्हटले तरी चालतील. इथे भाषेचा प्रश्न गौण आहे. कारण दृश्य व श्राव्य (थोडया प्रमाणात) ह्या दोन माध्यमातूनच चित्रपट कला साकार होते. कलकत्ता ७१ मधील पहिला व शेवटचा भाग वगळता सर्वच चित्रपट कथांची निवड सामाजिक आशय असलेली व आव्हानात्मक होती. सर्वच चित्रातून सामाजिक वास्तवतेची व एका विशिष्ट राजकिय विचारांची

बांधिलकी स्पष्टपणे आढळून आली.

'कलकत्ता ७१' हा अगदी अलिकडचा चित्रपट. ह्यातील पाच कथांतून दारिद्र्य, बेकारी, दुष्काळ, ढोंग व त्यातून प्रक्षोभ हे सूत्र पकडण्याचा प्रयत्न केला आहे. पहिल्या भागात एक संतप्त बेकार तरुण चिडून ' शोकेस ' फोडतो व तीमधील पुतळ्याचे वस्त्रहरण करतो म्हणून त्याच्यावर खटला भरला जातो. शेवटी वैयक्तिक काय किंवा सामाजिक काय चीड ही अटळ आहे हे सांगण्याचा प्रयत्न. पण ह्यातला ' कोर्टसीन ' पाहताना बँकेने सादर केलेली एकांकिका तर आपण पाहात नाही ना अशी शंका येते. एकांकिकेचा विषय चित्रमाध्यमातून दाखविल्यामुळे सारा प्रकार नाटकी वाटतो.

' कलकत्ता ७१ ' मधील दुसरा भाग मात्र फारच जमून गेला आहे. दिग्दर्शक आणि कॅमेरा ह्यांच्या तारा जुळून गेल्याने सूर कसा मस्त लागलाय. मुसळधार पावसाने झोपडपट्टीतील एका कुटुंबाला जे दुर्दैवाचे दशावतावर भोगावे लागतात त्याचे परिणामक चित्रण आढळते. पावसाची टिपटिप अन् त्यामुळे निर्माण होणारा चिकचिक अनुभव प्रेक्षकांना भिजवून टाकतो. ह्या चित्राचा शेवट परिणाम कारक आहे.

तिसऱ्या भागात दुष्काळामुळे अन्नान्न झालेल्या मध्यमवर्गीय कुटुंबाचा वेश्या व्यवसायाकडे वळताना होणारा तडफडाट आणि कोंडमारा दाखविला आहे. तर चौथ्या भागात तांदळाची चोरटी आयात करणाऱ्या गरीब पोरांच्या एका टोळक्याचा एक धडधडता प्रवास दाखविला असून त्यामुळे उच्चभ्रू प्रवाश्यांच्या जगाला ओरखडा काढला आहे.

पाचवा भाग अत्यंत नाटकी व परिणामशून्य वाटतो. ऐन दुष्काळात एका ' उच्चभ्रू ' च्या पार्टीतील सामाजिक दांभिकता व कृत्रिमता यांचे चित्रण करून हा समाज बदलला पाहिजे म्हणून धडपडणाऱ्या एका संतप्त तरुणाचा बंदुकीने घेतलेला बळी ही कथावस्तु. हा सारा प्रकारच फिल्मी वाटतो. मनात कसली खळबळ होत नाही की ते सूत्रही होत नाही.

' बाईंशे श्रावण ' ह्या चित्रात एका दुर्बळ माणसाची शोकांतिका आहे. तरुण बायकोची हौस पुरविण्याच्या नादात घराकडे दुर्लक्ष होणे. त्यामुळे वादळात घर पडून आईचा अंत. ही गोष्ट मनाला लागून राहणे. त्यात रेल्वे अपघाताने पाय मोडणे. त्यामुळे मिळकत नाही. बायकोचे शेजाऱ्याच्या बाळाकडे अधिक लक्ष जाणे. ही एकलेपणाची आग त्याला वैताग आणते.' त्या वैतागाचा पारा चढून शेवटी बायकोची आत्महत्या. शेवट अत्यंत दारुण आणि परिणामकारक आहे. अर्थात इथेही दुष्काळ, युद्ध, वगैरे आहेच.

' द इंटरव्ह्यूव ' चित्र थोडेसे पोरकट वाटते. एका बेकार तरुणाचा इंटरव्ह्यूव पण ' सूट ' लाँड्रीवाल्याच्या संपात अडकलेला. उसना आणलेला सूट बसमध्ये पाकीटमाराला पकडताना हरवला जातो. शेवटी नाईलाजाने धोतर नेसून

इंटरव्ह्यूव होतो. सगळेच हसतात. त्यामुळे तो चिडतो अन् शोकेसमधील एका पुतळ्याचे वस्त्रहरण करतो. या चित्राची सुरुवात मोठी अर्थपूर्ण आहे. सुरुवातीला एका परकीय पुतळ्यावर तोफ डागली जाते. शहरातले सारे परकीय पुतळे हलविले जातात. पुतळे गेले पण मानसिक गुलामी आहेच. त्यासाठीच क्रांती हवी. इथेही मोर्चे, गोळीबार, घोषणा वगैरे आहेच.

'एक अधुरी कहानी'त मालक व कामगार संघर्ष आहे. त्या संघर्षात एका बंगाली दुर्बळ तरुणाचा कसा गोंधळ उडतो व तो कामगारांना बेईमान होऊन कसा पळून जातो आणि बंदुकीने उठाव कसा मोडून पडतो हे नेहमीचे चित्रण. प्रतिकात्मकतेचे वेड आणि तपशिलांचा खच यामुळे चित्र बोथट होते. ऊसमळ्याचे, शेतकऱ्यांचे व कारखान्यातील यंत्राचे इतके तपशील आहेत की आता ऊसापासून साखर कशी तयार होते, हे दाखविले जाणार की काय असा संभ्रम निर्माण होतो. ह्या तंत्रवेडामुळे चित्राला ऊसाचा आणि कामगारांच्या घामाचा वास येण्याऐवजी डॉक्युमेंटरीचा वास येतो. इथेही मोर्चा, घोषणा, उठाव आहेतच.

'भुवन सोम'मध्ये सुरुवातीसच घोषणा, मोर्चे आहेत पण ते बंगालीपणाच्या अट्टाहासासाठी. तसा हा चांगला चित्रपट. पण अनेक असंबद्ध गोष्टींच्या लांबट चित्रणामुळे विनाकारण पसरट झाला आहे. तेच तेच शॉटस् अन् तपशील गाळून चित्राची लांबी कमी करता तो एक टोकदार अनुभवाचा चित्रपट होईल. ह्या चित्राची कहाणी राजस्थानात घडते. येथेही पुन्हा बंगाली माणसाचे स्तोम. खरे म्हणजे भुवनसोमसारखा कडक शिस्तीचा रेल्वे ऑफिसर जगाच्या कुठल्याही कोपऱ्यात आढळेल. तो बंगालीच कशाला पाहिजे. एका कडक वृत्तीच्या माणसाचा एका निर्व्याज मनाच्या पोरीच्या सान्निध्यात झालेला हृदयंगम बदल हा या चित्राचा विषय. चित्र हिंदीत काढावयाचे असल्याने एका राजस्थानी खेड्यातील पोरीला हिंदी शिकवून तडजोड केली आहे. समजा बंगालीतच चित्र काढायचे असते तर? विशेष म्हणजे ह्या चित्रातील (बहुतेक साऱ्याच चित्रांचे) पक्ष्यांचे व वाळूतील छायाचित्रण बढिया आहे. परंतु गती नसल्याने कित्येक शॉटस् कंटाळवाणे वाटतात. उदा. भुवनसोमच्या मागे रेडा धावणे किंवा बैलगाडीतील प्रवास. दोन्ही प्रसंग नर्म विनोदी पण लांबल्यामुळे सारा मजा गेला आहे.

सहज अभिनयाच्या बाबतीत वरील पाचही चित्रे चांगली आहेत. पण बऱ्याच वेळा काही पात्रे विनाकारण 'कॅमेरा कॉन्शस' होतात. या चित्रांचे पार्श्वसंगीत विषयाशी अनुरूप व लोकसंगीत असल्याने वातावरणनिर्मिती छान होते. लोकसंगीताचा भरपूर वापर आहे. कधी कधी कोणताही तुकडा कुठेही टाकला आहे. अधुरी कहानीत हिटलर व फौज दाखविताना जत्रेतील ढोलांचे आवाज दाखविले आहेत. तेथे पडघम परिणामकारक झाला असता. तेच

तेच तंत्र, कल्पना वा प्रतिके पुन्हा पुन्हा वापरल्याने परिणामशून्यता आली आहे. आगगाडी न दाखविता धावणारे रूळ दाखविणे (हे साऱ्याच चित्रात आहे) पंखा न दाखविता त्याचा आवाज ऐकविणे. धावणारा न दाखविता आजूबाजूचे गल्ल्याबोळ दाखविणे (कलकत्ता ७१), वारंवार क्लोज अप्स घेणे ही त्याची उदाहरणे. विशेषतः धावणारे रेल्वेचे रूळ दाखविण्याचे वेड मृणाल सेनला इतके आहे की बहुतेक मित्रांची सुरूवात त्यानेच होते. ह्या पाचही मित्रांत रेल्वेरुळांसाठी हजारो फूट फिल्म वाया गेली असावी. त्या फिल्ममध्ये इतर प्रतिके दाखविता आली असती. संकलन करताना, फ्लॅश बॅक किंवा मानसिक आंदोलन दाखविताना वारंवार जेव्हा दृश्य बदलली जातात ती एकातून दुसरे उमलत न जाता डोळ्यावर फटाफट मारली जातात. त्यामुळे व्हावा तो परिणाम न होता डोळे व डोके दोन्ही दुखतात.

हे सारे सहन करूनही हा माणूस काय सांगतोय हे पहावेसेच वाटते. मृणालसेनला खूप काहीतरी सांगायचे असते. ते सांगताना त्याचा गोंधळ होतो. त्याला जे पकडायचे असते ते त्याच्या हातून किंवा कॅमेऱ्यातून निसटून जाते. चित्रपट पाहून प्रेक्षक भारावून जात नाही की एखाद्या वेगळ्या नव्या अनुभवाने तो समृद्धही होत नाही. याचे कारण जीवनातील वास्तवता पकडताना मृणाल सेन विशिष्ट अनुभवातील अंगभूत कलात्मकता हरवून जातो. मृणाल सेन कोणत्या विचारांचा आहे येथे आपल्याला कर्तव्य नाही. तर तो आपल्या कलात्मक अनुभवाशी किती प्रामाणिक आहे ह्यावरच त्याचे मोठेपण अवलंबून राहील. एकंदरीत मृणालसेनचे चित्रपट आपणास समाधान देत नाहीत हेच खरे. एखादी प्रचंड कलात्मक डॉक्युमेंटरी पाहिल्याचा भास होतो. थोडक्यात मृणाल सेनचे चित्रपट मसाला नसलेले चांगले हिंदी चित्रपट वाटतात.

काही वर्षांपूर्वी पथेरपांचाली पाहिल्यावर आम्ही सत्यजित रेला ग्रेट मानले. तेव्हा काही मराठी चित्रसमीक्षक आमच्यापुढे व्ही. शांताराम ठेवीत. सध्या 'भुवनसोम' ने हिंदी चित्रसृष्टीत कशी नवी लाट आणली हे सांगताना ते सत्यजित रेने सुरुवात करतात. परंतु भाषेचा येथे प्रश्नच नाही. भारतीय चित्रपटसृष्टीत नवी लाट सत्यजित रे यांनीच आणली. आणि आज तरी मृणालसेन त्यांच्या जवळपास जाऊ शकत नाहीत.

● ● ●

# ओव्हरसियर्स बदमाश आहेत ?

बाळ महाजन, जत

यंदाच्या दुष्काळीं परिस्थितीत महाराष्ट्रातील शेकडो तरुण ओव्हरसियर्सनी जी अपूर्व कामगिरी बजावली आहे, त्याचे साधे स्मरणही कोणाच्या लेखीही नाही ही केवळ दुर्दैवाची घटना आहे.

ओव्हरसियर्स म्हणजे कोणी पैसे खाणारा लफंगा वा दुष्काळी परिस्थितीत काहीही काम न करता मोकाट हिंडणारा, दुष्काळी मजुरांबद्दल केवळ तिरस्कार बाळगणारा अशा तऱ्हेची एक खोटी समजूत समाजातल्या काही समाज-प्रबोधकांनी रूढ केली आहे.

'माणूस' साप्ताहिकाच्या काही अंकामधून दुष्काळातील 'खळबळजनक' वार्ता प्रसिद्ध झाल्या आहेत. वार्तालेखकांच्या भावना मी जाणू शकतो, कारण मीही वृत्तपत्रव्यवसायात, युवक संघटनेच्या कामात आणि प्रामुख्याने विरोधी पक्षीय राजकारणात माझ्या परीने भाग घेतलेला आहे.

सध्याचा दुष्काळ हा मानवनिर्मित की निसर्गनिर्मित हा वादाचा मुद्दा सोडला तरी हा दुष्काळ एखाद्या झंझावातासारखा अचानक महाराष्ट्राच्या माथी कोसळला. लाखो लोक दुष्काळी कामावर येऊ लागले. शेकडो एकराचे जमीनदार आणि दिडकीची जमीन पदरी नसणारा भूमिहीन, श्रीमंत-गरीब ब्राह्मण-महार सारे सारे रस्त्यावर आले कामाला लागले. एक प्रकारे हा आघात जबरदस्त होता, कोणतेही सरकार अपुरे पडावे असा.

आणि अशाच वेळी दुष्काळी कामाचे प्लॅन, एस्टिमेट ठरवणे, नियोजन घडवणे, कामाची मोजमापे घेणे, मजुरी काढणे, पगार वाटप करणे याशिवाय मजुरांची हजेरी ठेवणे, त्यांच्यावर नियंत्रण राखणे, त्यांना सुविधा पुरवणे इत्यादी शेकडो कामे आ वासून पुढे उभी राहिली.

पूर्वीच्या नोकरवर्गावर हे काम भागणे दुरापास्त होते. या कामाची माहिती असणारे ओव्हरसियर्स मिळणे एकूण कठीण. या परिस्थितीत शेकडो शेतकी पदवीधर, डिप्लोमा होल्डर्स आणि इतर सापडतील ते तांत्रिक शिक्षण घेतलेले तरुण सरकारने नेमले आणि या दुष्काळी कामावर नियंत्रण

राखण्याचे, पगार सत्वर वाटपाचे काम हाती घेतले.

परंतु हे एवढ्यावर भागणारे नव्हते. ज्या ठिकाणी एक हजार मजुरांवर एक ओव्हरसियर हवा, त्या ठिकाणी तीन हजार मजुरांवर एक ओव्हरसियर, शंभर शंभर विहिरी, बरेच रस्ते, पाझर तलाव, खडी सेंटर्स आणि अशीच कामे ओव्हरलोड असूनही या ओव्हरसियर्सनी स्वीकारली.

रात्रीचे १–२ वाजावेत, दिवसभर मोजमापे घ्यावीत, एम्. बी. लिहावी, मस्टर चेक करावे, रनिंग बिले काढावी, पगार काढावेत आणि इतर तांत्रिक माहिती मिळवावी. रविवार वा इतर सुट्टी ती कसली नाही. साईटवर गेले तर दिवसभर उपाशी. त्या ओव्हरसियर्सना अपवाद वगळून कोणी जेव म्हणावे एवढीही कामगिरी कधी गावकऱ्यांकडून घडली नाही.

खरेतर या दुष्काळी मजुरांच्या परिस्थितीची जाणीव बाळगणारे, त्यांना वेळेवर, व्यवस्थित पगार पडावा यासाठी राबराब राबणारे माझे कित्येक ओव्हरसियर मित्र आहेत आणि त्यातही तरुणांच्याबद्दल प्रश्नच नाही.

राजकीय पक्षाचे प्रतिनिधी काही म्हणोत, केवळ भाषणबाजी वा लोकांची माथी भडकवून 'लोकजागृती' साधणाऱ्यांना कामावरील अडचणी वा परिस्थिती माहीत नसते असे नसते. परंतु तरीही एखाद्या ठिकाणी मजुरांनी काही काम केले नसले तरी ओव्हरसियर्स कसा तीन रुपये पगार काढत नाही ते बघतो, अशी दमदाटी देत मजुरांकरवी ओव्हरसियर्सना बेजबाबदारपणे बोलणे, मजुरांसमक्ष त्यांची लायकी काढणे वा घेराव करून, प्रसंगी अंगावर हात टाकून घेणे इत्यादी गोष्टी घडवल्या जातात.

सामान्यत: दुष्काळी कामावरला मजूर हा संयमी आणि क्षमाशील वृत्तीचा असतो. परंतु परिस्थितीच अशी बनते, महागाई, वाढती बेकारी, भाववाढ या दुष्टचक्रात त्याला अनंत चटके बसतात. दिवसाकाठीच्या तीन रुपये वेतनात किलोभर मिलोखेरीज काय येणार ? दोष त्यांचा नाही. मी जत तालुक्याच्या अत्यंत मागासलेल्या भागात काम करतो आहे. गेली ३–४ वर्षे ओळीने 'दुष्काळी' असलेल्या या तालुक्याची भीषणता किती तीव्र असेल याचा सूज्ञांनी जरूर विचार करावा.

जत तालुका म्हणजे सांगली जिल्ह्याचा अत्यंत मागासलेला आणि सतत दुष्काळाने खंगलेला भाग. आता साऱ्या महाराष्ट्रभर मुसळधार पाऊस पडत आहे, येथे एकदा येऊन पहा सूर्य कसा तळपतो आहे, पायाला चटके बसताहेत, विहिरीत पाण्याचा थेंब नाही, शेतात ढेकळाशिवाय आणि जनावरात हाडांच्या सापळ्याशिवाय काही काही नाही.

इथली माणसे तरी कसली ? यांना कसली संवेदनाच नाही. दिवसभर राबायचे, कष्ट उपसायचे, जगलो म्हणून एक दिवशी मरायचे, बस्स ! खेळ समाप्त.

या खेळाला वेळही लागत नाही.

दरवर्षी हेच घडतय. परंतु यंदा कहर झाला. पाऊस तो नाहीच. जवळ धान्याचा कण नाही. इथली खिलार जनावरे–हजारो रुपये किमतीची, डौलदार शिंगाची, धिप्पाड बांध्याची आणि आकर्षक ठेवणीची ही जनावरे म्हणजे महाराष्ट्राची धनदौलत. ही दौलत राज्याबाहेर आणि देशाबाहेर सिलोन, ब्रह्मदेशात अभिमानाने नेली जाते. आज हे सारे संपलेय. उघडया डोळयांनी अशी कितीतरी 'मायेची लेकरे' तडफडून मेली; कित्येक परागंदा झाली तर बहुतेक खाटकांच्या आजोळी रवाना झाली.

शेतीबाबत विचारूच नका. बिळूर या गावी दोनवर्षापूर्वी सातशे पानमळे होते आज फक्त दोन शिल्लक आहेत. परिस्थितीची कल्पना आता यायला हवी.

मध्यंतरी अचानकच जत बाजारपेठेत दुष्काळग्रस्तांनी प्रचंड लुटालूट केली. कितीतरी धान्य दुकाने लुटली गेली, १।२ व्यापाऱ्यांना बेदम मारहाण घडली. हे का घडले? कोणत्याही नेतृत्वाशिवाय लोकक्षोभाचा असा डोंब का उसळला?

लोकक्षोभ केव्हाही वाईट. परंतु एखाद्या सरकारी घटकाबद्दल जाणून-बुजून पद्धतशीररीत्या गैरवाजवी अतिशयोक्त लिखाण करणे हे कोणत्या नीतीत बसते? कदाचित ओव्हरसियर्स यावर लिहू शकत नाहीत, बोलू शकत नाहीत हे तर कारण नसावे ना?

जत तालुका काय किंवा इतर कोणताही भाग घ्या, सर्वसाधारणतः हीच परिस्थिती आहे.

दुष्काळी कामाचेही असेच. त्याला नावे ठेवणारेच जास्त. रस्त्यांची काय गरज होती, विहिरी का पुऱ्या होणाराहेत वगैरे शंका तर दररोज प्रसिद्ध होतात. रस्त्याची कामे अनुत्पादक असली तरी त्यामुळेच हजारो मजूर त्याखाली सामावू शकले ना? रस्ते पुढच्या २० वर्षात तरी एवढया प्रमाणात झाले असते काय? उत्पादक वा अनुत्पादक हे तरी कसे काय ठरवणार?

हे सांगण्याचा उद्देश एकच, हे का ओव्हरसिर्यसना माहीत नसते? हे माहीत असते. म्हणूनच मजुरांच्याबद्दल प्रेमाच्या, मायेच्या पोटी तो समजुतीचा व्यवहार करतो, करत असतो. राजकीय कार्यकर्त्यांचे मी समजू शकतो, कारण बहुतेक धंदेवाल्यांचे उद्दिष्ट तेच असते.

मजुरांच्या कमी मजुरीबद्दल जरूर आवाज उठवला पाहिजे. परंतु लोकांना काम करू नका वा काम न करता पगार मिळवून देतो असे सांगणे केवळ चूक आहे. मोर्चे कित्येक निघाले. त्यातही हीच स्थिती. एकेठिकाणची परिस्थिती काय? तर मोर्चे काढायला चला, मोर्चातून फिरून फुकट दिवसाचा पगार मिळवा. कित्येक मजूर फसले, परंतु दुसऱ्यांदा नाही. याचा अर्थ मोर्चे, संप, निदर्शने यांना माझा विरोध नाही. रास्त मागणीसाठी वा मजुरांच्या न्याय्य हितासाठी ते आवश्यकच आहे.

एकदा रामपूरच्या एका विहिरीवर मापे घ्यायला गेलो. वेळ सकाळची होती. मापे घेतानाच मी सभोवार पाहिले,

सारे मजूर विहिरीवर वर आले होते, गळयात तुळशीची माळ आणि अबिर-बुक्का ल्यालेल्या एका म्हातारीने बोलता बोलता माझ्या पायावर माथे टेकवले. मी आवाक् झालो. थोड्या वेळाने समजले, तीन रुपयाने पगार काढल्यामुळे तिला झालेला तो आनंद होता. कारण भुकेपोटी ते तीन रुपये तिला परमेश्वर होते.

येलदरीला जरा पगार कमी पडला तर बायका गाडीपुढे आडव्या आल्या; हातात दगडे घेऊन कन्नडमध्ये ओरडू लागल्या 'सायबरी, या कमी पगारात आम्ही काय दगड खायचे?' खरे होते ते पण त्याला ओव्हरसियर कसा काय जबाबदार? सरकारने एका विशिष्ट खोदाईला ठराविक दराने जी रक्कम मंजूर केली असेल ह्यापेक्षा ओव्हरसियर काय पदरचे देणार? दुसरे असे की मजुरांना कमी पगार पडला तर ओव्हरसियर्सना आनंद होतो काय?

सारी रात्र आकड्यांची गोळा बेरीज करून जास्तीतजास्त पगार काढण्याची महत्वाकांक्षा बाळगून धडपडणाऱ्या ओव्हरसियर्सची चूक कोणती? बरे एखाद्या ठिकाणी पगार वाटपात मस्टर-पेक्षा कमी पगार वाटला तर त्याला स्थानिक पगार वाटपदार जबाबदार, प्रत्येक ठिकाणी ओव्हरसियर्सने कसे करायचे?

हे एक झाले. दुसऱ्याही अनेक अड-चणी आहेत.

१ : जीपचा अपुरा पुरवठा. रस्ते खराब आणि सोयीचे नसल्याने जीप-शिवाय जलद प्रवास शक्य नाही.

२ : कामाचा लोड.

३ : आगाऊ अॅडव्हान्स मिळणे, टेप इतर साधने वेळेवर न मिळणे.

४ : कामात पुढारी मंडळींची ढवळा-ढवळ.

५ : अपुरी जागा, अपुरा स्टाफ.

अशा कित्येक कारणास्तव कधीकधी ओव्हरसियर्स तयार असूनही वेळेवर जाता येत नाही, मग कित्येकदा पगार थकतो.

परंतु एखाद्या ठिकाणी ३।४ आठवडे पगार वेळेवर झाला नाही तर त्या ओव्हरसियरच्या नावाने वृत्तपत्रातून केवढाले मथळे? नियमितपणे २।२ आठवड्याला पगार काढणाऱ्या आणि भरपूर पगार (म्हणजे ३ रु.) देणाऱ्या एखाद्या ओव्हरसियरचे बोटभर कौतुक कुठे वृत्तपत्रात का नसावे? का माणूस कुत्र्याला चावल्यावरच बातमी छापा-यची?

खरे तर उपरनिर्दिष्ट लिखाणात कोणाबद्दल असूया नाही, परंतु ओव्हर-सियरचे म्हणून एक म्हणणे असू शकते एवढ्यासाठी ह्या प्रपंच. महाराष्ट्राने या दुष्काळाच्या निमित्ताने एक खूप मोठे युद्ध लढले आहे. कोण विजयी झाले हे माहीत नसले तरी 'दुष्काळ' मागे हटू लागला आहे हे खरे आहे.

परवा औंढी लोहगावला गेलो होतो. मंगळवेढे रस्त्यावरचे हे गाव. छोटेसे. इथला जयवंत दादा पाटील, वय वर्षे १०९. अजून धट्टाकट्टा, गावातून हिंडतो फिरतो तसा एकूण ठणठणीत.

—तर त्यांनी त्यांच्या बालपणातील दुष्काळ वर्णला. काय दुष्काळाची तऱ्हा सांगावी. त्याकाळी (काळ बरोबर आठवत नाही!) ओढयाच्या वाळूत गणपती टाकले, गाव विहिरीत पाण्याचा ठिपूस नसायचा, उलट गवत माजायचे आणि अशातच रोगराई यायची. माणसे विदर्भात गेली, कित्येक मेली परंतु सरकारनं कसलं काम म्हणून दिलं नाही. तो इंग्रज आता गेला म्हणून या 'काँग्रेसी सरकारनं अशी माणसं जगवली' हे जयवंत दादाचे बोल.

जयवंतदादाने दीडशेर दूध पचवले, घोटून घोटून बेदाणे, मनुका तुपातून खाल्ले, परंतु हल्ली आपण दिवसाकाठीच्या ४।५ वेळ चहातून १।२ अंश दूध प्राशन करणारे वीर बोलण्यापरीस अधिक ते काय करणार?

माणसे खूप बोलतात. पुढारी लोक तर स्वप्नातही बोलतात. बोलणे हे भारतीयांचे अविभाज्य अंग आहे, म्हणूनच अंग झटकून ते मोकळे होतात.

ओव्हरसियर्सच्या बाबतीत हेच होत आहे. 'सर्व ओव्हरसियर्स, डेप्युटी इंजिनिअर हे केवळ बदमाष आहेत' असा सार्वत्रिक घोष करून स्वतःच्या 'कर्तबगारीची' इमेज् पब्लिकपुढे मांडायची ही एक रीत आहे

ओव्हरसियर्सना कोणाचा मोठेपणा नको की त्याला वृत्तपत्रातून प्रसिद्धी नको आहे. वृत्तपत्रे जसे समाज प्रबोधनाचे कार्य करतात, तसेच ओव्हरसियर्सही काही अंशाने का होईना प्रत्यक्षात समाजाच्या उपयोगी पडतात. समाजातील एक जवळचा घटक या नात्यानेच ओव्हरसियर्सची प्रतिमा राहिली पाहिजे.

यंदाचा हा दुष्काळ हटवण्यात या माझ्या शेकडो 'ओव्हरसियर्स मित्रांचा, डेप्युटी इंजिनिअरांचा मोठा हातभार लागला आहे. काही अपवाद वगळले तर बहुतेक तरुण ओव्हरसियर्स आपल्या आयुष्यानिशी परोपरीने झुंजले यात तिळमात्र शंका नको.

म्हातारपणातही दाढीची बोट बोट खुंट वाढली असताता रस्त्यावर खडी फोडणारा म्हातारा, दाढी, लुंगी लावून हातभट्टीच्या तोऱ्यात ओव्हरसियर्सना हात दाखवणारा मुकादम वा पंढरीच्या वारीला जाण्याऐवजी सामूहिक विहिरीवर पाटर्या वाहायला येणारी गंगूमावशी तशा आम्हाला का वेगळ्या आहेत? त्यांच्या उघड्या डोळ्यातली कणव, त्यांचे हरवलेले सुख आणि अनंत यातना न समजण्याइतके का आम्ही कृतघ्न आहोत?

• • •

## सप्रेम नमस्कार....

पृष्ठ २ वरून

त्यामुळे ती वेळ शेतकऱ्यांना सोईची होणार नसल्याने सदर खताचा साठा ग्रामपंचायतीच्या चिटणीसांच्या ताब्यात देऊन वाटप करावयास लावले. सदर खताचा साठा पंचायतीकडे देताना सोसायटीला डावलण्याचा उद्देश नाही, किंवा खताचा साठा पंचायतीकडे देऊन माझी पत सावरण्याचा बी. डी. ओ. श्री. नारखेडे यांचा हेतू नव्हता. श्री. चौधरी हे समाजवादी पक्षाचे पुढारी म्हणून मिरवत असताना केवळ राजकीय द्वेषाने व विघ्नसंतोषी बुद्धीने त्यांना चांगले घडलेले वाईटच दिसते.

आमच्या पंचायत चिटणीसांच्या ताब्यात दिलेल्या खताचा साठा जरी खाजगी इसमाकडे ठेवला, तरी त्या जागेचे भाडे घरमालक श्री. वामनराव भोईर यांनी घेतलेले नाही. खताचा साठा भाडे न घेताना ठेवला असता श्री. भोईर यांचे कौतुक करण्याऐवजी 'खाजगी इसम' असा उल्लेख करून त्यांच्यावर टीका करण्यात श्री. चौधरी यांनी मौज लुटली. दुसरे असे की, मागावून आलेले खत प्राथमिक शाळेच्या गाळ्यात ठेवले. त्यावेळी पाऊस नव्हता. पावसाला सुरुवात झाल्यानंतर आवणीची सुट्टी पडल्याने शाळा बंद झाली. त्यामुळे शाळेतील मुले पाण्यापावसात भिजत आहेत, हा श्री. चौधरी यांचा दावा धादांत खोटा नव्हे का ?

शिरवली गावी करण्यात आलेल्या खताच्या साठ्यामुळे सुमारे पंधरा–वीस गावातील शेतकऱ्यांनी युरिया खत मोठ्या आपुलकीने नेले आहे. त्यामुळे 'खताच्या साठ्याबाबत गोंधळ' हा चौधरी यांचा शब्दप्रयोग त्यांच्या राजकीय द्वेष भावनेत गोंधळ माजवीत आहे, हेच मात्र खरे.

यापूर्वी श्री. चौधरी यांनी 'माणूस' अंकात आमच्या शिरवली लिफ्ट इरिगेशन व प्राथमिक शाळेबाबत खोटारडेपणाने लिहिले आहे. त्यात काही तथ्यांश नाही. वर उल्लेखिल्याप्रमाणे केवळ 'आंधळ्याला जग आंधळते वाटते' या भूमिकेतूनच श्री. चौधरी यांचा उपद्व्याप आहे. उत्तम कार्य चाललेल्या शिरवली ग्रामपंचायतीला ते राजकीय द्वेषाने बदनाम करीत आहेत. त्याबाबत त्यांचा निषेधही पंचायतीच्या मासिक सभेत केलेला आहे.

**रघुनाथ पाटील**, सरपंच,
ग्रामपंचायत शिरवली,
(वसई)

● ● ●

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. **सं. श्री. ग. माजगावकर**

MANOOS ( Weekly ) : 50 Paise : Regd. No. MH 649



## आणि ब्रिजनारायण यांच्यावर सपासप वार पडले...

□

# Now it can be told

**Prof. Bali**

माणूस : चित्र, वार्ता, पुस्तक पुरवणीमधून
सादर होत असलेला पुस्तक परिचय.

हप्ता दुसरा : एक ऑगस्ट अंकात

किंमत : रुपया.